□

## बुद्धितत्व

साधक अवस्थेमध्ये सुद्धा बुद्धि पाहिजे आणि साध्य पूर्णत्वाला नेण्यासाठी, कार्य पूर्णत्वाला नेण्यास बुद्धिची तयारी पाहिजे.

"जेवी हिरेनी हिरा चिरीजे ।
तेवी मनेची मन धरिजे ।"

असे एकनाथ महाराजांनी सांगितले आहे. हेच बुद्धीतत्व त्याची अपूर्णावस्था जाणून त्याला पूर्णावस्थेत नेण्यासही कारणीभूत आहे. म्हणून

"उद्धरेत् आत्मनात्मनम् "

या मध्ये भगवंतांनी हेच सांगितले आहे. येथे आत्मा शब्दाचा अर्थ बुद्धी असा आहे.

---

बुद्धीच आपली बंधू आहे, बुद्धीच आपला शत्रू आहे हेही भगवंत सांगतात.
"जितात्मन; प्रशांतस्य परमात्मा समाहित; ।
इथे बुद्धी अनुकूल आहे.
"अनात्मनस्तू शत्रुत्वे वर्तेत आत्मैव शत्रुवत्"
अनात्मा जर असेल तर त्याला बुद्धी शत्रू आहे. अनात्मा याचा अर्थ आत्मा नाही असे नाही. या ठिकाणी याचा अर्थ अल्पार्थाने घ्यायला पाहिजे. म्हणजे अल्प आत्मा, अल्प बुद्धी असेल तर ती शत्रू आहे. विशाल बुद्धि झाली तर हाच आत्मा त्याला अनुकूल आहे.

---

बुद्धीची विशालता म्हणजे पूर्णता. पूर्ण तत्वाशी त्या बुद्धीचा संबंध आल्यानंतर ती परिपूर्ण होते.

श्रद्धा बुद्धीचेच एक स्वरुप आहे. चिकित्सा किंवा मनन तर्क हेही बुद्धीचेच स्वरु प आहे. ही दोनही स्वरु पे एकाच बुद्धीतत्वाची असल्या कारणाने ती परस्पर अशा प्रकारची आहेत. त्यामुळे तशा बुद्धीतत्वाची पूर्णता करु न विकास होत जातो.

---

निश्चय कोणताही असो. कोणता निश्चय करावयाचा, कोणता नाही, कोणता निश्चय विघातक आहे, कोणता समाजास चांगला आहे हा विचार बुद्धीने करायचा

आहे. त्याचा निर्णय करणारे महाभाग आहेत. त्यांचे कार्य चालू आहे. हे जे निश्चयात्मक बुद्धीतत्व आहे, हे बुद्धीतत्व जितके विशाल बनविता येईल तितके बनविले पाहिजे.

---

मानसिक शक्तीचा, बुद्धी तत्वाचा विकास म्हणजे सर्व सिद्धी आहेत.

---

व्द्वंद्वातीत अवस्था होणे हीच परिपूर्ण विशाल बुद्धी आहे.

---

अभ्यास करु न त्या विषयाची मर्मग्राहिता त्या बुद्धिमध्ये निर्माण झाली म्हणून यथार्थ मार्गदर्शन करण्याची शक्ती त्या बुद्धीमध्ये आहे, अशी बुद्धी थोर समजली जाते.

---

जी स्थितप्रज्ञावस्था भगवान सांगत आहेत ती अवस्था परिपूर्ण बुद्धीची आहे. पूर्णात स्थैर्य निर्माण झाले मनामधील चांचल्य दूर करु न अस्थिर बुद्धी स्थिर करता येते. बुद्धीमधील स्थिरता परिपूर्ण तत्वाच्या चिंतनाने किंवा त्याचा स्पर्शाने, संबंधाने उत्पन्न होते.

---

योग शास्त्रकारांनी या बुद्धीची एकंदर परिस्थिती पाहून अल्पव्रत आणि महाव्रत असे व्रताचे दोन भाग केले आहेत. अहिंसा, सत्य, वगैरे व्रतं आहेत ही महान व्रते आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये, कोणत्याही कालामध्ये, कोणत्याही देशामध्ये मी सत्यच बोलणार हे महाव्रत आहे. निदान मंदिरात गेल्यानंतर तरी मी खोटे बोलणार नाही. हरकत नाही. सुरवात होऊ दे. वाणीला हे व्रत पाळण्याकरता त्या वाणीमध्ये, बुद्धीमध्ये तितकी क्षमता पूर्ण नसल्यामुळे ती क्षमता येण्याकरिता म्हणून अल्पव्रतच योग्य सांगितले आहे.

---

केवळ सत्याकडे ज्या बुद्धीला जायचे आहे त्या बुद्धीला प्रदीर्घ प्रयत्न हवेत. इतके प्रयत्न करु न ती बुद्धी खरी सत्यनिष्ठ बनते. ते सत्य असे आहे की त्यांच्या वाणीमधून जे निघेल ते सत्यच होते. त्यांच्या बुद्धीमध्ये जे आलेले आहे ते सत्यच असते. असत्य येणेच शक्य नाही. इतकी बुद्धीची क्षमता, सामर्थ्य वाढलेले आहे.

---

बुद्धिर्ज्ञानम् संमोह; ।

बुद्धी असंमोह; म्हणून सांगितली आहे. तो बुद्धीचा गुण आहे. कोणतेही प्राप्त कर्तव्य करण्याच्या वेळेला परिस्थिती कशीही असली तरी ती बुद्धी विकाररहीत राहून शांतपणाने विचार करु शकते. निर्णय घेऊ शकते आणि कार्यकारी ठरते.

---

बुद्धीची परीक्षा केल्याशिवाय ज्ञानदान करणे योग्य नाही. कोणतेही ज्ञान असो, व्यवहारिक ज्ञान जरी असले तरी परिक्षा करु नच ज्ञान दिले जाते. नाही तर देणा-याचा कालापव्यय म्हणा, श्रम म्हणा याचा उपयोग नाही.

---

□

ईश्वर तत्वाशी संबंध येऊन ज्या बुद्धीमध्ये पूर्णता येते तेथे अन्य सहाय्याची अपेक्षा नाही.

---

दुस-याचे बरोबर नाही, माझे एकटयाचेच बरोबर आहे. ही बुद्धी म्हणजे अभिनिवेश

---

बुद्धीचे कर्तृत्व आहे, जीवाचे कर्तृत्व आहे, तथापि बुद्धीला प्रवर्तक अशी वेगळी शक्ती आहे.

"यो बुद्धे; परतस्तु स; "

बुद्धीच्याही पलीकडे एक श्रेष्ठ तत्व आहे आणि सर्वही बुद्धीमध्ये त्याचा संबंध आहे. सर्व भूतांच्या बुद्धीमध्ये संबंध असलेले हे एक तत्व आहे. या सर्व बुद्धी समष्टीला प्रेरणा त्या तत्वापासून मिळते आहे.

---

बुद्धीमध्ये परिपूर्णता येण्याकरता अनेक मंडळी बाहय प्रयत्न करीत असतात. परंतु बुद्धीचा परतत्वाशी संबंध जोडल्यामुळे ईश्वराच्या कृपेने, बुद्धीमध्ये कांही न्यूनता राहीली असल्यास ती दूर होऊन बुद्धीची परिपूर्णता होते.

---

बुद्धी विकासाला, विशाल बुद्धी होण्याला कारण म्हणजे जे सर्वही कर्तृत्व त्या ईश शक्तीचा परिणाम आहे ही जाणीव अंत;करणात आहे.

---

जरी आपण पुण्य केले पुण्याने कांही उच्चस्थान मिळालं तरीसुद्धा बुद्धी मात्र तशी राहात नाहीये. त्यांच्या पापकर्मापैकी कांही पापकर्म अधिक फलोन्मुख असेल तर त्या पापकर्माने तसे पापच त्याच्या हातून घडतयं, पुण्य थांबलेलं आहे.

---

जास्ती विचार करण्याची जी माझ्या बुद्धीला संवय होती ती चांगली नाही, हे मला पटलं. बुद्धीनं एवढच करायचं की ईश्वराच्या आज्ञेचं पालन करायचं. चांगलं वाईट हे आपल्या बुद्धीवर सोपवायचे नाही घोटाळा होईल.

---

बुद्धी आहे पण त्या बुद्धीने काय समजावून ध्यायचे ? ज्ञान संपादन करणे हेच बुद्धीचे कार्य आहे. त्या बुद्धीमध्ये जर तमोगुण अधिक वाढला तर काय होते, ते भगवान् सांगताहेत. ती बुद्धी मग अधर्मालाच धर्म समजते. अविवेक निर्माण होतो. विपरीतच सर्व भासते.

---

ज्ञान जर ईश्वराच्या प्रसादाने मिळाले तर त्या ज्ञानाचा बुद्धीवर उत्तम परिणाम होतो.

---

निश्चयात्मक बुद्धी नसेल तर काय उपयोग आहे ? आमची बुद्धी अनिश्चित आहे. मनाचाच व्यापार अधिक आहे. बुद्धीचा व्यापार कमी आहे त्यामुळे निश्चय करायचे कधी माहीतच नाही.
“गतानुगतिकोलोका; “
या म्हणण्याप्रमाणे स्थिती होणार.

---

प्रपंच, संसार दिसत असतानासुद्धा तो बुद्धीच्या सहाय्याने मनांतून काढून टाकायचा. जगदंबेचे फक्त आनंद स्वरु प मनामध्ये ठेवायचे. बाकी मनांतला सबंध संसार काढून टाकायचा, ही केवढी शक्ती आहे बुद्धीची !
तर बुद्धी शक्ती आपली वाढू शकते.

---

अहंकाराने लोकांचा अपमान करण्याची बुद्धी उत्पन्न होते. सत्वगुण बुद्धीमध्ये आहे की रजोगुण आहे की तमोगुण ? याचे निरीक्षण केले पाहिजे. मनुष्य जन्म याकरता आहे. प्रसंग सगळे येताहेत. प्रतिकूल परिस्थितीही निर्माण होते पण त्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपली बुद्धी कशी राहीली आहे, मन कसे आहे याची परीक्षा आहे.

---

अर्जुनाची बुद्धी आणखी शुद्ध आहे. पण शुद्ध बुद्धीमध्येसुद्धा अहंकार केव्हां निर्माण होईल याचा नियम नाही. तो अहंकार अनेक जन्म पाठमागे लागतो. बुद्धीचे स्वरु पच आहे ते. त्या अहंकारामध्ये सांपडलेला जीवात्मा ईश्वराचे स्वरु प असले तरी ओळखू शकत नाही.

---

अन्नमय, प्राणमय, आनंदमय हे पंचकोश किंवा सूक्ष्म कारणदेह वगैरे देह यांच्यापेक्षा बाजूला जो झालेला आहे, असा शुद्ध अहम् मी आहे आणि तो शुद्ध अहम् परमात्मा आहे इथपर्यंत ज्यांची बुद्धी गेलेली आहे त्यांना मनांत कांही अहंकार नसल्याने कळले आहे की ईश्वर जवळ आहे. आणि तो स्वत; ईश्वररु पच आहे.

---

निरनिराळया रीतीने मानवाच्या बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे जे कांही अनुकूल प्रतिकूल विचार असतील ते विचार बाजूला झाले पाहिजेत.

---

बुद्धी बाह्य संस्कारांनी इतकी भरलेली आहे आणि त्या बाह्य व्यवहाराला, त्या संस्काराला अनुसरु न जर कांही असेल तर ते आमच्या बुद्धीला पटतं. अशी बुद्धीची स्थिती झालेली असल्या कारणाने आचार्य महाराज सांगताहेत ते आम्हाला समजत नाही. त्या स्वानुभवा पर्यंत आमची बुद्धी जाऊच शकत नाही ना । ती बुद्धी जात नाही म्हणून तर आमचा अनुभव हाच खरा असेल असे आम्ही म्हणणार. जग जे दिसतयं ते सत्य आहे त्याला आभास कसे म्हणायचे ? त्या ज्ञानाचे बुद्धीमध्ये

संक्रमण झाले नाही तर बुद्धीवर काय परिणाम होणार । हे संस्कार जसेच्या तसे कायम राहातील. उलट हे जे विरु द्ध आहे हेच योग्य आहे असे वाटत राहील.

---

रजोगुण आणि तमोगुणातून ती बुद्धी बाजूला होऊन सत्वसंपन्न झाली पाहिजे. स्थिर झाली पाहिजे. विरक्त झाली पाहिजे. संयमी झाली पाहिजे. आणि निरहंकारी झाली पाहिजे.

---

शास्त्र महात्म्यांच्या ग्रंथांचे वाचन करणं, चिंतन करणं, त्याप्रमाणे आपल्या बुद्धीतले दोष जाणून घेणं, ते दोष जाण्याकरता ईश्वराला शरण जाणं हे उपाय आहेत. त्या ईश्वराच्या कृपेने सर्व विघ्न दूर होतात.

---

प्रयत्न करावा अशी बुद्धी असते परंतु त्या प्रयत्नांमध्ये प्रतिबंध निर्माण होतात. बुद्धीचे दोष, शरीराचे दोष, वाणीचे दोष अनेक प्रकारचे दोष आहेत. ते सगळे दोष दूर होतात आणि ती बुद्धी अंतर्निष्ठ होते. साक्षी जो आहे "प्रत्यग् चेतन" त्या साक्षी स्वरु पापर्यंत बुद्धी जाते. तशी निर्मोह, निरहंकार वृत्ती आपली व्हायला हवी. आणि या सगळया एकंदर गुण समुच्चयाने बुद्धी चांगली तयार झाल्यानंतर होणारे श्रवण, मनन, निदिध्यासन याचा उपयोग होऊन आपल्याला आत्मलाभ होतो.

---

आपल्या बुद्धीमध्ये काम, क्रोध, लोभ वगैरे अनंत दोष आहेत. एक दोष गेला की दुसरा निर्माण होतो. इच्छा उत्पन्न होणे हा मोठा दोष आहे. कोणचीही इच्छा न होणे म्हणजे जीवन्मुक्त अवस्था आहे. स्थितप्रज्ञ त्याला म्हणतात.

---

नास्तिक्यबुद्धी भारतीय म्हणता येणार नाही. ईश्वर आस्तिक्य बुद्धी ज्याच्याजवळ आहे तोच खरा भारतीय मग तो कोणीही असो.

---

मार्गदर्शन कुठूनही मिळू शकतं. आपल्या बुद्धीला मात्र जिज्ञासा पाहिजे, उत्कंठा पाहिजे.

---

जीव अनेक प्रकारच्या विषयांच्या ठिकाणी जरी असला तरीसुद्धा बुद्धी गुणदोषरहीत असायला हवी. दोष जावेत बुद्धीतले मनांतले म्हणून ईश्वराची उपासना करायची.

---

ईश्वराची भक्ती ही भारतवर्षामध्ये वाढावी ही संतांची इच्छा आहे. आणि हा खरा बुद्धीवाद आहे.

---

बुद्धीमध्ये उत्पन्न होणारे जे कांही अहंकारादिक दोष आहेत ते दोष कमी झाल्याशिवाय शांती उत्पन्न होत नाही. वासना जितक्या मनांमध्ये अधिक आहेत तितकं मन किंवा बुद्धी चंचल आहे.

---

□

“बुद्धी कर्मानुसारिणी“ पापकर्म झाली तर तशी तामस बुद्धी राहाणार. पुण्यकर्म झाली तर चांगली पुण्यकर्माची वासना असणारी बुद्धी मिळणार. कर्मे चांगली करावीत. चांगली बुद्धी ध्यावी. त्या चांगल्या बुद्धीने पुन्हा चांगली कर्मे करावीत असा मार्ग ज्यांनी धरला आहे त्यांची प्रगती ईश्वराच्या कृपेने होईल. देवाने दिलेली बुद्धी त्या कर्माप्रमाणे मिळणा-या बुद्धीपेक्षा वेगळी असते. ईश्वराने दिलेली बुद्धी कोणती म्हणायची तर ज्या बुद्धीमध्ये ज्या मनामध्ये धर्माचरणाकरता अत्यंत प्रेम वाटतय, आदराने धर्माचरण होतय.

---

शांत बुद्धी राहाणं, सहनशील बुद्धी राहाणं, आपल्याप्रमाणे सर्वांचही कल्याण व्हावं अशी बुद्धी राहाणं, हे सर्व गुण सन्मतीमध्ये येतात.

---

आपल्याकडून पुण्य होत नाही पण ते पुण्यकर्म करताहेत त्यांना पाहून आनंद वाटणे म्हणजे मन तयार होणे. मनाचा, बुद्धीचा उत्कर्ष हा या ठिकाणी आहे. पुण्यकर्म करणा-यांच्याबद्दल आनंद बुद्धीला वाटला पाहिजे. पापकर्म करणारे जे आहेत त्यांच्याबद्दल उपेक्षा वृत्तीचा अभ्यास करायला पाहिजे.

---

सर्वांतर्यामी आणि सर्व बुद्धीला प्रेरक अशी एक शक्ती आहे ही बुद्धीला जाणीव झाली पाहिजे.

---

नास्तिकता जर उत्पन्न झाली तर त्याच्यासारखं दुसरं पाप कोणतच नाही. ती नास्तिकता आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होऊ नये.

---

बुद्धीमध्ये असलेले गुणदोषसुद्धा, बुद्धीसाक्षीच्या सान्निध्यामध्ये असणारी बुद्धी, त्या बुद्धीनेच पहायचे असतात.

---

जीवाची बुद्धी अशी असली पाहिजे की कोणी तरी एक कर्ता पूर्ण शक्तीसंपन्न असा आहे ही भावना जीवाच्या अंत;करणात उत्पन्न व्हायला पाहिजे.

---

संसार, अपवर्ग म्हणजे मोक्ष, दोघांनाही बुद्धीची जरु री आहे. परमार्थामध्येही बुद्धी पाहिजे आणि व्यवहारामध्येही बुद्धी पाहिजे.

---

धीमान् जो आहे त्याला जगामध्ये कोणताही अविषय नाही. सगळया विषयांचं ज्ञान तो संपादन करु शकतो. त्या बुद्धीमध्येही चांचल्य हा दोष असू शकतो.

---

बुद्धी स्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे. बुद्धी स्थिर झाल्यानंतर सर्व संकल्प शक्तीचा विकास होतो.

---

□

अहंकाररहीत असणारी बुद्धी ज्यांची आहे ते सर्व संकल्प संन्यासी असतात.

---

संस्कार या शब्दाचा अर्थ बुद्धीमध्ये असलेले दोष दूर करणे आणि बुद्धी गुणसंपन्न करणे. बुद्धीने गुणदोष कसे पहावेत हेसुद्धा शिकावे लागते. खरे गुणदोष आहेत की नाहीत, की दोषाचा नुसता आभास आहे, हेही आपल्या बुद्धीने पटवून ध्यावे लागते.

---

बुद्धीचे संरक्षण करण्यासाठीच अर्जुनाला गीताज्ञानाचा उपदेश झाला आहे. बुद्धीचे संरक्षण झाले तर समाजाचे आणि पर्यायाने राष्ट्राचे संरक्षण होणार आहे. बुद्धीमान माणसे आग्रही प्रवृत्त पाहून स्वत;होऊन बाजूला होतात. हिताचा विचार करण्याची बुद्धी आम्हाला मिळावी एवढीच प्रार्थना भगवंताजवळ करायची आहे.

---

सज्जनांच्या संगतीने बुद्धीचे संवर्धन होते. बुद्धीविकास कसा करवून ध्यावा हे समजण्याकरता सज्जनांचा आश्रय सांगितला आहे.

---

आस्तिक्य बुद्धी ही मुख्य आहे. त्या शिवाय धर्माचरण होत नाही. धर्माचरण करण्याची बुद्धी अनेक जन्मांच्या पुण्याईनेच उत्पन्न होते. बुद्धीची परिक्षा महात्मेच करु शकतात.

---

बुद्धीच्या बलाने मनाची परिक्षा करायची आहे.

---

अज्ञानामुळे सर्व जग मला समोर आलेले आहे. जग म्हणजे अनेक आहे. तर एक तत्व असतानासुद्धा बुद्धीभेदामुळे अनेकांप्रमाणे वाटायला लागलं. शत्रुमित्र, पुण्यपाप, चांगलं वाईट वगैरे अनेक भास त्यात वाटायला लागले. व्द्वंद्व भासायला लागलं. बुद्धी जशी जशी शुद्ध होत जाईल तसा तसा हा बुद्धीभेद, भास कमी कमी होत जातो. बुद्धीतले सगळे संस्कार कमी झाले पाहिजेत. त्या वेळेला या एकत्वाची जाणीव होते. "तत् पदार्थ शुद्धी" असे वेदशास्त्रकार त्याला म्हणतात.

---

परिप्रश्नांमुळे, जे कांही ज्ञान होण्याकरता प्रतिबंध बुद्धीमध्ये असतात, दोष असतात ते दूर होतात. निर्दोष बुद्धी झाल्यानंतर ज्ञानाचा बुद्धीमध्ये प्रकाश होतो.

---

कर्म करीत असतानासुद्धा ती ईश्वराची आज्ञा आहे, ते वेदविहित आहे अशी भावना हवी. बुद्धीला प्रेरणा करणारी एक पूर्ण शक्ती आहे तिच्या प्रेरणेने माझ्या हातून हे कर्म घडते आहे अशी भावना ठेवली म्हणजे अहंकार निर्माण होत नाही आणि फलदाताही तोच परमात्मा आहे. बुद्धीला नियमन करणारी एक शक्ती आहे. त्या त्या वेळेला तशी तशी बुद्धी बदलती आणि अनुकूल व प्रतिकूल काळ येतो.

---

□

ईश्वराकडून मिळालेली बुद्धी ही स्वतंत्र आहे आणि आपल्या कर्माप्रमाणे मिळालेली बुद्धी ही स्वतंत्र मानावी लागते. सत्संगती मिळाली, चांगल्या कुळात जन्म मिळाला, ही बाहेरची साधनं जरी मिळाली तरी त्यांचा बुद्धीवर परिणाम होत नाही. "बुद्धी कर्मानुसारिणी" म्हणून सिद्धांत आहे.

त्यागाची बुद्धी फार क्वचित पहावयास मिळते. "दाता भवति वानवा" म्हणतात. दान करण्याची बुद्धी फार कठीण आहे. शुद्ध कर्माचरण झाले पाहिजे. उपासना झाली पाहिजे. तर "माझं कांहीही नाही. मी एकटा आलोय. मला एकटं जायचयं" ही बुद्धी होते.

---

कर्माप्रमाणे सुख दु;ख प्राप्त होतात हे बुद्धीला पटणं म्हणजे बुद्धीची शुद्धी आहे.

---

दु;खं आले तरी दूर करण्याचा प्रयत्न नाही. सुखं मिळाले तरीसुद्धा ते टिकवण्याचा प्रयत्न नाही. कांही नाही. ईश्वर स्मरण अखंड राहावे या करता प्रयत्न आहे. हा एक बुद्धीचा प्रकार आहे.

---

शुद्ध बुद्धी अंत;करणात उत्पन्न झाल्यावर देहात्म बुद्धी जाऊ शकते.

---

□

# कर्म विचार

कर्ता ईश्वर आहे, प्रेरक जर आहे तर तोच मुख्य कर्ता आहे. ही बुद्धी दर कर्म करण्याच्या वेळेला राहीली तर फलाची इच्छा होणं शक्य नाही.

---

कर्तृत्व अहंकार जर गेला, कर्तृत्व माझं नाहीये. अनेक लोक कर्म असं कां करत नाहीत ? मी कां करतो ? हा जर मूळ विचार सुरु केला तर बुद्धीला प्रेरणा करणारी कोणाची तरी एक शक्ती आहे, ही ईश्वराची कृपा आहे. नियामक तो आहे. अंतर्यामी आहे. त्याचा प्रेरणेनं आणखी हे कर्म घडतं आहे. यज्ञ असो दान असो भक्ती असो ती प्रथमच जर भावना कर्म करताना मनांमध्ये असेल तर ते ईश्वरार्पण कर्म झालं, शुद्ध कर्म झालं.

---

कर्म करायची आणि त्याचं फल मिळवायचं, ते टिकवायचं. त्याच्या आड येणा-याचा नाश करावा लागला तरी करायचा. पुन्हा कर्म करु न त्या दोषांचं परिमार्जन करायचं. चिखलामध्ये पाय बुडवायचे कशाला अगोदर ? चिखलामध्ये बुडवल्यावर पुन्हा ते धुवायला पाहिजेत. धुण्याची सोय आहे. त्यामुळे पुन्हा जरी चिखलाने माखले तरी पुन्हा धुवून टाकायचे असेच होणार की नाही ?

---

जरी यज्ञयागादिक कर्म झालेली असली तरी पापक्षय कर्माने होत नाही. सकाम कर्माने पापक्षय नाही. ईश्वराची भक्ती झाली, ईश्वरार्पण बुद्धीने जर कर्म झाली तरच पापक्षय होतो.

---

क्रियमाण कर्माचा उपयोग असा आहे की पुढही कांही चांगली कर्म घडतील, विचारपूर्वक जर पुण्यकर्म ईश्वरार्पण बुद्धीने, ईश्वरप्रीतीसंपादक झाली तर त्या योगाने आणखी मागची घडलेली कर्म जी आहेत त्यांचासुद्धा विनाश होऊ शकतो.

---

जी कर्म फलोन्मुख झालेली असतील ज्या कर्माचा परिपाक झालेला असेल अशी कर्म निवडून तो काळ काढतो आणि त्या कर्माचं फल सुरु होतं त्यालाच प्रारब्ध कर्म असं म्हणतात.

---

केव्हांही केलेली कर्म जरी असली त्या कर्माचा नाश कधी होत नाही. कर्माचा भोगानेच नाश आहे हा एक मोठा सिद्धांत मांडला आहे.

---

कर्माचा संबंध संपल्याशिवाय देहसंबंध बंद होत नाही.

* * *

चित्तशुद्धीकरता कर्म करणं ही फार कठिण गोष्ट आहे.

* * *

दृष्ट फलाच्या सिद्धीसाठीसुद्धा काल परिपाक मानावा लागतो. कांही कालानेच त्याचं फल आपल्याला मिळवयं आणि तेसुद्धा जो ज्ञाता आहे, जाणणारा आहे, विचार करणारा आहे, तोच त्याचं फल देऊ शकतो. म्हणजे ईश्वर हाच फलदाता आहे. परंतु कर्मसापेक्ष फलदाता आहे.

* * *

ईश्वराची कृपा संपादन करण्याकडे ज्याची बुद्धी वळलेली आहे, सत्संगती घडली, सन्मार्गाने वागावं, सदाचरण करावं, असं ज्याच्या बुद्धीला पटलेलं आहे असे जे खरे साधू वृत्तीचे असतील ते ईश्वरकृपेने कर्मातून सुटू शकतात.

* * *

कोणचही फळ पाहिजे असो - अभ्युदय पाहिजे किंवा नि;श्रेयस पाहिजे, मोक्ष पाहिजे किंवा संसार पाहिजे, कोणचही फल असो, ते फल जर पाहिजे असेल तर एकदा निष्ठेने ते व्रत घेतल्यानंतर त्याप्रमाणे आचरण अखंड चालू पाहिजे.

* * *

ईश्वराच्या प्रेरणेप्रमाणे मी दान करतो आहे ही बुद्धी असेल तर अहंकार उत्पन्न होणार नाही.

* * *

देव झाला तरी जीवच आहे तो. सर्वही जीवात्म्यांना प्रारब्धकर्माचं फल सुख किंवा दु;ख हे भोगावं लागतं.

* * *

पापकर्म झालं तरीसुद्धा उद्देश चांगलाच आहे, हेतु आमचा चांगलाच आहे असं म्हणून समाधानही मानण्याची वृत्ती होते. त्याकरिता कलीयुगामध्ये पापक्षय होईल असा उपाय नाही असं सांगितलय, सामान्यत; वेदव्यासांनी.

* * *

कर्माने चित्तशुद्धी नाही म्हणतात. चित्तामध्ये अनंत वासना भरलेल्या असल्यामुळे वासनामूलकच कर्म होणार. त्या सर्वही दुर्वासना शांत होण्याकरता शुभ वासना जरी असल्या तरी त्याच्यामध्येसुद्धा अहंकार आहे, आग्रह आहे. हे असं झालं पाहिजे, चांगलं काम आहे. म्हणजे मनाला शांती कांही मिळत नाही म्हणून शुभ वासनासुद्धा चित्तशुद्धीला तितक्या कारण होत नाहीत. म्हणून जगदंबेच्या रु पाचं ध्यान करायचं.

* * *

कोणत्या जन्माचे संचित कर्म प्रारब्ध रु पाने या वेळेला पुढे येणार आहे कांही आपल्याला माहिती नाही. जर तशा प्रकारचं विरु द्ध प्रारब्ध उत्पन्न झालं तर आपला चांगला प्रयत्नसुद्धा प्रतिबंधाने थांबतो आहे. शारिरीक प्रतिबंध उत्पन्न होणं, मानसिक निराशेच्या रु पाने प्रतिबंध उत्पन्न होणं अशा प्रतिबंधामुळे ध्यान होणं कठिण आहे. म्हणून ईश्वराची उपासना, भक्ती, प्रार्थना, त्याचं ध्यान करायचं आहे.

---

ज्ञान होण्याच्या पूर्वी, ते ज्ञान झाल्यानंतरसुद्धा प्रारब्ध संपेपर्यंत आणखी अनुकूल प्रतिकूल काय सुखदु;खाचा भोग ध्यायचा असेल तो भोग ध्यायला पाहिजे.

---

द्रव्यशुद्धी पाहिजे. पवित्र द्रव्य पाहिजे. द्रव्यशुद्धी करण्याकरता मिळिवलेल्या द्रव्याचा शोडषांश म्हणा हा अगोदर दान करायचा म्हणजे द्रव्यशुद्धी झाली.

---

क्रियाशुद्धी म्हणजे आपण जी कांही क्रिया करतो, कर्म करतो त्यात आपल्या बुद्धीने कांही अदलाबदल करायची नाही. दुस-याचा धर्म चांगला आहे असं वाटून आपला धर्म सोडला आणि दुस-याच्या धर्माप्रमाणे आपण वागायला लागलो तर ती क्रियाशुद्धी होणार नाही.

---

चित्तशुद्धीशिवाय आपल्या कर्माचे फल इच्छेप्रमाणे मिळू शकत नाही.

---

स्थान जरी पवित्र असलं तरी स्वत;ची शुद्धीही पाहिजे. मनशुद्धी किती आहे ? कोणते कर्म करीत असताना आपली बुद्धी चांगली सात्विक राहाते का राजस तामस राहाते ? हाही विचार करु न कुठंही जाऊन कर्म करायची असतील तर ती करावीत म्हणतात.

---

पूर्व कर्माने जी अशुद्धी आलेली आहे ते कर्म संपल्याशिवाय जाणार नाही.

---

नुसता यज्ञ करणं आणि ईश्वर प्रीतीकरता यज्ञ करणं यात फरक आहे. ईश्वर प्रीतीकरता झालेला यज्ञ भक्तीरु प होऊन जातो आहे.

---

सबंध आयुष्य हे सत्कर्मामध्ये गेले पाहिजे. प्रयत्न करायचा तर त्या करता सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या शरीराने वाणीने मनाने आपल्या हातून चांगली कर्म किती घडली आणि वाईट कर्म किती घडली याचे निरीक्षण करु न निजावे असे सांगतात.

---

उपरती होऊन आपल्या हातून घडलेले कर्म चांगले झाले नाही असे वाटले तर सुधारणा होण्याची शक्यता आहे.

---

क्रिया अर्पण कशा करायच्या ? क्रिया काय हातात घेऊन देण्यासारखा पदार्थ आहे? कर्म ईश्वरार्पण करणं याचा अर्थ मी करता नाही. प्रत्येक कर्माच्या वेळेला निरहंकार वृत्ती झाली पाहिजे म्हणजे कर्माची शक्तीही संपली. कर्मामध्ये जीवाला जन्म मरण द्यायची जी शक्ती आहे ती गेली. कर्म करताना बुद्धी निरहंकार होणं हीच ईश्वरार्पण बुद्धी आहे. कर्तृत्व आपल्याकडे घेतलं की ते अज्ञानामध्ये जमा होतं.

□□

# ज्ञान

1. अज्ञान, अश्रद्धा व संशय हे तीन मोठे दोष भगवंतांनी दाखवलेले आहेत. तर हे जे दोष आहेत ते दोष जाण्याकरता विचार ही साधना आहे. चिकीत्सा, विचार, मनन ही सर्व प्रमुख साधने दोष निवृत्तीकरीता आहेत.
2. विचारांचा उपयोग दोष निवृत्तीसाठी असतो. निर्दोष चित्तवृत्ती झाली नाही तो पर्यंत ज्ञान होऊ शकत नाही.
3. साष्टांग नमस्कार केला, हात जोडले, तरी नमस्कारच मानला जातो. ते बहिरंग आहे. साधना ही ज्ञानाकरिता सांगितली आहे. प्रणिपातसुद्धा एखाद्या वेळेला आभासात्मक असू शकेल. स्वार्थ बुद्धीने प्रणिपात केला जातो. शंभर वेळा प्रणिपात केलेला आहे, हात जोडणे, मस्तक टेकणे, हा केवळ नमस्कार, प्रणिपात नाही. "मत्त;त्वं उत्कृष्ट; त्वत्त अहं अपकृष्ट; " ही वृत्ती हाच खरा नमस्कार आहे. तो व्यक्त करण्याकरता ही साधना आहे.
4. न्याय शास्त्रामध्ये परत्व आणि अपरत्व हे गुण मानलेले आहेत. पर म्हणजे जेष्ठ आणि अपर म्हणजे कनिष्ठ. ज्या शरीराला कालाचा संबंध अधिक झालेला आहे त्या शरीरास परत्व आहे. ते सापेक्ष आहे. या ठिकाणी लक्ष्मणापेक्षा राम पर आहे, रामापेक्षा लक्ष्मण अपर आहे. दशरथापेक्षा राम अपर आहे. कालाचा संबंध कमी. हे परत्व व अपरत्व, जेष्ठ व कनिष्ठ असे आहेत. चांगदेवांची बुद्धी शरीरापर्यंतच आहे असे म्हणायला हरकत नाही. परत्व अपरत्व त्यांच्या बुद्धीमध्ये उत्पन्न झाले आहे. ज्ञानेश्वर अपर आहेत, कनिष्ठ आहेत. कनिष्ठत्व हा शरीराचा गुण आहे. मृत्युलासुद्धा प्रतिबंध करण्याची शक्ती चांगदेवांच्या बुद्धीतत्वामध्ये उत्पन्न झालेली आहे परंतु अद्यापि पूर्णता नाही.
5. मिथ्या शब्दार्थ म्हणजे जग नाही असे नाही. जग आहे हे सर्वच मान्य करतात. ते सिद्ध कशाला करायचे ? जग नाही असा सिद्धांत सिद्ध होईल तर सर्वच जगाच्या विरुद्ध सिद्ध होईल. त्यामुळे तेही कोणाला पटणार नाही. त्यांना सत्य किंवा असत्य निर्णय करता येत नाही असेच ते म्हणतात. मिथ्या शब्दाचा पारिभाषिक अर्थ असा आहे. सत्य किंवा असत्य निर्णय होत नाही एवढाच त्याचा अर्थ आहे.
6. सर्वोच्च शक्ती जी आहे ती पूर्ण शक्ती प्राय; एकच मानावी लागते. बाकीच्या शक्ती ज्या अपूर्ण आहेत त्या सगळया शक्ती म्हणजे बुद्धी शक्तीच मानल्या गेलेल्या आहेत. विविध बुद्धी शक्ती आहेत. त्या त्या बुद्धी शक्तीमध्ये आणखी अपूर्णता आहे परंतु परिपूर्ण असलेली ईश्वरशक्ती ही एकच आहे.
7. पारमार्थिक दृष्टीने आपले जीवन व्यवस्थितपणे चालावे, आपली बुद्धी ईश्वर तत्वपूर्णत्वापर्यंत जावी असे वाटत असेल तर त्या करिता असंमोहाची आवश्यकता आहे.

8. आत्मतत्वापर्यंत संबंध होणारी बुद्धी परिपूर्ण बुद्धी. ही बुद्धी होण्याकरिता ज्ञानदेवांनी सांगितलेली साधने "थोरपणा प-हा सांडिजे ।
एथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे ।
जै जगा धाकुटे होईजे तै जवळिक माझी ।

कोणत्या वेळी ज्ञानाचा आविष्कार करायचा, कोठे करायचा, कसा करायचा, कोठे करायचा नाही या संदर्भात संयम सांगितला आहे. सगळेच ग्राहक नसतात. तर ज्ञान सोडून द्यावे असे ज्ञानेश्वरांनी कधीच म्हटलं नाही. पण जे ज्ञान आहे, बुद्धीमध्ये उत्पन्न झालेले ते ज्ञान कोणत्या वेळी व्यक्त करायचे, त्याचा उपयोग कोणत्या वेळेला करायचा, कसा करायचा, या संदर्भात संयम दाखवला आहे. ज्ञानेश्वर महाराज "जै जगा धाकुटे होईजे" हे दुसरे साधन सांगत आहेत. त्या ज्ञानाचे हे फळ आहे. बुद्धीने ग्रहण केलेले ज्ञान आणि त्या ज्ञानाचे हे फळ. म्हणजे यथार्थ ज्ञान झाल्यानंतर जितेंद्रियत्व आलेच पाहिजे. इंद्रियांचा संयम होणे हे ज्ञानाचे मुख्य फळ त्यांनी सांगितले आहे. तर हे होणे म्हणजे "जगा धाकुटे होईजे".

9. ईश्वर तत्वाचे ज्ञान झाल्यानंतर शांती हे त्याचे फळ दाखवत आहेत. बुद्धीची तृष्णीम अवस्था होणे, त्या बुद्धीला स्थिरता प्राप्त होणे, वृत्तीशून्य अवस्था होणे यालाच **शांती** असे शंकराचार्य म्हणतात.

10. बुद्धी तत्व आपण आपल्याकडे घेतल्यामुळे मी करतो असे आपण समजतो. परंतु हे सर्व कर्तृत्व ईश्वराचेच आहे ही ईश्वरार्पण बुद्धी ज्या वेळेला निर्माण होईल त्या वेळेला सर्वही कर्म शुद्ध होत्तील. पापपुण्य हा विभाग संपून जातो.

11. चांगल्या वासना नाहीत आणि वाईटही नाहीत. कांही नाही. निर्वासन अंत;करण झालेलं आहे त्या शिवाय शांती प्राप्त होत नाही.
12. जास्ती जास्ती अंतर्मुख वृत्ती होणं, बाह्य विषयांकडे जाणारी मनोवृत्ती कमी कमी होणं याला **उपरती** म्हणतात.
13. देवाचं दर्शन होणं सोपं नाही. अनेक जन्मांचं सुकृत पाहिजे आणि क्रियमाणही चांगलं पाहिजे.
14. कर्तृत्वाभिमान हे एक बंधनाचे कारण आहे.
15. घडून गेल्यावर दु;खं करणं हे कांही ज्ञानी माणसाचं काम नाही. त्याला ते धैर्य असतं. त्यामुळे दु;खाच्या वेळेलासुद्धा त्याच्या मनामध्ये उव्देग नाहीये.
16. भगवंताची सेवा करणा-याला कांहीही दुर्लभ नाहीये. धर्म पाहिजे असेल तर शुद्ध धर्मही मिळेल. अर्थ काम पाहिजे असतील तर तेही मिळतील. मोक्षही मिळेल. तेव्हां आपली बुद्धी कशी बनवायची,

कशी बनली पाहिजे हे सगळं समजूनं घेऊन देवाजवळ मागितलं पाहिजे.

17. अर्थ आणि कामाकडे लक्ष असल्यानंतर ईश्वराचं भजन वगैरे घडणार कसं ? जास्तीत जास्त अर्थासक्ती आणि विषयासक्ती ही मनामध्ये उत्पन्न झाली म्हणजे कांही नाही.

18. पुण्यकर्म केलं म्हणजे शेवटपर्यंत त्याच्या हातून पुण्यच होईल असही सांगता येत नाही. पापकर्मामध्ये जरी तो निमग्न असला, विषयासक्त असला तरी तो शेवटपर्यंत तसाच राहील असेही नाहीये. ईश्वराची कृपा ही कोणत्याही व्दाराने, कोणत्याही रु पाने होऊ शकते आणि त्याची वृत्तीही बदलून जाऊ शकते.

19. शब्दज्ञान जरी असलं शास्त्राभ्यासाचं, तरी तिकडे लक्ष असल्यानंतर बाहेरच्या संसाराची विस्मृती होऊन जाती. भुकेची शुद्धी नाही, तहान नाही कांही नाही. साधन चतुष्टय संपत्ती उत्पन्न झालेली आहे. श्रवणाला सुरवात झालेली आहे, आत्मविचार सुरु झालेला आहे. जे ज्ञान मिळवलेलं आहे ते शुद्ध करण्याकरता मनन करायचं आहे. योग्य कोणचं आहे, खरं आहे की नाही या करता आणखी मनन सांगितलं आहे. अनेक युक्ती मनामध्ये आणून गुरुं च्यापासून समजून घेऊन आपल्या मनामध्ये जर आणखी कांही विरु द्ध विचार उत्पन्न झाले तेही विचार गुरुं च्या जवळ मांडून त्याप्रमाणे मनन होऊ शकतं. आणि त्या मननाने शुद्ध ज्ञान दुस-या भूमिकेवर मिळतं आहे.

20. निर्गुण निराकार आत्मतत्व कसं आहे याचं ध्यान सुरु झालेलं आहे. बाकीचे विषय सगळे संपलेले आहेत. पक्का आणखी निश्चय झाला आणि त्याचं, वस्तूचं ध्यान सुरु झालेलं आहे तर ते ध्यान सुरु झाल्यानंतर निदिध्यासन म्हणजे ध्यान भूमिकेवरती असताना कर्माचा संबंध पूर्वीच सुटलेला आहे.

21. ध्यानाची पुढची भूमिका म्हणजे समाधी आणि नंतर साक्षात्कार आहे. असं आत्मस्वरु पाचं ज्ञान झाल्यानंतर मी असंग आहे, देहाचा संबंध नाही, देहाला उद्‌देशून आणखी सगळे वर्ण आश्रम वगैरे सांगितले आहे. तेव्हां कशाशीही माझा संबंध नाही हे आणखी तत्वज्ञान सांगितलं आहे. साक्षात्कार झाल्यानंतर तिथं कर्माची भूमिका संपते म्हणतात, आचार्य. उरतील कशी कर्म ? ज्ञानीही आहे आणि अज्ञानीही आहे, व्यवहारही करतोय असं होणं शक्य नाही अशी त्यांनी एक भूमिका मांडली आहे.

---

22. साधन चतुष्टयामध्ये उपरती म्हणून जे एक साधन आहे. उपरती याचा अर्थ व्यवहारक्षय. व्यवहार सगळा थांबलाय. कुठही व्यवहाराकडे लक्ष नाही. अंतर्मुख वृत्ती झालेली आहे. बाहेरची मनोवृत्त सगळी आंत आलेली आहे आणि आंतच त्याचे

चिंतन चाललेलं आहे. हे आरंभाला. तो जर पुढं श्रवण मनन निदिध्यासन या ज्ञान भूमिका प्राप्त करु न घेऊ शकला तर त्यालासुद्धा आणखी कांही दु;ख नाही. तो नेहमी समाधीमध्ये निमग्न आहे.

---

23. संतांची संगती मनापासून झाली पाहिजे. त्यावेळेला मनामध्ये संसाराची आसक्ती असून उपयोग नाही. संसारातून मी केव्हां सुटेन असं वाटले पाहिजे आणि तशा इच्छेने जर संतांची संगती घडली तर त्या संगतीचा उपयोग होतो, म्हणाले. त्याचं आचरण निर्लोभ वृत्ती आहे. मानसन्मानाची इच्छा नाहीये. अनासक्त जीवन आहे. कुठही लक्ष नाही. हे नुसतं पाहूनच मनावर परिणाम होत आहे. त्या दृष्टीनं पाहिलं पाहिजे. नाही तर त्यांच्याजवळ राहिल्यावर आपल्यालाही पुष्कळ मानसन्मान मिळतो आहे, आपल्यालाही पुष्कळ अर्थ काम वगैरे प्राप्ती होती आहे ही इच्छा मनांत धरु न जर संतांची, श्रेष्ठ पुरु षांची संगती झाली तर त्याचा कांही उपयोग होणार नाही.

---

सत्पुरु षांच्या संगतीचे महात्म्य आहे. ती संगती जर झालेली असेल, भगवंताची जरी अवकृपा असेल तरी कृपा ते उत्पन्न करु न देतात. त्यांचे वचन भगवंतालासुद्धा मोडता येत नाही. त्यांचेही सामर्थ्य आहे म्हणून त्यांच्या संगतीने भगवत भक्ती निर्माण होते. चित्त शुद्ध होतं आहे आणि तो जीव, युग स्वभाव कसाही असला तरी त्यातून तो मुक्त होतो.

---

वैराग्य आहे, आसक्ती नाही. संसारात मन कधीही गुंतलेलं नाहीये. कांही त्या मनाला चिंता नाही संसाराची. हे एक सत्वगुणाचं लक्षण आहे. त्याच्याजवळ सत्व आहे. क्षांती म्हणजे क्षमा आहे.

---

ईश्वराच्या कृपेनं ज्याचं चित्त शांत आहे, जो क्षमशील झालेला आहे, सहनशीलता हा त्याचा स्थायी भाव असतो. आणि ते सत्वगुणाचं एक स्वरु प आहे. तीसरं औदार्य म्हणून सांगतात. उदार मन हे मोठं आहे. दुस-याला दान देताना इतकं कशाला आणि तितकं कशाला हा विचार त्याच्या मनामध्ये कधीही येणार नाही. केव्हां येतं हे ? द्रव्य माझं आहे, मी मिळिवलेलं आहे म्हणजे जोपर्यंत द्रव्यावर स्वामित्व, ममत्व आहे तोपर्यंत इतकं कशाला द्यायचं, थोडं दिलं तर चालणार नाही का, ही तक्रार मनाची होते. परंतु सर्वच ईश्वराचं आहे, ईश्वरानी सगळं निर्माण केलेले आहे हीभावना जिथे आहे, तिथं दान करणा-याला ममत्व किंवा अहंकार कधीही उत्पन्न होत नाही.

---

काम, क्रोध, लोभ वगैरे जे विकार आहेत ते मनांमध्ये उत्पन्नच होऊ नयेत. राग आल्यानंतर घालवला हासुद्धा कमीपणा आहे. शांती म्हणत नाहीत त्याला. राग

येणारच नाही, कोणी कसाही कितीही अपमान केला तरी राग बिल्कुल मनामध्ये येणार नाही, त्याच्याजवळ खरी शांती आहे.

एकदम आत्मज्ञान देऊन उपयोग नाही. या सगळया कर्मातून जायला पाहिजे. परिपक्व व्हायला पाहिजे. ज्ञान काय, कर्म काय सगळंही पक्व व्हायला पाहिजे.

देहाचा संबंध नसल्यानंतर नुसतं सूक्ष्म शरीरही कार्य करु शकतं. ब्रम्हज्ञानी महात्मे कदाचित जर कांही वासना शिल्लक राहीलेल्या असतील तर ते त्या सूक्ष्म शरीरानेच कार्य करीत असतात. वाटेल त्या लोकामध्ये जाऊ शकतात. सर्व सामर्थ्य त्यांना मिळालेलं असतं आणि सर्व ठिकाणी जाऊन ते कार्य करतात. प्रारब्ध शिल्लक पाहिजे मात्र. प्रारब्ध शिल्लक असेल तर हे कार्य होणार नाही तर ज्ञान झाल्याबरोबर देह संबंध सुटला की संपलं पुन्हा. देह नाही कांही नाही. ब्रम्हरु प तो होऊन गेलेला आहे. ब्रम्हज्ञानी पुरु ष हा ब्रम्हरु प होऊन जातो म्हणजे देहरु पी उपाधी संपलेली आहे. देह म्हणजे सूक्ष्म देही त्यात आला.

स्वर्ग जसं स्थान आहे तसं मोक्ष नांवाचं स्थान नाही. आत्मस्वरु पाला तर जाणं येणं नाही. वस्तुत; मग मुक्ती याचा अर्थ काय ? परब्रम्हाच्या ठिकाणी विलीन होऊन जाणं देह उपाधी रहित होण.

चित्तशुद्धी प्रत्येक कर्माला आवश्यक आहे. ती चित्तशुद्धी होण्याकरिता भगवती जगदंबेचं ध्यान आणखी, वाणीनं नामस्मरण हे साधन जो करील तो कलीयुगामध्ये जरी जन्माला आला तरी कलीच्या स्वभावाप्रमाणे त्याला कांही दोष लागणार नाही. उलट अनेक जन्मांची जी संचित कर्मे आहेत त्यांचा नाश होऊन जाईल आणि तो मुक्त होईल. त्याला कलीयुगात राहूनही मुक्ती मिळेल. मध्ये येणारी विघ्ने दूर करण्याची जबाबदारी ईश्वरावरच टाकलेली आहे त्याने.

जे जे सत्य कर्म आपल्याकडून घडतं त्याचं निश्चित फळ मिळते. त्याप्रमाणे सत्याची प्रतिष्ठा झाली तर त्याचे फळ मिळते. शरीराने, मनाने, वाणीने सत्यनिष्ठ राहाणे म्हणजे मनानेच मनाचा निग्रह करणे. इकडे लक्ष पाहिजे. मनामध्येसुद्धा असत्य येऊन उपयोग नाही. मनाच्या निग्रहाने वाणीचा निग्रह शक्य आहे. त्याचप्रमाणे शरीराचा निग्रह.

प्रपंच्यामध्येही विवेक पाहिजे आणि परमार्थामध्ये तर पाहिजेच पाहिजे. एखाद्याकडे पैसा पुष्कळ असेल. सत्ता असेल. मानसन्मान असेल पण विवेक जर नसेल तर त्याला स्वत;लाही शांती नाही मग तो इतरांना शांती समाधान काय देऊ शकणार ?

□□

मनुष्य जन्म जो आहे तो अत्यंत विवेकसंपन्न आहे. आपल्याला विवेक संपादन करता येतो, वाढविता येतो आणि त्या विवेकाच्या बळावर पुढची सर्व साधनं जी आहेत ती सर्व आपण प्राप्त करु न घेऊ शकतो.

---

दु;खाची पूर्ण निवृत्ती मानवाला करु न घेता येणे शक्य आहे. मानव जन्म मिळाल्यावर ही सगळी साधनं करता येतात. हा विचार मनामध्ये पक्का झाल्यानंतर त्या साधनांना आरंभ होतो.

---

अहंकाराने लोकांचा अपमान करण्याची बुद्धी उत्पन्न होते. मानापमानाच्या कल्पना मनामध्ये, बुद्धीमध्ये जो पर्यंत आहेत, तोपर्यंत क्षमेचा अभ्यास होत नाही.

---

एवढा अयोध्येचा राजा असून चटईवर निजत होता पण नाही. शरीराला सोख्य नाही. ज्या शरीराच्या निमित्ताने रामचंद्रांना दु;ख कष्ट भोगावे लागले, त्या शरीराला सुख मिळणार नाही हाही मनाचा निग्रह आहे. या मनाच्या निग्रहाला वैराग्य म्हणतात.

---

स्वत;चे आत्मनिरिक्षण हे मुख्य सांगितले आहे. अंत;करण जे सारखं जे बाहेर जातय त आंत गेलं पाहिजे. त्या अंत;करणाने स्वत;चेच जर परीक्षण केलं तर शुद्धी शक्य आहे.

---

मोठं होणं याचा अर्थ अंत;करणातले रजोगुण, तमोगुण कमी झाले पाहिजेत. त्या शिवाय मोठेपणा नाही.

---

"उद्धरेत्मानात्मानम"ृ हा महत्वाचा सिद्धांत आहे. आपला आपण उद्धार करु न ध्यायचा म्हणजे आपल्या मनाचे निरीक्षण रोज केले पाहिजे. पशुप्रमाणे मी वागलो आज, की सत्पुरु षाप्रमाणे माझं वर्तन झालं आहे ? हेही विचार करु न शांत झोप येते नाही तर येत नाही. माझ्याविरु द्ध जो वागला आहे, त्याला सरळ कसं करता येईल असे विचार जर मनांत आले तर झोप येणारच नाही. म्हणून खरा आपला उद्धार आपणच करु न ध्यायचा.

---

मनांत अनेक प्रकारच्या वासना असतात. अशुभ वासना मनांत असतील तर पापाचरणाकडे प्रवृत्ती होती. नाही असं नाही. पण ते आवरावं. राग येणार नाही असं नाही. राग यायचाच. आपल्या इच्छेप्रमाणे वाग- णा-यांबद्दल राग येणं स्वाभाविक आहे. पण राग आवरण्याकरता प्रयत्न करायचायं. राग आवरत नाही असं होऊ नये. आवरता आला पाहिजे. नाथ महाराज म्हणतात, राग येऊच नये. पण ती त्यांची योग्यता आहे. संतांनी शांतीचा इतका अभ्यास केला आहे की त्यांना राग येतच नाही.

---

वासना अंत;करणामध्ये असेपर्यंत भीती आहे संत महात्मे निर्भय झालेले असतात.

---

देह असेपर्यंत मात्र शुद्ध बुद्धीने परमेश्वराचं चिंतन करणं, ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागणं एवढं आपण आपलं कर्तव्य करायचं आहे.

---

भगवान म्हणतात “ज्ञानी भक्त आणि मी यांच्यात अंतर नाही“ तो हा ज्ञानी भगवत् भक्त आहे, निर्वासन अंत;करण ज्याचे झालेले आहे. म्हणजे जीवात्मा तो राहीला नाही. जीव दशा संपली. पुन्हा जन्म मृत्यु कांही नाही. वासना नाही तर कर्म कुठली येणार ? वासनेमुळे कर्म होते. त्या कर्माचे फल भोगण्यासाठी नवीन शरीर धारण करणे भागच आहे. तेव्हां हा सर्वही आणखी कर्मक्षय होणे, कामक्षय होणे, मनोनाश होणे, मनोनाश याचा अर्थ मन शांत झाले आहे. त्याची बुद्धी अत्यंत स्थिर झाली आहे. कोणच्याही गुणांमध्ये गुंतलेली नाही.

---

बालांच्याप्रमाणे वृत्ती झाली पाहिजे असे म्हणतात. ज्ञान माणसांनी बाल्याचा अभ्यास करावा. बाल्य याचा अर्थ रागव्देषरहीत. लहानमुलांचं भांडण आपसात होतं. पण पुन्हा मनामध्ये कांही राग नाही, व्देष नाही, कांही नाही. पुन्हा आणखी परस्परांची मैत्री कायम आहे. हा गुण आहे. म्हणून ज्ञान प्राप्त झाल्यावरसुद्धा बाल्य यावं.

---

वाङ्मय तपाचं महत्व सांगताना भगवान सांगतात, “कोणाच्याही मनाला उव्देग वाटणार नाही असं बोलायला शिका“ वाणीचा निग्रह तसा करावा. सौम्य वाणी पाहिजे. हे तप आहे. तपश्चर्या म्हणजे काय निराळी केली पाहिजे असे नाही. सत्य वाणी पाहिजे, प्रिय वाणी पाहिजे आणि हितकारक सांगता आले पाहिजे.

आचरण घडायला चांगले प्रारब्ध पाहिजे. शुद्ध भाव पाहिजे. शुद्ध अंत;करण पाहिजे. तर अशी तपश्चर्या संसारात राहूनसुद्धा करता येण्यासारखी आहे. पण तशी भावना पाहिजे. तसं लक्ष पाहिजे तिकडं, कसं बोलतो आपण ? म्हणून अगदी विचार करु न बोलावे. अविचाराने कधी बोलू नये.

---

मनांतले सर्व विषय बाजूला करु न एकाग्रता प्राप्त करु न घेता आली पाहिजे तर ध्यान सिद्ध होतं. ध्यानाचा परिपाक म्हणजे समाधी अवस्था. ध्येयाकार चित्त झाल्यावर त्या पदार्थाचे प्रत्यक्ष ज्ञान होते त्या संयमाने. ध्यानावस्थेसाठी अंत;करण अत्यंत विशुद्ध झाले पाहिजे. कोणचाही मल किंवा दोष त्या चित्तात राहून उपयोगी नाही.

---

तप म्हणजे चिंतन करणं. परमेश्वराच्या गुणांचे, कर्माचे, स्वरु पाचे, नामाचे चिंतन करणे, विचार करणे. म्हणजे दुसरीकडे चित्त नाही. संसारी असून संसार मनामध्ये नाही. ही स्थिती प्राप्त करु न घेतलेली असते. कांहीही अहंकार नाही. अहंकार जाण्याकरीता ईश्वराचे चिंतन झाले पाहिजे.

---

मनन म्हणजे मनाने विचार करायचा. वेदांत शास्त्रामध्ये मनन करायला सांगितले आहे. एकट्याला जर तशी विचार करण्याची बुद्धी असेल, तर एकट्यानेही विचार करावा किंवा समानशील जी मंडळी आहेत, भक्ती आहे, जिज्ञासा आहे त्या चार मंडळींनी मिळून मनन करावे, चिकीत्सा करावी. एकट्याने करावी, सर्वांनी मिळून करावी. चिकीत्सा करु न योग्य अयोग्य निर्णय करु न अयोग्य सोडून द्यायचे आणि योग्य तेवढे बुद्धीमध्ये ठेवायचे हे करता आले पाहिजे. विवेक साधला पाहिजे.

नित्य काय आहे अनित्य काय आहे, काय प्रमाणे त्याच्याबद्दल आहे, असा सगळा विचार आहे.

---

सुखदु;ख कसे कळते? अर्थात् "मी सुखी आहे " किंवा "मी दु;खी आहे" हे समजण्याचे साधन मन आहे. त्याकरता मन हे स्वतंत्र इंद्रिय आहे. त्या मनाची शक्ती फार मोठी आहे. सर्व वासना त्या मनामध्ये निर्माण होतात. सर्व संस्कार त्या मनावर होतात. कांही नको असलेले काढता येतात. कांही चांगल्या संस्कारांची भर घालता येते हे कार्य चाललेले आहे. मनाकडूनच चाललेले आहे म्हणून मनालाच बोध केला समर्थांनी.

---

मानसिक शक्तीचा विकास हा जर व्हावा अशी इच्छा असेल तर ही सगळी बाहेरची इंद्रिये नियमित बनवली पाहिजेत. ती मनाने नियमित बनवायची आहेत.

---

वैय्यक्तिक शक्ती कितीही तपश्चर्या करु न मिळवलेली असली तरी ती प्रसंगाला कार्य करु शकत नाही. मारु तीराय ईश्वरशक्तीशी एकरु प झाले आहेत. ईश्वरशक्तीचा पाठिंबा त्यांना आहे. आपली शक्ती ते विसरु न गेलेले आहे त्यामुळे निर्भय झालेले आहेत.

---

तळमळ जर मनामध्ये उत्पन्न झाली तर साक्षात्कार होऊ शकतो, इच्छा पूर्ण होऊ शकते.

---

अध्यात्म विद्या मिळेल समजेल पण अनुभवात्मक जे ज्ञान आहे ते शेवटचे ज्ञान आहे. जे अनुभवात्मक ज्ञाश्न आहे त्याचे फल आचार्य महाराज असे सांगतात की त्या ज्ञानाने इंद्रियांची शांती झालीच पाहिजे. ते ज्ञान म्हणजे ईश्वर स्वरु प साक्षात्कार

---

बाहेरच्या एकंदर सर्वही विश्वाला परमात्मरु पाने पहाणे ही ज्ञानी मनुष्याची लक्षणे आहेत आणि जो अज्ञानी आहे तो प्रत्यक्ष गुरुबुद्धी ज्या ठिकाणी ठेवायची, त्या प्रत्यक्ष गुरुं कडेसुद्धा देहबुद्धीने पहातो. म्हणजे माझ्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये अंतर नाहीच आहे असा विचार त्याच्या मनांत आपोआप येतो. ज्ञानेश्वर महाराजांची दृष्टी व्यापक आहे. वय देहाचे आहे या वयाला कांहीही महत्व नाही. जे दिव्य ज्ञान आहे, त्या दिव्य ज्ञानाचे महत्व आजही लोकांना पटते आहे.

उपनिषद वाक्य हे ईश्वराचे वाक्य आहे. त्याने सर्वही ईश्वर स्वरु पाचे प्रतिपादन केलेले आहे. आत्मस्वरु प कसे आहे हे सगळे मांडून दाखवले आहे. आता यापैकी आम्हाला जीव आणि आत्मा याची कल्पना नाही. स्वत; जीव शरीरामध्ये असतानासुद्धा देहामध्ये राहाणार मी एक स्वतंत्र जीव आहे याचीसुद्धा कल्पना आम्हाला येत नाही. ती कल्पना आल्याशिवाय धर्माचरण म्हणा ईश्वरभक्ती म्हणा हा पुढचा मार्गच नाही. देहात राहाणारा देही निराळा आहे हे आधी समजायला हवे.

---

बुद्धीवादाला ऐहिक म्हणजे एका जन्मांत सर्व मिळाले पाहिजे ही फक्त बाजू नाही. अन्यायाने वागणे हरकत नाही पण हाच आमचा शेवटचा जन्म आहे, पुढे येणार नाही

अशी जर खात्री असेल तर हा देह टिकवण्याकरता अन्यायाने वागायला हरकत नाही. पण हे शक्यच नाही. जीवनदशा ज्याला आहे, जन्माला जो येतो त्याला मृत्यु येणारच आणि पुन्हा जन्म घ्यावाच लागणार. मग अन्यायाने वागण्यापेक्षा न्यायाने वागून पुढच्या जन्मांत अधिक उन्नती करु न घेण्याकरता प्रयत्न करायला काय हरकत आहे ?

---

संसारनिवृत्ती सूक्ष्म शरीराचा नाश झाल्यावर होते. जीवभाव संपतो. तोपर्यंत अध्यस्त* सर्वही सूक्ष्म शरीर घेऊन जीवात्मा राहातो आहे. त्याची सगळी कार्ये आपल्या ठिकाणी घेतो आहे. ज्ञानात्मक, साक्षात्कारात्मक जी भगवत् भक्त आहे, शेवटची म्हणा किंवा अशा प्रकारची सर्व इंद्रियांची प्रवृत्ती त्या ठिकाणी लागली म्हणजे ती ज्ञान पर्यवसायिनी झाली. तो पर्यंत ही सर्व इंद्रिये, मन, बुध्दी, प्राण वगैरे भौतिक असूनसुध्दा राहात असतात.

---

ब्रम्हज्ञान झाल्यानंतरसुध्दा ते दृढ होण्याकरता तत्वज्ञान, मनोनाश, वासनाक्षय यांचा अभ्यास चालू ठेवला पाहिजे म्हणतात. म्हणून चौथ्या भूमिकेवर जरी ज्ञान झाले असले तरी पांचवी व सहावी भूमिका अद्याप आहे. व्युत्थानदशा त्याच्यामध्येसुध्दा आहे. तोपर्यंत ज्ञान झालेले असते. तरीसुध्दा समाधीला प्रतिबंध आहे. ईश्वरप्रणिधानाने ज्ञान झालेलं आहे. परंतु कार्य अद्यापि पुढे आहे ना ! अंतराय मध्ये मध्ये येत आहेत. त्यामुळे वासनाक्षय आणि मनोनाश होणे याची जरु री आहे. समाधी अवस्थेमध्ये जीवन्मुक्ती सौख्य आहे. ती व्दंव्दातीत अवस्था आहे. पण सुषुप्ती अवस्थेप्रमाणे तीही अवस्था झाली ना ! कांही काळ टिकणारी झाली. अद्यापि कर्म पारतंत्र्य सुटलेले नाही. ते कर्म पारतंत्र्य पूर्णपणे जाण्याकरता सर्वही मनोवृत्तींचा लय होणे याची जरु री आहे. मनोनाश झाला पाहिजे.

---

व्दंव्दातीत अवस्था म्हणजे व्दैतभाव जाऊन व्दंव्दातीत होणं. ही अतिशय कठिण आहे. व्दैतभान होत असेल तर पुन्हा मनोवृत्ती तिथे गेली तर काय करायचे ? म्हणून ईश्वर प्रणिधानाचा अभ्यास असला पाहिजे. ज्ञानाच्या वेळेलासुध्दा ईश्वरभक्तीची जरु री आहे असे शास्त्रकार सांगतात.

---

अग्नीला आकार कुठे आहे ? पण अग्नीला काष्ठाचा आकार येतो की नाही ? तसं निराकार ईश्वराला आकार दिला तर बिघडलं कुठे ? तो कांही स्वाभाविक आकार नाही औपाधिक आहे.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे ।
ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. दोन्ही रु पं एकच आहेत. एकत्वाच्या अनुसंधानामुळे शोक मोह सगळे दूर होतात.

---

बाह्य विषय हे सगळे विसरु न जाणे हे अंतिम समाधान आहे. निर्विशेष समाधान हे सामुदायिक शक्तीचा आविर्भाव झाला म्हणजे मिळते.

---

वासना कोणतीही असू नये म्हणतात. वासना ही मोक्षाला प्रतिबंधक आहे. आकांक्षारहित मन होणे हीच मुक्ती आहे.

---

“अहम् “ नाही हा एक भारतीय संस्कृतीचा मोठा विशेष आहे. ज्यांच्या मनामध्ये पूर्ण संयम आहे, ज्यांच्या मनामध्ये खरे वैराग्य उत्पन्न झालेले आहे त्यांच्यामध्ये असणारी शक्ती सर्वांना उपकारक असूनसुद्धा ज्ञानदेवांना स्वत;ला अभिमान नाही हे तर फारच मोठं आहे.

---

सगळं मिळालेलं आहे पण विनाशी आहे. कोणचेही स्थिर राहाणारे नाहीये. हा एक विचार उत्पन्न झाल्याबरोबर विरक्तता निर्माण होते.

---

ईश्वराच्या सृष्टीत ईश्वराच्या कृपेने आपल्याला मनुष्य देह मिळालेला आहे आणि मनुष्य देह हाच संसार सागरातून तरु न जाण्याचे पहिले साधन आहे. मनुष्य जन्म केंव्हां संपेल याचा नेम नाही. या जन्मामध्ये ईश्वराची, सद्गुरुंची सेवा झाली पाहिजे तर मानव कृतार्थ होऊन जातो.

---

निर्वासन अंत;करण आहे. संसाराचीही वासना नाही आणि परमार्थाचीही वासना नाही. वासना पाहिजेच कशाला ? सर्वज्ञ परमात्मा आहे. त्याच्या कृपेने यथासंभव सर्व होऊन जाते.

पांढरी वस्त्रे टाकून भगवी वस्त्रे धारण केली म्हणजेच संन्यास झाला असे नाही. पूर्ण वैराग्य मनामध्ये निर्माण झाले असले पाहिजे. संसाराची आठवणसुद्धा राहून उपयोगी नाही.

---

केवळ प्रारब्धवादही उपयोगी नाही. शास्त्राने सांगितलेली भगवत् भक्ती, नामस्मरण, ध्यान धारणा वगैरे शास्त्रीय प्रयत्नांनी अनेक जन्मांच्या पातकांचा नाश होऊ शकतो. पापक्षय झाल्यानंतर चित्त स्थिर होऊ शकते आणि स्थिर चित्ताने जर ध्यान सुरु झाले तर त्या पुण्याला कांही अंतच नाही.

---

सत्कर्म योगे वय घालवावे ।
हे समर्थांनी म्हटल्याप्रमाणे कांही तरी पुण्यकर्म रोज घडले पाहिजे. तेच आपल्याबरोबर येणार आहे. पैसा अडका किंवा कीर्ती बरोबर येत नाही.

---

देवाची सेवा करणा-याने हे लक्षात ठेवले पाहिजे. सेवा करायची पण त्याबद्दल कांहीही देवाजवळ मागायचे नाही. देव देत असेल तरी घ्यायचे नाही.

हे जीवन फार लहान आहे. त्या लांबच्या प्रवासामध्ये कांहीही सोय करु न ठेवता येत नाही. त्या करता कांही तरी ईश्वराची कृपा आपल्याजवळ असावी म्हणजे त्या कृपेने त्याही मार्गामध्ये आपल्याला सुखी राहाता येते. दु;ख त्या ठिकाणी होत नाही.

देव, दैत्य म्हणजे सत्वगुण, तमोगुण आणि रजोगुण. हे आपल्या मनामध्ये आहेत. आणि त्यांचा परस्पर संघर्ष अखंड चालू आहे. मनाची प्रवृत्ती संयत असेल, संयमाने प्रयत्न केलेला असेल तर त्याला ईश्वराचे सहाय्य असते. देह, मन, बुद्धी या सर्वांच्या पलीकडे तो सर्व साक्षी जो मी आहे त्या मीपर्यंत जाता येणं, ही विज्ञानाची मोठी भूमिका त्याला प्राप्त करु न देणं हे ईश्वराच्या सहाय्याने शक्य आहे.

जगदाभास म्हणजे सगळा व्यवहार दृढ होतो. परमात्मा आवृत्त झाला, आच्छादित झाला तर अज्ञानाचे कार्य म्हणजे आभास, सगळा व्यवहार तिथे येतो आणि तोच जर प्रगट झाला तर तो विश्वाभास नाहीसा होतो.

कर्मपाशातून मुक्त होण्याकरता परमेश्वराचे चरण हेच साधन आहे.

नुसता विषयांचा त्याग बाहेरु न करणे म्हणजे त्याला त्याग म्हणत नाहीत. मनांतल्या सगळया वासना गेल्या पाहिजेत.

शांत अंत;करण असले म्हणजे आनंद आहे. आम्ही विषयांचा संबंध मिळावा, विषयांपासूनच आनंद मिळतो अशा समजूतीने संग्रह करण्याच्या मागे लागलो आणि त्यावेळेला आनंद गेला हातचा.

जरी कोणाकडूनही आपल्याला उपसर्ग झाला तरीसुद्धा धैर्य अंत;करणामध्ये धारण करु न आपला मार्ग त्या साधकाने सोडू नये. वृक्षरु पी पृथ्वी आहे, पर्वतरु पी पृथ्वी आहे, सर्वस्व देऊन टाकतात. ते वृक्ष काय ठेवतात काय ! फळं फुलं तोडून सगळं नेले तरी कांही बोलत नाहीत अशी वृत्ती पाहिजे. तितिक्षेचा अभ्यास.

इंद्रियांना प्रिय जे आहे त्याच्यावर संतुष्ट न राहाता जे आपल्याला ज्या वेळेला मिळेल त्याच्यावरती संतुष्ट राहाण्याचा अभ्यास हा प्राणाचा, प्राणवृत्तीचा अभ्यास आहे.

स्वाभाविक असंग वृत्ती जी आहे त्याचं चिंतन केलं पाहिजे. आत्मस्वरु प, आपल्याला वस्तुत; कशाचाही संबंध नाही, होऊ शकत नाही, आकाशाप्रमाणे आहोत. आत्मतत्व,

ब्रम्हतत्व हे निर्दोष आहे आणि जे स्वभावत; निर्गुण आहे त्याचं जर चिंतन सुरु केलं तर आसक्त होत नाही.

---

संग्रह साधकाला करता येत असेल तर करावा. परंतु त्याचा त्यागही केला पाहिजे म्हणजे आसक्ती मिटली. उद्देशच तसा. त्यागाकरताच अर्थ संग्रह आहे. त्यागाकरता केलेला संग्रह हा गुन्हा नाही. पण स्वत;करता केलेला संग्रह हा दोष आहे.

---

दु;खाकरता प्रयत्न कोणीही करत नाही. पण दु;ख मिळतं. तसच सुखही मिळू शकतं. प्रतिकूल परिस्थिती झाली म्हणून विषाद अंत;करणामध्ये वाटतो आहे. निराशा अंत;करणात वाढली आहे असं नाही. तर अंत;करण शांतच राहायला हवं.

---

धनाची आशा करण्यापेक्षा तो जो शरिरस्थ आत्माराम आहे त्याचे जर चिंतन केलं तर किती तरी सुख मिळेल. दु;खाचं कारण आशा हे आहे. हे मिळावं, ते मिळावं, अशी सोय व्हावी, तशी सोय व्हावी, संपत्तीच्या बाबतीत, संततीच्या बाबतीत आणि सत्तेच्या बाबतीत आशेला अंत नसतो.

---

जो ज्ञानी झालेला आहे तो चिंतारहीत आहे. आणि जो पूर्ण अज्ञानी म्हणजे लहान बालक त्याला चिंता नाही. बाकी सगळे मधले चिंताग्रस्त आहेत.

---

अनेक कांकणे कुमारीच्या हातात होती त्या वेळेला आवाज होत होता. अनेक साधक मंडळी जर एका ठिकाणी राहीली आणि साधना करु लागली तर त्यांच्यामध्ये कलह निश्चित होणार. प्रत्येकाचे विचार निरनिराळे असतात. काय आचरण करायचे, साधना करायची, ते एकटयाने केले पाहिजे.

---

माणसाच्या सुखदु;खाला खरे कारणीभूत असते त्याचे मन. हे मनच मायेच्या आहारी जाऊन विविध कर्मे करायला लावते आणि कर्मानुसार जन्म मरणाच्या फे-यात ढकलते. मन हाच खरा शत्रू आहे. त्याला जिंकायचे सोडून आपण बाहेरच्या शत्रू मित्रांच्या मागे लागतो.

---

पारमार्थिक प्रयत्न हा तर किती तरी मोठा प्रयत्न आहे. अनेक जन्म हा अभ्यास करावा लागतो. स्वरु पाचे ज्ञान झाले की संसार मनांतला संपला. संसारातली बुद्धीही संपली आणि जीवभावही संपला. एकदम कसा संसार नको म्हणता येईल आणि नको म्हटलं तरी तो सुटणार थोडाच आहे ? तोंडानी नुसतं संसार नको म्हणायचं आणि मनांत संसार असायचा, काय उपयोग आहे ? हा व्दंव्दात्मक संसार आहे. केवळ सुख नाही आणि केवळ दु;खही नाही.

---

आपली जर योग्यता नसेल तर प्रत्यक्ष ईश्वर दर्शन होऊनसुद्धा एखादा जीव कल्याण करु न घेऊ शकेल की नाही हे सांगता येत नाही. आत्म निरीक्षण करा, त्याचा अभ्यास रोज करा म्हणजे आपल्याला समजून येईल की आपल्याजवळ किती दोष आहेत.

---

मी म्हणजे कोण ? देह म्हणजे मी. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमयकोश, सगळे कोश बाजूला केले. खरा मी सांपडला आणि तो आनंदरु प आहे. सुख म्हणजे आत्मरु प आहे, आत्मा हा आनंदरु प आहे. स्वत;च्या स्वरु पाचा तो आनंद आहे.

---

मनामध्ये कोणतीही वासना न राहाणं ही भूमिका तयार झाल्याशिवाय श्रवण नाही.

---

शास्त्रज्ञ "उपरती" शब्दाचे दोन अर्थ करतात. एक, पूर्ण व्यवहार निवृत्ती. व्यवहारातलं लक्ष पूर्णपणे बाजूला झालं पाहिजे. कांहीही व्यवहार मनामध्ये नाही. दुसरा अर्थ, म्हणजे संन्यास. संन्यासाश्रम याच्यामध्ये तीव्र विरक्ती हे त्याचे अंग आहे. खऱ्या ज्ञानी महात्म्याच्या बाबतीत व्यवहार आणि तत्व विमर्श (= विचार, चर्चा) हे एकत्र राहू शकत नाहीत. तत्व विमर्शाच्या वेळेला व्यवहार संपलेला आहे.

---

कोणत्याही स्थितीमध्ये संयम जाऊ देऊ नये अशी स्थिती यायची म्हणजे शेवटपर्यंत इंद्रिय निग्रहाचा अभ्यास केला पाहिजे.

---

सर्व वासनांची ज्या अंत;करणातून निवृत्ती झाली पाहिजे त्या अंत;करणामध्ये सच्चिदानंद परमात्म्याचे प्रतिबिंब प्रगट होत आहे.

---

शुद्ध अंत;करण असेल तर उत्तम ज्ञान होतं व शब्दांनीही ज्ञान होतं. शब्दज्ञानाचा उपयोग म्हणजे दुसऱ्याची संशय विरक्ती करणं. "शाब्दे परेच निष्णात" (भक्ती प्रदीप)

---

चांगले आणि वेदांताचे विषय श्रद्धेने ऐकले तर पापक्षय होतो पण वासनाक्षय होत नाही.

---

अनुभवात्मक ज्ञान पाहिजे. तरीसुद्धा अहंकार चित्तामध्ये न राहाता श्रद्धेने पूर्ण मुमुक्षा धारण करायला हवी, चिंतन करायला हवं. परस्पर चिंतन मननाचे दोन प्रकार सांगितले आहेत. एकटयाने मनन करणे किंवा जी मंडळी असतील, सहाध्यायी, गुरु यांच्याबरोबर विचार करणं हेही मननच आहे.

---

मुक्त होणं याचा अर्थ कर्म संपणं. देह संबंध असेपर्यंत सुख दु;खं व्दंव्दाची जाणीव राहाणार. देहाचा संबंध संपल्यामुळे तीही संपते. हेही मुक्त पुरु षाचं स्वरु प आहे.

---

आत्मरु प जो संसार आहे त्यातून बुद्धी बाजूला होऊन, आत्मस्वरुपापर्यंत नेऊन त्या आत्मस्वरुपाचं चिंतन करायचं हे मुख्य कर्तव्य आहे जीवात्म्याचं.

---

सगुण स्वरुपाचं ध्यान हे सुद्धा ध्येयाचा साक्षात्कार करुन देणारं आहे.

---

विघ्नसुद्धा ईश्वराच्या प्रणिधानाने दूर होतात.

---

या मनुष्य जन्मामध्ये बुद्धीमध्ये सांसारिक वासनांचा संग्रह जितका अधिकाधिक होत जाईल, तितकं तितकं आपण परमेश्वरापासून आपण दूर दूर जात आहोत.

---

चिकीत्सा करताना अहंकाराने विचारायला जाऊ नये. श्रद्धा, विश्वास हे मुख्य अंतरंग साधन आहे. गुणदोष निरिक्षण करु न त्या करता साधनाभ्यास, ईश्वरप्रार्थनाही करत असावी.

---

शास्त्राने सांगितलेली दृष्टी आहे ती उत्पन्न होण्याकरता परंपरेमध्ये जे ज्ञानपूर्वक श्रद्धा ठेवतात अशांची संगत घडली पाहिजे.

---

आपला अहंकार दूर व्हायला पाहिजे अशी जर खरी तळमळ निर्माण झाली तरच देव तो दूर करतो. अहंकारामुळे आग्रह निर्माण होतो, आपलेच बरोबर आहे असे वाटते.

---

वादविवादकरता ज्ञान नाही. दुस-याला ज्ञानसंपन्न करण्याकरता ज्ञान आहे.

---

एखाद्याकडे शास्त्राचं वाचन, ज्ञान असेल, पण ते प्रयोग प्रत्यक्ष करुन यशस्वी करु न दाखवण्याची शक्ती असेलच असे नाही.

---

कसं वागावं माणसानी, बुद्धी कशी ठेवावी, कोणची बुद्धी योग्य आहे, कोणची अयोग्य आहे हे कांही स्वत;च्या बुद्धीने समजत नाही. हे सगळं समजावून देण्याकरता चरित्र आहेत.

---

पापकर्मापासून बुद्धीला परावृत्त करायचे हा खरा ज्ञानाचा उपयोग आहे.

---

अर्थशुद्धी ज्याच्याजवळ आहे तोच खरा शुद्ध आहे.

---

सर्व अनुकूल परिस्थिती असताना वैराग्य उत्पन्न होणं ही एक स्वतंत्र ईश्वराची कृपा आहे.

---

योगाभ्यास करणा-याने सर्व प्रथम वाणीचा निरोध केला पाहिजे. खरेही नाही खोटेही नाही, चांगलेही नाही वाईटही नाही.

---

अज्ञानी माणसाने, भक्तीने, श्रद्धेने जरी भस्म धारण केले तरी त्याच्या योगे पापक्षय होतो आहे. व्याधी नाश होतो. भस्मधारण हे तीर्थस्नान, जपजाप्य इ कर्मापेक्षा अधिक फल देणारे आहे.

---

भस्म किंवा अंगा-याने आपले सर्वही दोष दूर होतात. भवरोगवैद्य परमात्मा आहे आणि तीर्थ अंगारा हे त्याचे औषध आहे.

---

जगत् सृष्टयाने जगाचे संवर्धन होण्याकरिता धर्म व अधर्म निर्माण केले. त्या पैकी धर्माचा स्वामी इंद्र आणि अधर्माचा स्वामी अंतक म्हणजे मृत्यु आहे. अंतक, मृत्यु नेमलेला आहे. त्याला सहाय्य करणारे काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर वगैरे त्याचेच मित्र आहेत. यमदूत जीवाकडून या विकारांच्या सहाय्याने सगळी पापकर्मे करवीतात. हे आपले सगळे दोष आहेत. ज्याने आपल्या मनाचा निग्रह केला आहे, नियमन केले आहे, जे भगवंताला शरण गेले आहेत, त्यांच्या बाबतीत या यमदूतांचे कांही चालत नाही. ब्रम्हलिखित जरी ठरलेले असले तरी त्यापेक्षा अधिक पुण्यकर्म घडले तर त्याच्या योगे आयुष्य ठरल्यापेक्षा वाढू शकते.

---

पुण्यकर्म स्वत;चे विसरु न जाणे हे खरे पुण्यकर्म आहे.

---

विद्येकरिता प्राणसुद्धा अर्पण करायची तयारी पाहिजे.

---

वाहू हा संसार देवापायी । हे निदान दु;ख झाल्यावर तरी व्हायला पाहिजे.

---

जीवभाव जोपर्यंत आहे तोपर्यंत सगळे संशय कधीही दूर होत नाहीत.

---

“आवृत्त चक्षु;“ ज्याला म्हणतात असा खरा धीर पुरु ष असतो. बाह्य जगाचा सगळा विचार बंद करु न अंतर्मुख वृत्तीने आपला आत्माराम कसा आहे, हा जेव्हां तो विचार करु लागतो तेव्हां त्याचा सगळा भ्रम दूर होतो आणि ख-या आत्मस्वरु पाचे त्याला ज्ञान होते.

---

अन्याय मार्गाने जे जाणारे आहेत त्यांना निर्भयता कधीही नसते.

---

स्वार्थी देहासक्तीने पुष्कळ पळवाटा सुचतात.

---

क्षणोक्षणी आपले स्मरण घडावे, व्यापांमध्ये आमचा वेळ जायला नको म्हणून निर्वाहापुरते संतांनी मागणे मागितले आहे.

---

माणसे देताना एखादी गोष्ट देतात पण ती उपकाराच्या भावनेतून देतात. त्या संबंधाचे स्वरुप वेगळे येते. दात्याचा अहंकार वाढत जातो. आयाचित वृत्ती ही त्याकरता आहे.

---

वासना कमी कमी होत जाणं म्हणजे शम आहे, शांती आहे. जितक्या वासना कमी तितकं अधिक सुख आहे. तीव्र विरक्ती पाहिजे. केव्हां एकदा या मायेतून सुटेन असे तीव्र वैराग्य निर्माण झाले पाहिजे. स्वत;चा जीव वाचावा ही जशी उत्कट इच्छा आहे तसे आपण या संसारातून सुटले पाहिजे असे तीव्रतेने वाटले पाहिजे. हे शमेचे अंग आहे.

---

वासनाक्षय होऊन सगुण निर्गुणाच्या भक्तीमध्ये, ज्ञानामध्ये निमग्न होण्याकरता मन निर्वासन होऊन गेले म्हणजे चित्ताची तयारी झाली. वासनाक्षय झाल्याशिवाय खरा परमार्थ आपल्या हातून घडत नाही.

---

श्रवण, मनन, निदिध्यासन म्हणजे आत्मानात्म विचार करण्याकडे आपली बुद्धी स्थिर करणे आणि तोच विचार करणे, विषयांचा संबंध सुटणे या करता प्रयत्न आहेत.

---

व्यक्ताच्या ठिकाणी चित्त स्थिर होणं हेसुद्धा कठीण आहे. त्याकरता चित्त शुद्ध व्हायला पाहिजे.

---

वाचलेलं किंवा ऐकलेलं जे आहे पुन्हा पुन्हा त्याचं अनुसंधान करणं, योग्य अयोग्य त्यामध्ये काय आहे हे पहाणं, आपण जे आपल्या मनांत ठरवितो तेही योग्य आहे की नाही याचाही तपास करणं, हे आपण करत नाही. आपल्याला जे वाटतं तेच योग्य आहे असा आग्रह उत्पन्न होतो. असा आग्रह उत्पन्न झाल्यावर ते मनन निर्णायक होऊ शकत नाही.

---

देह ज्याला मिळाला तो जीवात्मा ज्ञान मिळवण्याचा अधिकारी आहे. मनुष्य जन्म आल्यानंतर त्याचं संशोधन करताना राजस, तामस वासना दूर करु न विचार करता आला पाहिजे.

---

भगवंतांना दया येणे म्हणजे पूर्ण कार्य झालं आहे. माणसाची दया व ईश्वराची दया यामध्ये किती तरी अंतर आहे. कोणचाही जीव असला तरी तो दुस-यावर दया करण्यास असमर्थ आहे. जीवाला जरी उपकार, दया करावीशी वाटली तरी त्याच्यामध्ये सामर्थ्य नाही. पण भगवंताजवळ (परमात्मा) पूर्ण सामर्थ्य आहे. संपूर्ण विश्व उत्पन्न करणं, त्याचं संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा संहार करुन टाकणं हे भगवंत करतात.

---

आमच्या संकल्पाला मनोरथ म्हणतात. जीवाचे संकल्प म्हणजे मनोरथ आहेत. सत्य संकल्प आहे ईश्वराचा. ती संकल्प वृत्ती अशी आहे की असं व्हावं असं वाटल्याबरोबर ते कार्य होऊन जातं.

---

सत् परमात्मा त्रिकालाबाधित आहे म्हणून तर तो सर्वांना मार्गदर्शन करु शकतो. आत्मप्रकाशी असल्याने त्याला दुस-या कोणत्याही प्रकाशाची जरुरी नाहीये. याच्याच प्रकाशाने सर्वही जगत् प्रकाशित होत आहे.

---

आनंद स्वरुप परमात्मा सत्य आहे. हा आनंद मिळवण्याकरता सगळा साधनमार्ग आहे. सगळयाही साधनांचं पर्यवसान याच्याकरता आहे. सच्चिदानंदघन परमात्मा तोच गुरु आहे.

---

“बालान्“ या अर्थ रागव्देषादिक विकारांनी शून्य असं ज्याचं अंत;करण झालेलं आहे.

---

मानव जन्म आला असतानासुद्धा दैवी संपत्ती प्राप्त करुन घेऊन सगळे विकार मनांतले ज्याने जिंकलेले आहेत त्यालाच मोक्ष मिळतो म्हणतात. सद्‌गुण ज्यास्त ज्यास्ती वाढावे त्याकरता प्रयत्नशील राहाणारा जो आहे, खरा मोक्षाधिकारी त्याच्याकरता भगवंताचा अवतार आहे.

---

भगवान दत्तात्रेयांची कृपा संपादन करणं, त्यांच्या चरित्राचं श्रवण करणं, चिंतन करणं हा मार्ग जो आहे सामान्य लोकांना, हा मोक्ष मार्ग आहे. मायामोहात सांपडलेले ज्यांना सत्संग नाही, विवेक नाही, दैवी संपत्ती नाही अशा लोकांना हा मार्ग सांपडत नाही.

---

स्वधर्माचरणाचे आचरण करुन राहाणारा, गुरुदेवतांची भक्ती करणारा त्यालाच या ठिकाणी भुक्ती आणि मुक्ती प्राप्त होते आहे.

---

जीव इथे जन्माला येतो, पुण्यपाप करुन निघून जातो. त्याच्या पुण्यपाप कर्माचा भोग त्याला एकटयाला भोगावा लागतो. हा ईश्वराचा मोठा कायदा आहे.

---

मानापमान सारखेच वाटणे ही सिद्धांची अवस्था आहे. गुरुंची सेवा करणा-या शिष्याने, साधकानेही त्याचा अभ्यास करायचा आहे.
मान ज्याचा गेलेला आहे तो ज्ञानाचा खरा अधिकारी आहे. पहिले मुख्य साधन आहे.

---

□□

ज्ञान मिळालं असतानासुद्धा आपल्याला ज्ञान मिळावं म्हणून पूर्वीसुद्धा ईश्वराची सेवा केली पाहिजे आणि ज्ञान मिळाल्यानंतर ज्या ईश्वराच्या कृपेने आपण कृतकृत्य झालो, ज्ञानसंपन्न झालो त्या ईश्वराचे स्मरण केले नाही तर कृतघ्नता दोष येईल म्हणून मुक्त झाल्यावरही भक्ती करतात.

---

"तप" शब्दाचे दोन अर्थ केले आहेत मोठया महाराजांनी. "तप आलोचने" हा एक अर्थ आहे किंवा "तप संतापे". त्या धातूचे दोन अर्थ आहे व्याकरण शास्त्राप्रमाणे. शरीराला कष्ट देणं, उपोषण करणं, आहार त्याग करु न राहाणं, हा एक तप शब्दाचा अर्थ आहे. आणि आलोचन करणं, ब्रम्हचिंतन करणं, परमात्म्याचं चिंतन करणं हे एक तप आहे.

---

वेदांत सांगितल्याप्रमाणे एखाद्या ज्ञानी महात्म्याकडून कामक्रोधादिक विकारांनी घडलेली कर्मे जरी दिसली तरी त्याची वृत्त अशी असते की कामाचा संबंध मला काय ? आत्मस्वरु पाला कामाचा कांहीच संबंध नाही. देहादिक जड आहे. त्यांनाही कामाचा संबंध नाही, त्याला काम काय करणार आहे ? ही आत्मनिष्ठ बुद्धी आहे.

---

निदिध्यासन जे आहे ते विपरित बुद्धी दूर करण्याकरता आहे.

---

ध्यानाला सुरवात केल्यानंतर एक परमात्मा आहे. सर्व स्वरु प परमात्मा आहे हेही ध्यान आहे. हे जे कांही दिसतं आहे, हे सर्व वासुदेवरु पच आहे ही बुद्धी होण्याकरीता हे जे स्थूल विश्व दिसतं आहे त्या विश्वरु पाचं ध्यान किंवा सूक्ष्म मनोमय अशा प्रकारचं वर्णन केलेलं आहे त्या स्वरु पाचं ध्यान आहे. म्हणजे दृष्यरु प आहे. विश्वरु पाच्या ध्यानामध्ये मन जर अशा प्रकारे स्थिर झालं तर विपरित बुद्धी हळू हळू कमी कमी होते. अहंकार कमी होतो, विकारही कमी होतात. ममता कमी होते. हे सगळे दोष कमी करण्याकरता निदिध्यासन म्हणजे सगुण परमेश्वराचे ध्यान सांगितलं आहे. पुढे निर्गुण स्वरु पाच्या ठिकाणी चित्त स्थिर झालं की झालं. सगुणाचं ध्यान किंवा निर्गुणाचं ध्यान यात श्रेष्ठ कनिष्ठ कांहीच नाही. ध्यान करणं याचाच अर्थ मनाची स्थिरता आहे. मनाची स्थिरता झाल्यावर वासनाक्षय होऊन सगळे कुसंस्कार नष्ट होतात.

---

आमचा वासनाक्षय न होण्याचं कारण असं आहे की आमच्या अनेक जन्मांच्या वासना पक्क्या झाल्या आहेत आणि त्या वासना पक्क्या करण्याकरता पुन्हा आम्ही विषयभोग घेतो, संसारात पडतो.

---

अंत;करण जशी जशी होईल, चित्ताची एकाग्रता, स्थिरता जशी जशी होत जाईल त्याप्रमाणे पुढे ज्ञान साधनं मिळतात आणि त्या साधनांनी पुढे जातात.

---

काम, वासना, इच्छा या घालविल्या पाहिजेत. त्या नाहीशा करण्याकरता म्हणून बाह्येंद्रियं आणि अंतरेंद्रिय यांचा निरोध प्रथम केला पाहिजे. निरोध केल्यानंतर ज्या कांही वासना साठल्या असतील पूर्वीच्या भोगांनी, त्याचीच निवृत्ती राहिलेली आहे. नवीन वासनांची भर कांही पडत नाहीये. त्या साठी इंद्रियांचा निरोध प्रथम करायला सांगितला आहे.
बाहेरच्या विद्या आणि कला आहेत तयाचा उपयोग कसा करायचा तशी बुद्धी मिळाली पाहिजे ईश्वराच्या कृपेने. परोक्ष ज्ञान कां होईना पण तेसुद्धा पूर्ण पाहिजे. परोक्ष ज्ञानानेसुद्धा पापक्षय होतो असे पंचदशीकार सांगताहेत. बुद्धीपूर्वक जी पापे घडलेली असतात ती परोक्ष ज्ञानानी नष्ट होतात.

---

परोक्ष ज्ञान हेसुद्धा शास्त्रच आहे. त्या शास्त्राप्रमाणे जर उत्तम गुरु पासून ज्ञान मिळवलेले असेल, त्याच्यामध्येसुद्धा त्याची तपश्चर्या झाली असेल तर त्याचाही चांगला उपयोग होतो. योगक्षेम तर चालतोच पण ईश्वर साक्षात्कारसुद्धा त्याला होऊ लागतो.

---

वैराग्य म्हणजे ज्ञानाकरता वैराग्य उपयोगी नाही. ज्ञान हे मिळविलच पाहिजे मग ते परोक्ष असो किंवा अपरोक्ष असो.

---

भगवान शंकरांच्याप्रमाणे गुणदोषांकडे दृष्टी ठेवावी. दुस-याकडे चांगले गुण असतील तर अगदी मान हलवून, शाबासकी देऊन त्याचा सत्कार करावा आणि दोष असेल दुस-याचा तर कंठाच्या बाहेर येऊ देऊ नये. "दोषज्ञ" असे ज्ञानी माणसाचे नांव आहे. चंद्र हा प्रकाश देणारा आहे हा त्याचा गुण पाहून त्याला मस्तकावर घेतलं शंकरांनी आणि जे हलाहल विष उत्पन्न झालं समुद्रातून ते कंठातच ठेवलं बाहेर काढलच नाही. तेव्हां दोषांचं ज्ञान असाव पण उद्घाटन करु नये.

---

अज्ञानाने झालेले अपराध आणि बुद्धीपूर्वक झालेले अपराध यांत अंतर आहे. अहंकार ज्याचा प्रबल आहे, "ईश्वरोहम् भोगी सिद्धोहम् बलवान् सुखी" ही वृत्ती ज्यांच्या चित्तामध्ये आहे, स्वत;लाच ईश्वर समजून ईश्वराचा किंवा ईश्वरभक्तांचा तिरस्कार करणारे जे आहेत त्यांच्या हातून बुद्धीपूर्वक सगळे अपराध होतात त्याला जास्ती शासन आहे.

---

समाधीतून उठल्यावर ज्या वासना मनांत निर्माण झालेल्या असतात किंवा होतात त्याचा क्षय करण्याचा अभ्यास केला पाहिजे. विचार करु नच त्या वासनांचा क्षय करायचा, भगवंताच्या नामस्मरणानी, चिंतनानी, वाचनानी तो क्षय करायचा. तो स्वतंत्र क्षय करावा लागतो. त्या शिवाय विदेह मुक्ती प्राप्त होत नाही. देहसंबंध कायमचा सुटत नाही.

---

देवाला जर आपण दिलं तर आपल्याला मिळेल ही इच्छा सर्वजण करतात. म्हणजे काय तर विश्वरुपी परमात्मा आहे. विश्व म्हणजे त्याचं प्रतिबिंब आहे, आरशात जसे प्रतिबिंब दिसते तसे. बुद्धीमध्ये असलेलं प्रतिबिंब म्हणजे सर्व जीवात्मे आहेत. त्या प्रतिबिंबाला जर मिळायचे असेल तर अगोदर बिंबाला अर्पण करावे लागतेय. रत्नांची माळ प्रतिबिंबाला पाहिजे असेल तर बिंबाच्या कंठात ती घातली पाहिजे म्हणजे ती प्रतिबिंबाला मिळते. त्याप्रमाणे सगळेही आपण ईश्वराचे प्रतिबिंब आहोत. ईश्वराला दिल म्हणजे आपल्याला मिळेल त्या शिवाय मिळू शकणार नाही अशा इच्छेने ते सगळे पूजा करतात असा मोठा सिद्धांत प्रल्हादजींनी मांडला आहे.

---

भक्ती आहे, निश्चय आहे, देव देणारा आहे. "अगोदर नाही नंतर अन्नदान करीन" परंतु अगोदर केले म्हणून काय झालं? अगोदर आमच्याजवळ शक्ती नाही. आमच्याजवळ इतकं नाही म्हणतो आपण. त्यांना कांही "इतकच" लागतं असं नाही. थोडं असलं तरी करायला हरकत नाही. अगोदर देवाची पूजा करु न नंतर प्रयत्न करायला काय हरकत आहे ? पण उलटं आहे. प्रयत्नाला यश आल्यानंतर मग देवाला करायचं आहे हा मनुष्य स्वभाव आहे.
भक्ताची सत्कर्म करण्याची जी बुद्धी आहे, जो संकल्प आहे तो त्याच जन्मांत पूर्ण करु न झाला पाहिजे. पण ती पूर्ण करण्याची शक्ती ईश्वराजवळ आहे.

---

ज्या दिवशी आपल्या मनामध्ये पूर्ण वैराग्य उत्पन्न झालं अशी खात्री पटेल त्या दिवशी संन्यास घ्यायला हरकत नाही. गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम झालाच पाहिजे असं नाही. कर्माने संन्यास महत्वाचा आहे.

---

भगवंतांनी अर्जुनाला सांगितलं आहे "बाहेर असणा-या विषयांना बाहेरच ठेव" हे कसं काय ? तर इंद्रियांच्या व्दारा आपले मन बाह्य विषयांकडे जाते. त्या विषयांशी संबंध आल्यावर ते विषय संस्काररुपाने पुन्हा आंत येतात. आंत आल्यावर त्या संस्काररुपाने ते मन परत बाहेर जातं. असं सारखं चाललेलं आहे त्याकरता बाहेरचे विषय बाहेरच ठेवणे याचा अर्थ इंद्रियांचा निरोध झालेला आहे ज्याला प्रत्याहार म्हणतात. इंद्रियांचा निरोध झाल्यानंतर मनही बाहेर जायचं बंद झाल. खिडक्या उघडल्यानंतर बाहेरचा वारा आंत येणार. बंद केल्यावर कशाला येतोय ? त्याचप्रमाणे बाहेर मन जायचं बंद झाल्यामुळे ते विषय आंत येण्याचे बंद झाले. संस्कार नाही, वासना नाही, बाहेरच्या बाहेर ते विषय राहिले.

---

पंचदशीकार वैराग्याचा हेतु सांगताना म्हणतात, दोष दृष्टी निर्माण झाली पाहिजे. संसारामध्ये दोष काय आहेत हे समजले पाहिजेत. ती दोष दृष्टी उत्पन्न झाली की हे मला नको आहे अशी त्याच्यापासून निवृत्ती उत्पन्न होते. विष असलेले अन्न कोण खाईल ? समजल्यावर कोणीही टाकूनच देणार. तसं संसारामध्ये सुखं नाही

टिकणारा एकही विषय यांत नाही हा विचार मनामध्ये आला तर हे सुख नको आहे, टिकाऊ नाही असे वाटेल.

---

ज्ञानी लोक कधीही असत्य बोलत नाहीत. लोकांना त्याची वाणी जरी असत्य वाटली तरी त्यांच्या वाणीतून जे निघते तसे घडून येते. महात्म्यांची सिद्धी आहे. अमावास्येला चंद्रोदय होईल म्हटल्यावर चंद्रोदय होतो अशी कांही उदाहरणे आहेत.

---

सत्य हे परमात्म्याचे स्वरु प आहे. भगवान सत्यस्वरु प आहेत.

---

कसा जन्म यायचा, कोणते स्वरु प निर्माण व्हायचे, जीव कोणत्या शरीरात जाणार त्याला कारण म्हणून क्रिया कर्म आहे आणि तेच कर्म फलाभिमुख झाले म्हणजे त्याला दैव असे म्हणतात.

---

गंगा पापक्षय करणारी आहे, चंद्र उदयाला आल्यावर उन्हाचा ताप कमी होतो, शांत होतो आणि कल्पवृक्षाच्या जवळ गेल्यावर दारिद्र्य दूर होतं ही तीनही फले सद्गुरुं च्या दर्शनाने प्राप्त होतात.

---

जै जगा धाकुटे होईजे ।
तै जवळीक माझी ।।

परमात्मा जवळ आहे पण धाकटं व्हायला हवं. निरहंकार झालेल्या माणसाला परमात्मा जवळ आहे.

---

अधिकाराशिवाय ज्ञान दिलं तर ते टिकत नाही.

---

प्रतिमा पूजा कनिष्ठ आहे याचा अर्थ त्याज्य नाही. कुठेच चित्त लागत नसेल तर ते एका ठिकाणी राहू शकतं. आणि तोच परमात्मा आहे अशी दृढ भावना झाली तर त्याचेही फळ मिळू शकतं.

---

ज्ञान होण्याकरता पापक्षय झाला पाहिजे. आत्मस्वरु प बुद्धीग्राह्य आहे पण बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. आरशावर जर मळ असेल तर आपले प्रतिबिंब आरशात चांगलं दिसत नाही. आरसा स्वच्छ केला पाहिजे त्याप्रमाणे पापक्षय झाल्याशिवा आत्मज्ञान होत नाही.

---

देहाची आसक्ती सुटणे फार कठिण आहे. देहात्मभाव गेला पाहिजे. आणि तो देहात्मभाव “अहं ब्रम्हास्मि“ हे ज्ञान झाल्याशिवाय जात नाही. देहाध्यास हा शेवटी जातो.

---

साधकांची लक्षणे सांगताना भगवंतांनी सांगितलं आहे मान नाही, मत्सर नाही, असूया नाही, कार्यदक्ष आहे, गुरु सेवेमध्ये निमग्न झालेला आहे, त्याच्या मनांत गुरुंची आज्ञा पालन करण्याशिवाय दुसरा विचार नाही.

---

आरंभाला गुरु शिष्याची बुद्धी, इंद्रियं वगैरे कशी आहेत ही सगळी तपासणी करतात. ज्या बुद्धीमध्ये ज्ञानाचे संक्रमण करायचे ती बुद्धी चांगली आहे की नाही हे पाहिल्याशिवाय ज्ञान कसे देणार ? बुद्धी शुद्ध करण्याकरता सर्व कष्ट आहेत.

---

निश्चयाने कार्यसिद्धी होते. अमूक एक करायचे असा निश्चय पाहिजे आणि मध्ये कितीही विघ्न आली तरीसुद्धा अनुत्साह नाही, निर्वेद (= नाऊमेद) नाही, उत्साह कायम आहे. या दोन गुणांनीच कार्यसिद्धी होत आहे.

---

आत्मस्वरु प हे अविद्येमुळे जीवांना भासत नाही. भौतिक पदार्थांकडे जीवांचे लक्ष आहे. जो आनंदघन परमात्मा आहे त्याच्या संदर्भात जीवांची रात्र आहे. तस्याम् जागर्ति संयमि । सर्व भूते ज्या ठिकाणी निद्रिस्त असतात त्यांना आत्मस्वरुपाचे भान नसते तिथे संयमी, ज्ञानी महात्म्याला आत्मस्वरु प परिपूर्ण भासते.

---

उपनिषदांमध्ये एक वर्णन आलेले आहे. ब्रम्ह भगवान परमात्मा "आहे " अशी एक दृष्टी आहे आणि "नाही" अशी एक दृष्टी आहे. नास्तिक माणसाला ईश्वर प्राप्तीची बुद्धी नाही. त्याच्या बुद्धीने सगळेच नाहीसे झाल्याने तो स्वत;च नाहीसा होतो. म्हणजे अधोगतीला जातो. पण ईश्वर आहे म्हटल्यावर भगवंतांनी सांगितलेला सगळा साधन मार्गही आहे. ही आस्तिक्य बुद्धी असणारा जो आहे तो त्याप्रमाणे आचरण करतो आणि फल प्राप्त करु न घेतो.

---

प्राणवायू म्हणजे जीवात्मा असाच अर्थ प प श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी केला आहे. त्याकरता पुष्कळ शास्त्रार्थ दिले आहेत. शरीरात तो राहातो म्हणजे शरीरातील सर्व ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रिय, मन, बुद्धी ही सगळी तत्व, पंचप्राण राहात आहेत. स्थूल शरीर हे फक्त कांही काळ राहाणारे असते. पण याच्यामध्ये राहाणारा जो साधन वर्ग ज्याला "लिंग शरीर" किंवा "सूक्ष्म शरीर" म्हणतात तो साधनवर्ग मोक्षापर्यंत राहाणारा आहे.

---

योगसूत्रकार सांगतात, विवेकी पुरु ष सदैव दु;खीच असतात. अनुकूल परिस्थितीसुद्धा त्यांना दु;खदायकच वाटते. आज ना उद्या हे सर्व जाणार आहे याची त्यांना जाणीव असते. विनाश हा दोष सर्व भौतिक पदार्थांमध्ये असतो. त्या दोषाचे जर चिंतन केले तर त्या भौतिक पदार्थांपासून दु;खच वाटेल. सुखं कधीही वाटणार नाही.

आत्मस्वरुप अज्ञानाने झांकलेले आहे. स्वयंप्रकाशी आत्मा कसा झाकला जाईल ? आमची दृष्टी मेघाने झांकल्यामुळे पुढे सूर्यापर्यंत जाऊ शकत नाही म्हणून सूर्य दिसत नाही. मेघांनी सूर्याला झांकलेले नसून आपल्या दृष्टीला झांकलेले आहे. प्रतिबंध केला आहे.

---

उपनिषदामध्ये सांगितलेले आहे की आनंद आपल्या जवळच आहे. तो समजवण्यासाठी एक दृष्टांत दिलेला आहे. एका शेतात शेतक-याने आपले धन दडवून ठेवले आहे. त्याचा मुलगा शेत नांगरतो आहे पण त्याला ते मिळत नाही. तर तो दाखविणारा कोणी तरी भेटला पाहिजे.

---

सिद्धयंते सर्व संशयात्

ही शेवटची अवस्था आहे. परमात्म साक्षात्कार ज्या वेळेला होईल त्या वेळेला सर्व संशय दूर होतात.

---

अंतरंग साधनेत भगवान शेवटी सांगताहेत,
श्रद्धावान लभते ज्ञानम् ।
ज्याच्या मनांत श्रद्धा, विश्वास निर्माण झालेला आहे, गुरु वाक्यावर व उपनिषद वाक्यावर विश्वास आहे त्याला ज्ञान मिळते.

---

जिज्ञासूने नमस्कार करणे, नम्रतेने सद्गुरुं जवळ जाणे ही सुद्धा साधना आहे. नंतर जे जे आपल्या मनांत आलेले आहे ते ते बोलून दाखवणे, प्रश्न करणे म्हणजे ते सद्गुरु उत्तर देऊ शकतात. त्यांच्याजवळ दोन्ही शक्ती आहेत. ज्ञान जरी मिळवले तरी ते ज्ञान दुस-यापर्यंत पोहोचवण्याची शक्ती आहे, दुस-याला ज्ञान द्यायचे म्हणजे त्याच्यामध्ये अनेक अडथळे येतात. अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. त्या सगळया संदेहांची निवृत्ती करणे आणि ते ज्ञान त्यांना पटवून देणे ही सुद्धा मोठी शक्ती आहे. शब्दांनीसुद्धा ज्ञान दिले जाते. परिपाक पाहिजे. परिश्रम करणाराही पाहिजे. आणि सेवा हे तर साधन आहेच. “परिप्रश्नेन सेवया“ पण साधनांनीसुद्धा ज्ञानाचा उपयोग होईल असे म्हणत नाहीत. उपदेश करतील, म्हणाले, योग्यता वगैरे पाहून.

---

अज्ञान, अंधश्रद्धा व संशय हे तीन दोष धर्ममर्यादा पालन करणा-याच्या मनांमध्येही निर्माण होऊ शकतात. श्रद्धा म्हणून जे अंतरंग साधन महत्वाचे सांगितले आहे ही श्रद्धा आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होत नाही. श्रद्धा उत्पन्न झाल्यावर जिज्ञासा ज्याला म्हणतात ती हवी. अश्रद्धा जर असेल तर जिज्ञासासुद्धा थांबून जाईल किंवा त्या जिज्ञासेतून विरुद्ध ज्ञान निर्माण होण्याचा संभव अधिक आहे.

म्हणून "ते निश्चित आहे" ही श्रद्धा हवी. म्हणजे शब्द प्रमाणावर बुद्धीचा विश्वास बसला पाहिजे. प्रत्यक्षदर्शी जो आहे त्याच्या शब्दावर विश्वास ठेवला पाहिजे.

---

ईश्वर प्रणिधानाचे फल योगशास्त्रकारांनी दाखवले आहे. साधनाभ्यास जो चाललेला आहे तो कांही या कालापुरताच आहे असे नाही. कर्मात्मक साधनामध्ये कांही काळाची गणना असते. तीन दिवस, पांच दिवस, सात दिवस यथा शक्ती आणखी कांही काल घेतात परंतु योगसाधनामध्ये जी सिद्धी करु न घ्यायची आहे त्याला काळाचे नियंत्रण नाही. दीर्घ काळपर्यंत ते चालले पाहिजे असे म्हणतात. कारण कर्मानुसारिणी बुद्धी घेऊन त्या भूमिकेवरु नच जीवाचा साधनाभ्यास चाललेला आहे. कोणाची बुद्धी कशी होईल, कोणाचे कर्म कोणत्या वेळेला फलोद्भव होईल सांगता येत नाही त्यामुळे ईश्वराची उपासना जरु र आहे असे म्हणतात.

---

स्वस्थ मन राहाणे महत्वाचे आहे. "मन स्वस्थ बसणे" असा "शांती " शब्दाचा अर्थ शास्त्रकार करतात.

---

रसनेंद्रिय जोपर्यंत जिंकले नाही तो पर्यंत त्याला जितेंद्रिय म्हणता येणार नाही. रस ज्याने जिंकला त्याने सगळे जिंकले.

---

एकाचे दोष दुस-याला जाऊन सांगायचे हे असुरी संपत्तीचे लक्षण आहे. निर्भयता नाही. ज्याने दोष केलेला आहे त्याला जाऊन त्याचा दोष सांगणे ही निर्भयता आहे. सुधारणा करायची तर अशी केली पाहिजे.

---

भगवान गीतेत सांगतात, राग आला तरी हरकत नाही. व्यवहारात जो पर्यंत अंत;करण आहे, व्युत्थान दशा जोपर्यंत संपलेली नाही तोपर्यंत राग यायला हरकत नाही. पण तो आवेग उत्पन्न होता कामा नये. आवेग आवरता आला पाहिजे. रागाचा अतिरेक होऊ नये इतके जपले पाहिजे. हे ज्याला साध्य झाले, राग, लोभ जो आवरु शकला तो योगी आहे, सुखी तो आहे.

---

आचार्य महाराजांनी "दांभिक" शब्दाची व्याख्या करताना स्पष्टीकरण केले आहे की "आपण कसे वागतो हे आपल्या तोंडाने सांगणारा दांभिक आहे".

---

आपण अकिंचन झालं पाहिजे. सर्वही कर्मे ईश्वराची आहेत, पाप असो पुण्य असो. आमचं कांहीच नाही. परमेश्वराला अंतर्यामी म्हणायचं कशाला ?

---

दोषांच्या ठिकाणी गुणत्व बुद्धी हा दोष समजला जात नाही. गुणांच्या ठिकाणी दोषत्व बुद्धी हा दोष आहे. त्याला “असूया“ म्हणतात.

---

सुहृद म्हणजे “प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्“ असा अर्थ आचार्यमहाराज करताहेत. भक्तांनी आपल्याला कांही द्यावं अशी त्याला अपेक्षा नाही. भक्तावर उपकार करावयाचा आहे फक्त.

---

मनाला बाजूला करायचयं. शरीरातून मन बाजूला झालं पाहिजे. माझं, माझं म्हणून द्रव्य वगैरे आहे तिथून मन बाजूला झालं पाहिजे. हा विवेक आहे. पृथक्करण करु न मनाला सगळयांपासून बाजूला करायचं आहे. हा प्रयत्न करण्याकरता परमेश्वराची जितकी भक्ती आपल्या अंत;करणात उत्पन्न होईल तितकी व्हायला पाहिजे. देहात्म बुद्धी कमी करण्याचा प्रयत्न हा विवेकाने, विचाराने होत असतो. सत्संगतीने होत असतो. महात्म्यांचे आचरण पाहून होत असतो.

---

संसारापासून मनाला बाजूला करणं हा एक विवेक, धर्माधर्माचा विवेक म्हणजे अधर्मापासून मनाला बाजूला करणं, हिंसा, व्देष वगैरे जे दोष आहेत त्यापासून मनाला बाजूला करणं हा विवेक आहे. मन हे देहापासून बाजूला झालं की देहाचे संबंधी चेतन, अचेतन जे सगळे आहेत ते माझे आहेत असं जे वाटतं त्यापासूनही मन बाजूला होतं. संतांच्या सहवासात ईश्वराचे गुण ऐकायला मिळाल्यावर स्वाभाविक त्या मनाची गती त्या ईश्वर स्वरुपाकडे आपोआप होत आहे. जर विषयांपासून ते बाजूला झालेलं असेल तर. मनाला संसारातून बाजूला करण्याची संवय पाहिजे आणि ईश्वराची कृपा पाहिजे.

---

नारदांनी परमेश्वराचा कृपाप्रसाद लवकर होण्याची तीन कारणे श्रीमत् भागवतात एका ठिकाणी सांगितली आहेत ---

- सर्वही प्राण्यांच्याबद्दल मनामध्ये दया पाहिजे.
- संतोष. अनुकूल प्रतिकूल कोणतीही परिस्थिती असली तरी संतोष वृत्ती पाहिजे.
- इंद्रियांचा संयम. सर्व इंद्रिये संयमात राहीली पाहिजेत.

---

वेदांत ऐकण्याचा, ज्ञानेश्वरी वाचण्याचा, श्रवण करण्याचा अधिकारी प्राप्त करु न ध्यायलासुद्धा विवेक पाहिजे. जसजशी जीवात्म्याची बुद्धी परिपक्व होत जाईल तस तसे त्या त्या योग्यतेच्या अधिकारी महात्मयांच्या संगतीत राहून ते ते ज्ञान प्राप्त करु न घेता येते. ज्ञान संपादन करताना आणि ऐकताना बुद्धी अत्यंत अवधानयुक्त

पाहिजे. मनामध्ये बाकीचा इतर कोणताही संस्कार असून उपयोग नाही. विवेक, वैराग्य, तप, तितिक्षा, शमदमादि सगळी साधने ज्याच्याजवळ पक्की आहेत त्यानेच वेदांत ऐकावा नाही तर तो नास्तिक होईल.

---

असत्य कधीही बोलायचे नाही हे फार महान व्रत आहे. त्या व्रताचा स्वीकार करण्याची योग्यता येईपर्यंत अल्पव्रते करुन राहीले पाहिजे.

---

समोर दृष्टीला पडण्या-या दृष्याचे सगळे संस्कार मनातून गेल्यानंतर फक्त आनंद आहे.

---

सर्वत्र समबुध्दी ठेवा असं संत सांगतात. मनातल्या वाईट वासना, रागव्देषादिक विचार जाण्याकरता हा प्रयत्न आहे.

---

भगवंतांनी अवतार धारण करु न दुर्जनांचा संहार तर केलाच. पण सज्जनांचे संरक्षणही केले. त्यांची बुध्दी यथार्थ मार्गाने नेऊन योग्य बनवायची, नि;संदेह बनवायची म्हणजे ते लोकांचा उध्दार करु शकतील हा संरक्षण शब्दाचा अर्थ आहे.

---

सुख दु;खाला कारण कर्म आहे. क्रिया आहे. धर्म किंवा अधर्म हे सुख दु;खाला कारण आहेत हा विचार पटल्यानंतर ईश्वरापर्यंत जीवात्मा जाऊ शकतो.

---

पुण्यकर्म आपल्या हातून घडावित, मला त्याच्या योगाने सुखं मिळेल, या लोकांत मिळेल, परलोकांत मिळेल, त्या करिता आणखी पुण्यकर्म करीत राहावे असे वाटणेसुध्दा मनांतले पुष्कळ दोष कमी झालेत असे समजायला हरकत नाही.

---

मनामध्ये कोणते दोष आहेत. उद्या अनुकूल परिस्थिती आल्यानंतर मनामध्ये कोणते दोष येण्याचा संभव आहे हा सगळा अभ्यास केला पाहिजे. फलदाता परमेश्वर आहे त्याच्याजवळ हे मागायचे. म्हणजे मनाच्या शुध्दीमुळे त्याची भक्तीसुध्दा शुध्द होऊन जाते. जास्तीत जास्त शुध्द बुध्दी जीवात्म्याला मिळणं ही खरी ईश्वराची कृपा आहे. ईश्वराकडून ज्याला बुध्दी मिळाली आहे तो जीवात्मा ईश्वरापर्यंत जाऊन पोहोचू शकतो. पूर्ण आनंद त्याला मिळू शकतो. नाही तर अपूर्ण आनंदातच याचे किती जन्म जातील याला कांहीही सांगता येत नाही.

---

ज्ञानामध्ये न्यूनता असेल तर कर्मामध्येही न्यूनता येते.

---

मी अमर व्हावे असा वर मागणे म्हणजे माझा देहतादात्म्य भाव कायम राहावा असे वाटणे आहे.

---

भगवंताचे अखंड स्मरण राहाण्याला अहंकार हा प्रतिबंध आहे.

चांगल्या फळाफुलांच्या बागेत मध्येच जर वाटेल तसे गवत वाढले तर माळी ते गवत काढून टाकतो. तिथे दुसरा विचार नाही. आपण लावलेली बाग सर्वांना समाधानकारक व्हायला पाहिजे.

मन अत्यंत शुद्ध झालं पाहिजे. स्थिर झाले पाहिजे. केवळ एक परब्रम्ह तत्व आहे "सच्चिदानंदघन परमात्मा" आणि "चैतन्यरुपी जगदंबा" एकच आहे. दुसरे कांही नाही हे मनांत पक्के ठसले पाहिजे.

वाणीचे तप आहे, सत्यवादाचे तप किती तरी केले असल्याचे ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. वाणीने असत्याचा कधीच उच्चार केला नाही. अशा वाणीमध्ये अशी शक्ती येते की जे बोलले ते खरेच होणार.

आपल्या संन्निध एक ईश्वरी शक्ती आहे असे मानले तर देहात्मवाद कमी होऊन जातो.

सुखही पुष्कळ आली तरीसुद्धा मनावर कोणता परिणाम नाही ही जी स्थिती आहे तिला "समप्राप्ती" म्हणतात. ब्रम्हप्राप्ती झाल्यावर ही स्थिती येते.

देहाचा आणि माझा संबंध कांही काळापुरता आहे अशी जर भावना असली तर कोणी मानसन्मान केला तरी त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही. निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्व वाटणार नाही.

निर्भय असणे, आजारी असताना, पैसा नसताना इतर कोणतीही अनुकूलता नसतानाही निर्भयता असणे म्हणजे उत्तम सात्विक दैवी प्रकृतीचे लक्षण आहे.

तीन गोष्टी दुर्लभ असून त्या देवाच्या कृपेनेच प्राप्त होऊ शकतात. पहिली गोष्ट मनुष्य जन्म मिळणे, दुसरी मोक्षाची इच्छा होणे आणि तीसरी महात्म्यांची संगती घडणे. दुर्लभ मनुष्य देह, त्यातही पुरुष देह प्राप्त झाला असूनही जो जीव परमार्थाकडेही दुर्लक्ष करतो त्याच्यापेक्षा मोहात सांपडलेला दुसरा कोण असू शकेल ?

सर्व बाह्य पदार्थांच्या सुखाची इच्छा सोडून जाणत्या माणसाने आपल्या मुक्तीकरता प्रयत्न करणे जरुर आहे. त्याकरिता प्रथम ख-या महात्म्याला शरण जाऊन त्याने सांगितलेले साधन मन:पूर्वक करीत राहिले पाहिजे.

शास्त्रे वाचोत, देवपूजा करोत, इतर दानादिक कर्मे करोत, देवाचे भजन करोत, हे सर्व केले तरी जीव व परमात्मा एकच आहे असा बोध झाल्याशिवाय शेकडो ब्रम्हदेव होऊन गेले तरी मोक्ष मिळणार नाही.

---

खरे आत्मज्ञान मिळवीनच अशी चिकाटी बाळगून त्याची योगारु ढ पदवी मिळवावी आणि संसार समुद्रात बुडालेल्या आपला आपणच उद्धार करु न घ्यावा.

---

कर्म हे फक्त चित्ताची शुद्धी करु न देते. आत्मवस्तूच्या ज्ञानाकरिता ते उपयोगी पडत नाही. ते ज्ञान विचारानेच होऊ शकते.

---

सर्वही साधनांचा अभ्यास तत्परतेने चालू ठेवल्यास त्यांच्या परस्पर सहकार्याने मानवी जीवन सफल होते.

---

विरक्ती आणि मुमुक्षा हे जर मंद अवस्थेचे असतील तर त्या साधकांचे ठिकाणी शमादिक साधनांचा नुसता आभास असतो. म्हणून वैराग्य व मुमुक्षा तीव्र बनविणेचा अभ्यास करावा म्हणजे शमादि साधने खरी दृढमूल होतील.

---

मोक्ष साधनामध्ये भक्ती हे साधन फार श्रेष्ठ आहे. आत्मस्वरु पाचे चिंतन करणे म्हणजे भक्ती ही पहिली व्याख्या. आत्म्याचे खरे तत्व, खरे स्वरु प इतरांपेक्षा निराळे कसे आहे याचा अखंड विचार करणे म्हणजे भक्ती ही दुसरी व्याख्या.

---

सद्‌गुरुं ची आराधना करणा-या शिष्याची त्रिकरण शुद्धी असणे जरु र आहे. मन, वाणी व शरीर तीनही शुद्ध ठेवून सेवा झाली पाहिजे.

---

जसे सूर्याचे किंवा दिव्याचे किरण सर्वत्र पसरतात तसे चक्षुचे किरण समोर असणा-या शिष्यापर्यंत येतात. आणि त्या ब्रम्हज्ञानी पुरुषाचे मन नेहमी विशुद्ध ब्रम्हानंदामध्ये निमग्न असल्यामुळे अशा पवित्रतम मनाशी संबद्ध असणारी त्याची पवित्र दृष्टी ज्यावर पडेल तो निश्चित सर्व दु;खातून मुक्त होईल.

---

सद्‌गुरुं चा उपदेश हाच भवबंधविमोचक आहे अशी निष्ठा शिष्याजवळ असणे आवश्यक आहे.

---

संसार दोष निरिक्षणाने उत्पन्न झालेली आर्तता, यातून मी कसा बाहेर पडेन ही तळमळ सद्‌गुरुं च्या उपदेश वाणीवर असणारा दृढ विश्वास व यामुळे उत्पन्न झालेले जितेंद्रियत्व हीच तत्वज्ञानाची व संसार मोक्षाची निश्चित अंतरंग साधने आहेत.

---

विवेकज्ञान, वैराग्य इ सर्व साधने संपादन करु न त्याबरोबर गुरु कृपा जर संपादन केली तरच आत्मज्ञान प्राप्त होऊन तो अधिकारी पुरु ष मुक्त होतो.

---

श्रद्धा म्हणजे गुरु व वेदांत वाक्य यावर असणारा विश्वास. भक्ती म्हणजे आत्मस्वरु पाचे नित्य अनुसंधान. ध्यान म्हणजे निर्गुण निराकार शुद्ध ब्रम्ह स्वरु पाचे सम्यक् आधान म्हणजे तेथेच बुद्धी स्थिर करणे आणि योग म्हणजे चित्ताच्या वृत्ती थांबवणे.

---

श्रद्धा ही भक्ती, ध्यान व योग या तिघांनाही कारण आहे. श्रद्धेशिवाय या तीनही उपायांचा अभ्यास होऊ शकत नाही.

---

ज्याला जे इष्ट ते त्याचे धन. सोने, चांदी इत्यादि धन हे पामरांचे धन आहे. पण ज्ञानी पुरु षांचे धन म्हणजे वैराग्य हेच होय.

---

आपले हातपाय दोरीने बांधले असता दुसरा त्या बंधनातून आपणास सोडवू शकेल पण या संसार बंधनातून दुसरा कोणीही सोडवू शकत नाही.

---

शास्त्रीय शब्दजाल हे मोठे अरण्य असून त्यात सांपडलेल्या माणसाचे चित्त गोंधळून जाते. त्या करिता आत्मसाक्षात्कारी सद्गुरुं च्या कृपेने साधकाने आत्मसाक्षात्कार संपादन करु न कृपार्थ व्हावे. शास्त्राचे केवळ शाब्दिक ज्ञान मिळवून त्यातच गुरफटून न जाता अंतरंग, बहिरंग साधनानुष्ठानाकडे लक्ष देणारा साधकच आत्मसाक्षात्कार हे मुख्य फळ मिळवून सिद्ध होतो.

---

आत्मतत्वज्ञान होण्याकरिता बुद्धीतील सर्व दृष्याचा विलय होऊन केवळ ब्रम्हच बुद्धीत शिल्लक राहीले पाहिजे तरच आत्मस्वरु पाचा साक्षात्कार होतो.

---

विषय आशारु पी महापाश हा अनेक जन्मांचा असल्याने तो पूर्ण विचारांशिवाय सोडता येत नाही. अशा जन्म जन्म बंधनात टाकणा-या विषयानुरु प महापाशांपासून जो मोकळा झाला, ज्याच्या चित्तांत विषय आशेचा संबंधच राहीला नाही असा निर्विषय चित्त असणारा मनुष्यच मुक्ती मिळविण्यास समर्थ होतो.

---

शास्त्रविहीत कर्म जरी हातून घडत नसले तरी निषिद्ध कर्म कधीही करु नये. निषिद्ध कर्माचा त्याग कटाक्षाने केला तर केव्हां तरी विहीत कर्म करण्याकडे बुद्धी वळते.

---

देह, स्त्री, पुत्र, मित्र, धन इत्यादि ठिकाणी जी आसक्ती, तादात्म्याभिमान हा मोह म्हणजेच महामृत्यु आहे कारण त्यामुळे स्वत;चे आनंद स्वरु प आच्छादित होऊन त्यापासून भ्रष्ट होते.

---

संसार दोन प्रकारचा आहे. बाह्य आणि आंतर. यापैकी आंतर संसार म्हणजे सुख दु;ख, कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादि रु प आहे. बाह्य संसार हा जन्म जरामरण, बाल्य, यौवन, वार्धक्य, स्थूलता, कृशता इत्यादि रु प आहे.

---

विशुद्ध सत्व हे जलाप्रमाणे आहे. त्यात रजोगुण, तमोगुण मिसळला की तो संसार बंधनाला कारण ठरतो. या विशुद्ध सत्वात्मक रु पात आत्म्याचे प्रतिबिंब पडून तो सगळया जगाला, जडाला प्रकाशित करतो. प्रसन्नता, आत्मानुभ, परम शांती, तृप्ती, आत्यंतिक आनंद आणि परमात्म निष्ठा हे विशुद्ध सत्वाचे गुण आहेत.

# भक्ती

उपासना शास्त्रामध्ये उपासकाच्या बुद्धीला भगवंतांनी स्वातंत्र्य दिलेले दिसत आहे. कोणतेही स्वरुप ध्यायला हरकत नाही. आकार कोणताही ध्या, निराकार ध्या, सगुण ध्या, निर्गुण ध्या. कोणत्याही स्वरुपाची उपासना उपासक करु शकतो.

---

सर्वही व्यवहारापासून मन हे निवृत्त झालं पाहिजे. म्हणजे परमात्म चिंतन करण्याला त्याला अवसर मिळतो. जास्ती गोडी निर्माण होते. ती भक्ती जास्ती जास्ती वाढत जाते.

---

भगवत् भक्ती हासुद्धा मार्ग सोपा नाहीये. त्या मार्गामध्ये या वासनांचा प्रतिबंध उत्पन्न झाल्यानंतर भक्ती कशी होणार ? त्या भक्तीची वृद्धी कशी होणार ?

---

देवाजवळच मागायचं हेसुद्धा कांही कमी नाहीये. दुस-याजवळ कांहीही मागायचं नाही. **पण न मागणं हे सगळयात चांगलं. कांहीही मागायचं नाही. देवाला कळत नाही असं म्हटल्यासारखं झालं.** सकाम भक्ती कमी काय मानायची ? आपली इच्छा पूर्ण होण्याकरता देवाची तपश्चर्या करायची, देवाला ज्ञान नाही का ? सर्वज्ञ आहे ना देव । ती श्रद्धा कमी झाल्यासारखी होती ना । धैर्य दे म्हणून तरी कशाला मागायच ? काय द्यायचं ते सगळ ज्ञान त्याला आहे हा एक मोठा विश्वास पाहिजे

---

देवाची सेवा करायची आहे आपल्याला ती काय नवरात्रापुरती किंवा अन्य प्रसंगापुरतची आहे का ? अखंड सेवा घडली पाहिजे. सर्व काल देवाचं स्मरण अखंड राहीलं पाहिजे.

---

प्रल्हादजींनी भजन कांही सोडलं नाही. सुटलं नाही. भजन मी करतच नाही म्हणत होते ते. अंतर्यामी जो आहे, सर्वांचा बुद्धी साक्षी जो आहे, सर्वांच्या बुद्धीला प्रेरक जो आहे त्याच्या इच्छेने आणखी भजन होतय. भजन करणरा मी नाहीये. त्यामुळे त्यांचे भजन हे अत्यंत शुद्ध सात्विक झालेले आहे आणि त्याचे फल म्हणजे देहात्म बुद्धी दूर झालेली आहे.

---

आपल्या मनामध्ये भक्ती प्रेम उत्पन्न झालं आणखी त्या स्वरु पाचं ध्यान जर घडलं तर त्या योगाने चित्त शुद्ध होऊ शकतं. पापकर्माकडं प्रवृत्ती होणार नाही. आणखी नामस्मरण. जगदंबेचं नामस्मरण जे आहे तेही सर्व पापक्षय करणारे आहे. जन्मजन्मांतरीची झालेली पापं नामस्मरणाने नाहीशी होतात.

---

योगाभ्यासाने आणखी जीवन्मुक्ती सुख मिळवावं किंवा श्रवण मनन निदिध्यासन याच्यामध्ये आणखी मन स्थिर व्हावं. त्या मनाची स्थिरता कधीही बिघडायची नाही. मिळालेली एकाग्रता कायम राहाण्यासाठीही भक्तीची आवश्यकता आहे.

---

चित्तशुद्धी फार कठीण आहे. कोणच्याही मार्गामध्ये चित्तशुद्धीची आवश्यकता आहे. अशुद्ध चित्त असणाराच जगदंबेची, ईश्वराची भक्ती करायला जाणार न । त्याकरताच भक्ती करणार. तेव्हां ती चित्तशुद्धी भक्तीमार्गालाही जरु र आहे.

---

माझं भजन कोण करतात ? भजनाला सुरवात केव्हां होते ? तर पापक्षय झाला पाहिजे. पुण्यकर्म उत्तम चांगली कर्म अगोदर झाली पाहिजेत. त्या कर्मांनी संचित वगैरे सगळया पापकर्माचा नाश झाला पाहिजे आणि नंतर मग भजन. हा सगळा मोह मनांतला जातो. रागव्देषादिक विकार जातात. मग भक्तीला सुरवात होते. ख-या भक्तीला त्या वेळेला आरंभ होतो.

---

आयुष्य कमी असल्यामुळे जितकं आपल्याकडून धर्माचरण होऊन ईश्वराच्या कृपेने आपलं चित्त शुद्ध व्हावं, परमात्म्याचं अखंड अनुसंधान घडावं. असं कलीयुगात वाटलं पाहिजे.

---

चित्तामधला अहंकार घालविण्याचा प्रयत्न करणं, तो जाण्याकरता भगवतीची किंवा आपल्या उपास्य देवतेची अखंड उपासना प्रार्थना करणं म्हणजे साधन मार्गामध्ये प्रतिबंध निर्माण करणारे दोष असतील तर ते दोष दूर होऊन आपला मार्ग, साधनाभ्यास, उपासना ही निर्विघ्नपणे चालू राहून त्या उपासनेचं फळ, शेवटी,म्हणजे चित्त, शांत, एकाग्र होणं. समाधी, साक्षात्कार, मुक्ती वगैरे भूमिका प्राप्त होतात.

---

□

मनुष्य जन्म मिळाल्यावर ईश्वराची कृपा संपादन करणे आपले कर्तव्य आहे. ईश्वर हा दयाळु आहे. फक्त प्रेम भक्ती पहाणाराच आहे. बाकी त्याला कांहीही लागत नाही. दयासागर आहे तो, अशी सुरवीपासून निष्ठा पाहिजे. अशी शुद्ध भक्ती, शुद्ध प्रेम मनात ठेवून भक्तीला सुरवात झाली तर अनुग्रह व्हायला वेळ लागणार नाही.

---

सर्वही वासना घालविण्याची शक्ती या भगवत भक्तीमध्ये आहे.

---

भगवंताच्या भक्तीचा उपयोग काय आहे? प्रयोग आहे तो करुन पहा, मनांतल्या वासना कशा कशा कमी होताहेत. हा अनुभव येतोय. वासना कमी झाल्यावर मनाची शांती कशी आहे याचाही विचार मनाने करायचा आहे. आणि कोणचा मार्ग बरा आहे हे ठरवायचे आहे.

---

निर्वासन मन झाले पाहिजे. त्याशिवाय भक्ती होणार नाही. भक्ती करणारा मनुष्य जर मागत राहीला आणि एखाद्या वेळेला जर वेळ लागला मिळायला तर "कशाला भक्ती केली ? देवसुद्धा लक्ष देत नाही" वगैरे निंदा करायची आमची तयारी होते. आपली भक्ती कोणत्या योग्यतेची आहे याचा विचार आपण करत नाही. अशा वेळेला श्रेष्ठ अशा परमेश्वराचे दोषसुद्धा आपण काढतो. परमात्मा निर्दोष आहे, जगन्माता निर्दोष आहे.

---

देवाची पूजा विसरायला शिकायचं. पण अगोदर ती करायला शिकलं पाहिजे. नेमाने केली पाहिजे पूजा. जशी शास्त्राने सांगितली तशी पूजा केली पाहिजे. "देवाला काय हो, त्याला कांही लांगत नाही. तृप्त आहे तो. त्याला जेवण लागत नाही. " आम्हाला तेवढे लागते सगळे. असे विचार मनामध्ये येऊन उपयोग नाही. आपल्याप्रमाणे सर्व उपचार परमेश्वराला आपण दिले पाहिजे.

---

परमेश्वराचे ध्यान हेच खरे तप आहे. त्या तपाचा अधिकार प्राप्त होण्याकरता देवानुग्रह पाहिजे. जगदंबेची कृपा पाहिजे. उपासना अखंड झाली पाहिजे. त्या उपासनेच्या योगाने ही साधने आपोआप प्राप्त होतात. दोष निवृत्ती होते, गुणप्राप्त होते. साधनाभ्यासही अखंड चालू राहातो. प्रतिबंध सगळे दूर होतात. हे ईश्वराच्या अनुग्रहाचे कारण आहे.

---

परमेश्वराबद्दल आदरभाव आपल्या अंत;करणात कायम राहिला पाहीजे. त्यांच्याकरता देव येणार नाही का ?

---

भक्ती कोणाची करावी याबद्दल स्वातंत्र्य आहे आम्हाला. कर्म मार्गामध्ये प्रत्येकाची कर्म वेगळी आहेत. ती लष्करी आज्ञा आहे. हे असे कां करायचे ?

हे त्या सैनिकांनी विचारायचे. “चला पुढे चला“ म्हटल्यावर पुढे गेलेच पाहिजे. गोळीबार होतोय, मरण येणार वगैरे कांही विचार करता येणार नाही. भक्तीमार्ग हा प्रेमाचा आहे. प्रेमामुळे कमी जास्त प्रमाणात तुम्ही भक्ती करु शकता. “पत्रं पुष्पं फलं तोयम्“ सांगताहेत भगवान. कांहीही चालतं म्हणाले. पण कांहीही चालतं म्हणजे तशी निस्सिम भक्ती असेल तर चालते.

सर्वही इंद्रियांची प्रवृत्ती वासुदेवाकडे करणारा तो भक्तीयोग. सर्वात्मक परमेश्वराच्या ठिकाणी या सर्वांची प्रवृत्ती असणे ही भक्ती आहे.

सुखी होण्याचे मुख्य साधन म्हणजे ईश्वराची भक्ती आहे.

भक्तीसहीत कर्म पाहिजे. केवळ कर्म म्हणजे भक्ती नाही. नुसती भक्ती होऊ शकत नाही.

कर्मयोगसुद्धा भक्ती आहे. ईश्वराच्या आज्ञेचे पालन केल्याचे फळ आपल्याला मिळत आहे तर अशा रीतीने कर्मयोग हा स्वत; भक्तीयोगही आहे.

ईश्वर भक्ती, कर्मात्मक भक्ती, किंवा कर्मयोग म्हणा, ईश्वराची आज्ञा म्हणून स्वत; तर करावं सर्व जे इतर लोक आहेत त्या सर्वांच्याकडूनही आणखी ईश्वराचे हे मंगल नाम, मंगल चरित्र वगैरे सांगाव. त्यांच्याकडूनही हे करवून ध्यावं.

उपासनेनेही आणखी चित्त शुद्ध होतं पुष्कळ. हा भक्तीमार्गही मोठा फलदायक आहे. ज्ञान हे त्यामुळे उत्पन्न होत.

ईश्वराची खरी भक्ती असणारा नीती अनीतीचा विचार करु नच वागणार.

ज्या स्वरु पावर आपलं मन स्थिर होईल त्या ईश्वरी स्वरु पाची उपासना करायची.

ईश्वराबद्दल अंत;करणामध्ये भक्ती, प्रेम ज्यांच्या मनांत उत्पन्न झालेले आहे ते ईश्वराच्या कृपेने निर्भय राहू शकतात.

ज्यांच्या अंत;करणात ईश्वरप्रेम निरंतर राहीलेले आहे त्यांचं मन संसारात कधीच जात नाही. ईश्वरप्रेमामध्ये, जगदंबेच्या प्रेमामध्ये ज्यांचे अंत;करण स्थिर होतं त्याला संसारातील कोणतेही आघात सहन करण्याचे धैर्य उत्पन्न होतं.

प्रतिकूल परिस्थितीमध्ये निराश न होता ईश्वर शक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून जर प्रार्थना अशा प्रकारची झाली तर त्या प्रार्थनेने कार्य होतं.

□

आपल्या इंद्रियांनी, देहाने, मनाने, वाणीने, बुद्धीने कांही तरी ईश्वर सेवा भक्ती झाली पाहिजे.

---

अनेक दिवस जरी भक्ती झाली तरी ती फक्त एक निमिष झाली ही तळमळ वाटली पाहिजे.

---

मनाची स्थिरता भक्तीमध्ये व भगवंताच्या सेवेमध्ये राहीली पाहिजे.

---

अभ्यासामध्ये आणखी यश आपल्याला मिळावं आपली बुद्धी वाढत जावी या करीता ईश्वराची प्रार्थना आहे.

---

निर्मळ अंत;करण झाले पाहिजे. त्याशिवाय आपली भक्ती राहाणार नाही.

---

कांहीही उपकाराची अपेक्षा नसताना उपकार करणारा परमात्मा आहे. हा वात्सल्य भाव आहे. हे आहे भक्त वात्सल्य.

---

भक्त जो आहे त्याचे दोष परमेश्वराला दिसतच नाहीत. अदर्शनम् हे वात्सल्य भगवंताचे असल्यामुळे सर्व संत महात्म्यांची प्रवृत्ती भक्तीमार्गाकडे झालेली आहे.

---

सर्वत्र भगवान एक आहे त्यामुळे ते अपकार करणा-याचा, निंदा करणा-याचा, व्देष करणा-याचा व्देष करीत नाहीत. ही भगवंताची खरी भक्ती आहे. व्देष करणे म्हणजे अभक्ती आहे.

---

परमेश्वरापासून विन्मुख असणा-या विप्रापेक्षा भगवत भक्त हरिजन अधिक श्रेष्ठ आहे.

---

देवाची आठवण होण्याला दु;खाचा असाही उपयोग होतो. अर्थात् तसे सुकृत असेल तरच नाही तर नाही.

---

भगवंताची भक्ती हासुद्धा प्रयत्नवादच आहे. तिथे काया, वाचा, मनाची अत्यंत शुद्धी आवश्यक आहे. हा फार श्रेष्ठ प्रयत्न आहे.

---

ईश्वराच्या लीलेबद्दल संशय असून उपयोग नाही. फक्त ती पहायची. त्यात आनंद आहे. ईश्वरावर विश्वास ठेवल्यावर कांही कमी पडेल अशी शंका मनांत आणणे म्हणजे खरा विश्वास नाहीत तो्

---

ईश्वरावर पूर्ण निष्ठा असल्यामुळे व्यवहारातील अनुकूल प्रतिकूल गोष्टी मनातच येत नाही. ही भक्ताची योग्यता आहे.

---

श्रद्धारुप दृष्टी पाहिजे. सद्भक्ताजवळ श्रद्धा असल्यामुळे हा सद्गुरुंचा प्रभाव काय आहे हे त्यांना पहायला मिळते.

---

संसार आणि परमार्थ या दोघांचीही सिद्धी, श्रद्धा आणि भक्तीनेच प्राप्त होते.

---

□

दृढ प्रेम बसणे, दृढ श्रद्धा भगवंतावर बसणे यालाही पूर्वसुकृताची जोडी आहे आणि तीसुद्धा ईश्वराची कृपाच आहे.

---

भवसिंधुत बुडणा-याला भक्ती ही तारक आहे.

---

देवाला दिलं म्हणजे संपेल आपण दरिद्री राहू असं वाटू देऊन उपयोगी नाही. देवाला दिलेलं कधीही संपत नाही.

---

भक्तीने आत्मानात्म विचार होऊन जातो. भगवंताच्या भक्तीचा प्रभाव आहे आणि त्यामुळे ही बुद्धी इतकी विवेकसंपन्न झालेली आहे. भक्तीशिवाय कांहीही फळसिद्धी नाही.

---

श्रद्धेने भविष्यही सुधारलं जात आहे.

---

भक्तीचं फळ हे फक्त त्या भक्ती करणा-यालाच मिळतं असं नाही तर इतरांनाही मिळतं. भगवत् भक्तीने या पुण्याचे फळ वंशोवंशी मिळतं.

---

पूर्वजांचं चरित्र ऐकल्यानंतर आपल्या मनांत विशेष भक्ती उत्पन्न होऊ शकते.

---

"ठेविले अनंते तैसेची राहावे" म्हणजे अनंत हा जे जे करतो ते आपल्या कल्याणाकरताच करतो ही भावना असल्यामुळे आपल्या चित्तात समाधान ठेवून राहात असतात.

---

सद्‌गुरु म्हणजे मर्त्य मनुष्य नाही. ही दृष्टी ज्याला आली त्याला सेवा धर्माचे ज्ञान झालेले आहे असे म्हणायला हरकत नाही.

---

छाया आपली सावली असते. ती आपल्याला केव्हांही सोडत नाही. सतत आपल्या बरोबर असते. त्याप्रमाणे नेहमी आपण गुरुंच्या दृष्टीसमोर असावे.

---

सद्‌गुरुंचे ध्यान हेच त्या भक्ताचं जीवन आहे. सद्‌गुरुंच्या चरणाचे तीर्थ घेणे, त्यांच्याच कथा सांगणे, ऐकणे अशी सगळी इंद्रिये सद्‌गुरुंना अर्पण केली आहेत तो खरा भक्त.

---

कोणचंही दुःसाध्य कार्य करायची गुरुंनी आज्ञा केल्यावर त्या आज्ञेवर विश्वास ठेवून ते कार्य करावे.

---

गुरुच ईश्वर आहेत या भावनेने त्यांचे अर्चना करुन त्यांच्या आज्ञेचे पालन करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे.

---

नवविधा भक्ती घडणे फार कठिण आहे. पण त्यातली एखादी तरी भक्ती घडावी.

---

ईश्वर भक्तांची संगती घडणं हेही जन्माचं साफल्य आहे. महाराजांची आज्ञा पालन करणं हाच मोठा सेवाधर्म आहे.

---

देवानं आपल्याला कधी सोडू नये हे सतत देवाजवळ मागणे मागायचे असते.

---

देवाला आपले विस्मरण झाले नाही म्हणजे आपल्याला त्याचे स्मरण होते ही त्याची मोठी खूण आहे.

---

सकाम भक्तीने दुसरं एक कार्य होतं. ते म्हणजे मनांतल्या कामना हळू हळू कमी होत जातात. ती सकाम भक्तीच आणखी शुद्ध भक्तीच्या स्वरुपात प्रगट होते.

---

संपत्ती मागताहेत देवाकडे, मागू दे. त्या संपत्तीमुळे विषयभोगाकडे लक्ष गेलं तरीसुद्धा ईश्वराच्या कृपेने मनांतल्या वासना, इच्छा कमी कमी होत गेल्या नंतर साधकाच्या मनात शुद्ध भक्ती निर्माण होते.

---

पापक्षयाशिवाय सकाम भक्ती घडणेही कठीण आहे.

---

भगवान दत्तात्रेयांच्या सहस्त्रनामामध्ये त्यांना स्मर्तृगामी हे विशेषण दिलेले आहे. म्हणजे स्मरण केल्याबरोबर येणारे. ते स्मरण मात्र अधिकारी भक्ताचं पाहिजे आहे.

---

ईश्वराची नामशक्ती केवढी मोठी आहे । इतकी की पापच मनुष्य करु शकत नाही.

---

संसाररुपी जो रोग आहे तो कायमचा दूर करणारे जे सद्गुरु आहेत त्यांची सेवा घडली पाहिजे. गुरु भक्त जो आहे, एखाद्या महात्म्याचा, सद्विप्राचा शिष्य असेल, माझ्याकडे ज्याने आपलं अंत;करण ज्याने स्थिर केलेल असेल, व्दंव्दातीत जो झालेला असेल त्याला मी दर्शन देतो. (भगवान विष्णु संदीपकास सांगताहेत)

---

सगुण ध्यानामध्ये त्या रुपाच्या ठिकाणी भक्ती प्रेम आहे. निर्गुण निराकार अशा प्रकारच्या आत्मस्वरुपाच्या ठिकाणी मन स्थिर होणं हीसुद्धा एक प्रकारची भक्तीच आहे.

---

कथा ऐकल्यानंतर आपल्याला जो मोक्ष पाहिजे तो देण्याचे सामर्थ्य सद्गुरुंच्या जवळ असलेच पाहिजे ही भक्ती त्या योगाने उत्पन्न होते. साधकांनासुद्धा या कथा औषधासारख्या आहेत.

---

भगवंताच्या कथा श्रद्धा भक्तीने श्रवण करणे म्हणजे भवसागर तरुन जाण्यासाठी असलेली श्रवणरुपी नौका आहे.

---

देवाला आपला देह समर्पण केल्यानंतर, आत्मनिवेदन केल्यानंतर त्याला खायला मिळेल की नाही, प्यायला मिळेल की नाही ही चिंता नाही. ही आत्मनिवेदन भक्ती श्रेष्ठ भक्ती आहे. स्वत:ची सगळी चिंता सोडून देणं. तर ही आत्मनिवेदन भक्ती भक्ताने करायची असती. तर इथे देवानेच आत्मनिवेदन केलं. दत्त हे नांव त्यामुळे प्राप्त झाले.

---

"तुझा विसर न व्हावा" दुसरं कांही नकोय. उत्तम भक्ताचं लक्षण आहे. विस्मरण होणं म्हणजे फार दु:खं आहे.

---

भक्ती प्रेम श्रद्धा याचं महत्व आहे. जो श्रद्धेने, भक्तीने मोठा तोच खरा देवाजवळ मोठा मानला जातो. व्यावहारिक लहान मोठेपण, योग्यायोग्यता याचा विचार भगवंताजवळ नाही.

---

निर्मल भक्ती शुद्ध प्रेम पाहिजे. भक्तीकरता भक्ती पाहिजे. भक्ती दुस-या कोणच्या कार्याकरता नको आहे. अशी भक्ती मिळवण्याकरता अनेक जन्म घालवावे लागतात तेव्हां ती भक्ती मिळते. देवाजवळ मुक्ती मागितली तर मुक्ती देतात. "जा, मुक्त व्हा" म्हणतात. पण भक्ती चटकन देत नाहीत. भक्ती मागणारेही थोडे आहेत आणि ती देताना देवालासुद्धा विचार करायला लागतो.

---

हे जे भक्त पूजा करतात, कोणीही असो, लहान असो मोठा असो. प्रल्हादजींनी त्याकरता एक सिद्धांत मांडलेला आहे. देवाला जर आपण दिले तर आपल्याला मिळेल ही इच्छा सर्व जण करतात. म्हणजे काय तर विश्वरुपी परमात्मा आहे. विश्व म्हणजे त्याचं प्रतिबिंब आहे. आरशामध्ये जसं प्रतिबिंब दिसतं तसं. बुद्धीमध्ये असलेलं प्रतिबिंब म्हणजे सर्व जीवात्म आहेत. त्या प्रतिबिंबाला जर मिळायचे असेल तर अगोदर बिंबाला अर्पण करावे लागते. रत्नाची माळ प्रतिबिंबाला पाहिजे असेल तर बिंबाच्या कंठामध्ये ती माळ घातली पाहिजे म्हणजे ती प्रतिबिंबाला मिळते. त्याप्रमाणे सगळेही आपण ईश्वराचे प्रतिबिंब आहोत. ईश्वराला दिले म्हणजे आपल्याला मिळेल त्या शिवाय मिळू शकणार नाही. अशा इच्छेने ते सगळे पूजा करतात असा मोठा सिद्धांत त्यांनी मांडला आहे.

---

अभय ही देवाने दिलेली संपत्ती आहे. निर्भय झालं पाहिजे भक्तांनी. मृत्युचीसुद्धा भीती नसावी.

---

दास्यभक्ती म्हणजे काय गुरुंच्या बरोबरच राहीले पाहिजे म्हणजे दास्य भक्ती होते असे नाही. आपल्या वर्णाश्रम धर्माचे, कर्मयोगाचे आचरण करणे

□

हीसुद्धा दास्यभक्तीच आहे. कर्मयोगाचा दास्यभक्तीमध्ये अंतर्भाव केला आहे शास्त्रकारांनी. ईश्वराच्या आज्ञेचे पालन करणं, स्वामींच्या आज्ञेचे पालन करणं हे दासाचे कर्तव्य आहे ना । मग देवाने जसे वागायला सांगितले तसे वागले म्हणजे दास्य भक्ती झाली नाही असं समजण्याचं कारण नाही. ती दास्यभक्तीच आहे.

---

सर्व भूतांच्या ठायी प्रेम निर्माण होणे ही भक्तीची उच्च मुख्य भूमिका आहे. सर्वत्र एक परमात्मा आहे परंतु तितकी भूमिका मिळायला अधिकार प्राप्त होणं कठीण आहे. हळू हळू होणार तो. म्हणून ही जी कांही विभूतीरु पे परमात्म्याने धारण केली आहेत त्यांच्या ठिकाणी कां होईना, प्रतीकांच्या ठिकाणी जरी भक्ती उत्पन्न झाली तरीसुद्धा ती उत्तम भूमिकेपर्यंत नेऊ शकते आहे. ती भक्ती शिकायची आहे.

---

“मोटके निमिषभरी देई“ म्हणतात. एक निमिष तरी दे. आणि ते निमिष देऊन जर ती भक्ती वाढत गेली तर भुभुक्षा शांत होत जाऊन मुमुक्षा निर्माण होते. मुमुक्षेमुळे वैराग्य प्राप्त होतं. ध्यानयोगाचा अभ्यास होतो आणि त्या उपासना मार्गात अधिकार प्राप्त होऊन भगवंताचा मोठा प्रसाद मिळतो.

---

महावाक्यपासून मीच परमात्म स्वरु प आहे, मीच ब्रम्हरु प आहे अशा प्रकारचे ऐक्य ज्ञान उत्पन्न होते आणि सर्व अविद्या दूर होते. पूर्ण शांती मिळते. अशा प्रकारचे जे भक्त ते आत्माराम होताहेत. आत्मानंदामध्ये निमग्न झालेले आहेत. आणि पूर्ण मुक्ती म्हणजे सर्व कर्म बंधनातून ते कायमचे मुक्त झालेले आहेत. जन्म मृत्यु कांही नाही.

---

भगवंताचा स्पर्श आहे. सद्‌गुरुं च्या पायावर मस्तक ठेवायला मिळालं तर त्या स्पर्शाने आपला दुरीतक्षय होतो आहे. त्यांची दृष्टी आपल्यावर पडली तर त्या दृष्टीचाही महीमा आहे. कोणच्याही उपायाने कां होईना चंचल असलेले अंत;करण सद्‌गुरुं च्या ठिकाणी, भगवंताच्या ठिकाणी आपल्याला स्थिर करता आले तरी भगवत् स्वरु प होऊन जाते.

---

भगवंताच्या चरणकमलाचे जे ध्यान करतात त्या ध्यानामुळे भगवंताचा त्यांच्यावर प्रसाद होऊन धीजाड्य, प्रारब्धकर्म सगळही नाहीसं होतं. यात कांही आश्चर्य नाही.

---

नामस्मरण करणा-या भक्ताला चांगले अनुभव येतात. चित्तवृत्ती सात्विक होते. दर्शने होतात. हे कोणाला सांगू नये. दुर्जनांना सांगून काय उपयोग ? , ते काय नामाकडे वळणार आहेत का ? हा एक नामापराध आहे.

---

"ठेविले अनंते तैसेची राहावे" ही ओवी काय सांगते. भक्तीमध्येसुद्धा ईश्वराची इच्छा आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे राहाणे ही फार मोठी भूमिका आहे. संसारासक्त चित्त असणा-याच्या मनामध्ये भक्ती जरी असली तरी त्याला ही भूमिका मिळणार नाही. त्या अनंताची इच्छा आहे तसच राहीलं पाहिजे. समाधान होत नाही. असं कां झालं ? कारण स्वत:च्या कर्तृत्वाचा एक अभिमान त्याच्यात शिल्लक राहातो. मी इतकं केलं. मी इतका विश्वास ठेवला आणि ईश्वराने असे करावे ?

---

ग्राहक संपल्यामुळे उपदेश होत नाही. देवांनी दुर्लक्ष केले असे म्हणायचे कारण नाही. आमच्या मनातील जिज्ञासा संपलेली आहे. ज्ञान देणारे समर्थ आहेत. सर्वज्ञ संत महात्मे आहेत. ईश्वराच्या आज्ञेने फिरत आहेत पण ग्राहक नाहीत. ते देत असलेले ज्ञान घेणारे कोणी नाही.

---

सद्‌गुरुंची भेट व्हावी. त्यांच्याकडून मार्गदर्शन व्हावे, आत्मोन्नतीचा मार्ग कोणता आहे हे कळावे, अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. तरच तशा सद्‌गुरुंची भेट होऊन कार्य होतं. भक्तीच्या बरोबर नुसती आपण सेवा केली, परंपरेने सेवा केली म्हणून भागत नाही. बुद्धीमध्ये असलेले दोष दूर व्हायला पाहिजे मग सेवा घडली पाहिजे.

---

देवाने दिलेली स्थिती चांगलीच आहे असे भक्ताला वाटत असते. भक्तांनी, साधकांनी, उपासकांनी हा विचार नेहमी मनांत ठेवला पाहिजे की देव भक्तावर कधीही रागवत नाही. ही बुद्धी पाहिजे. देव भक्ताची उपेक्षा कधीही करत नाही. रागावणे, उपेक्षा करणे हे अल्प सामर्थ्याचे लक्षण आहे. देवाचे परिपूर्ण सामर्थ्य आहे ही जाणीव एकदा पक्की झाली म्हणजे देव रागावला, त्याने लक्ष दिले नाही असे कधीच वाटणार नाही. "जैसी स्थिती आहे तैशापरी राहे" आपल्या संचिताकडे लक्ष द्या असे संत सांगताहेत. आपल्या कर्माकडे लक्ष द्या. देवाच्या सामर्थ्याची अवहेलना करु नका.

---

भगवंताला भक्ती प्रिय आहे. बाह्य धनाची अपेक्षा नाही.

---

खरी भक्ती उत्पन्न झाली तर अंत:करण तन्मय होऊन जाते. डोळे मिटायला नकोत कांही नकोत. समाधी अवस्थासुद्धा नको. त्यामुळे जे खरे ज्ञानी असतात ते कधीही भक्तीमार्ग सोडत नाहीत. भगवंताचे ध्यान करणे, नामस्मरण करणे, "पडीले वळण इंद्रिया सकळां" हे वळण गोपींनी सर्व इंद्रियांना लावले. आपल्या उपास्य देवतेशी एकरुप होणं ही भक्तीची

पराकाष्ठा आहे. दास होणेही चांगले पण ध्यानाचा परिपाक म्हणजे तद्रुप होऊन जाणे.

---

भगवतीचं खरं स्वरु प मनामध्ये आणून तन्मय होणं हेसुद्धा तप आहे. तसं ते आपल्या हातून घडत नाही म्हणून उपास तापास, काया वाचा मनाने होईल तेवढे तप आपल्याला करावे लागते.

---

शुद्ध अंत;करण जर प्रेममय झालं तर त्या प्रेमाला कांही दु;ख नाही संकट नाही.

---

ईश्वराची चरित्रे ऐकावीत, ईश्वराचे गुण ऐकावेत, सत्संगती करावी, संतांच्या सेवेत माझे जीवन जावे अशी मनाला तळमळ लागून राहीली पाहिजे.

---

थोडी सेवा झाली, थोडीच भक्ती घडली माझ्या हातून असेच शेवटपर्यंत वाटले पाहिजे.

---

गोपाळ कृष्णा । आपली कृपा कोणावर होते ? ज्याच्याजवळ कांहीही नाही. जो कबूल करतो माझ्याजवळ कांहीही नाही अर्थ नाही, काम नाही, धर्म नाही.

---

आस्तिक्य बुद्धी निर्माण होणे, संसारातील वासना, आसक्ती कमी कमी होऊन ईश्वराकडे, धर्माचरणाकडे मन लागणे ही खरी भक्ती आहे.

---

“यथा देहे तथा देवे“ ही भक्तीची व्याख्या आहे. देहावर जितके प्रेम आहे, देह तादात्म्य जेवढे दृढ आहे, ईश्वरशक्तीसुद्धा तशीच आहे. आपल्या देहाबद्दल जितके प्रेम वाटते तितके प्रेम देवाबद्दल निर्माण झाले तर पूर्ण विश्वास झाला.

---

जीवावर प्रेम करणे म्हणजे भगवंतावर प्रेम करणे आहे. जीवरु प झालेल्या भगवंतावर प्रेम करणे आहे. जीव भाव बाजूला करु न साक्षात भगवानच आहेत या भावनेनेही प्रेम करता येते.

---

भक्तीमार्ग हा काळजीतून मोकळे करणारा आहे.

---

परमार्थामध्ये सद्भावनेला फार महत्व आहे.

---

भगवान भक्ताचे मन अधर्मापासून बाजूला करतात. कितीही अन्याय झालेला असला तरी त्या ईश्वराच्या कृपेने अंत;करणामध्ये तितिक्षा उत्पन्न होते, विवेक उत्पन्न होतो. (भक्तीचा उपयोग काय यावर महाराजांनी दिलेले उत्तर)

---

व्देष रहीत अंत;करण असणे शुद्ध सात्विक मन बनणे ही पूजा आहे देवाची.

---

---

□

# धर्म

- धर्माचे कांही तरी फळ आमच्या पदरात पडावे अशी इच्छा निर्माण झाली की बुध्दी सदोष झाली आहे असे समजावे.
- धर्माचे अमूकच फळ मिळावं असं आम्ही ठरवून भागत नाहीये. तो सात्विक धर्म आहे, राजस आहे का तामस आहे हे ओळखता येणारे जे आहेत ते त्याचं फळ ठरविणार. आम्ही आमच्या मनाने ठरवून काय उपयोग ? मी चांगलं कर्म केलेलं आहे, मला असं फल मिळालं पाहिजे. असं म्हणून काय उपयोग ?
- दैवी प्रकृतीचे जे जीवात्म असतील त्यांचे अशा प्रकारचं धर्माचरण करण्याचे ध्येय ठरलेलं आहे. कसाही असा प्रसंग आला तरी ते आपले ध्येय सिध्द करतात. ते आपले सत्व घालवित नाहीत. सत्वशुध्दी झालेली असते.
- दुसरा दु;खी आहे हे पाहिल्यानंतर निसर्गत;च ज्याच्या मनांत दया उत्पन्न होते त्याचं दु;ख दूर करण्याची प्रवृत्ती होते हा एक सज्जनांचा मोठा धर्म आहे.
- भगवत् भक्तीच्या योगाने मनामध्ये, बुध्दीमध्ये असणारे रजोगुण, तमोगुण नाहीसे होतात आणि शुध्द सत्वगुण उत्पन्न झाल्यानंतर ते सगळं धर्माचरण निश्चयाने आणखी शेवटपर्यंत होऊ शकतं.
- धर्माचरणाला मनाची फार अनुकूलता पाहिजे. मनाची अनुकूलता नसेल तर शुध्द धर्माचरण घडणे शक्य नाही.
- पांच प्रकारचे धर्म आहेत. सत्य, दया, दान, एकपत्नीव्रत आणि "अद्रोह;सर्वभूतेषु"1 कोणालाही या धर्माप्रमाणे वागता येतयं.

त्याकरता मात्र अभ्यास व्हायला पाहिजे. ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे त्या शिवाय मनाची प्रवृत्ती अशी कशी होणार ?

- धर्माधर्माचा विचार हा बाह्य वृत्ती असेपर्यंत आहे. बाह्य वृत्ती मनाच्या सगळया संपलेल्या आहेत. अंतर्मुख वृत्ती झाली, परमेश्वराच्या ठिकाणी ते अंत;करण स्थिर झालेलं आहे. समाधी अवस्था त्यांना मिळाली आहे. त्या अवस्थेमध्ये पुण्यही नाही आणि पापही नाही.
- धर्माने वागायचे. पण ते लोकांनी हा मनुष्य धार्मिक आहे, चांगला वागतो असं म्हणावं म्हणून वागायचयं? दंभ आहे तो. दांभिकपणा आहे. खरं धर्माचरण नाहीये त्यामुळे त्याचा उपयोग काय ? तो मिथ्याचार आहे, खरा आचार नाही.
- श्रद्धेने शास्त्राने सांगितल्याप्रमाणे वागायचं आणि त्याप्रमाणे फल मिळवायचं. केवळ श्रद्धा मिळणं ही ईश्वराची मोठी कृपा आहे. साधन चतुष्टय संपत्तीमध्ये श्रद्धेंलाही शास्त्रकारांनी स्थान दिले आहे.
- अर्थ शास्त्र किंवा नीती शास्त्र. पण धर्म शास्त्रापेक्षा ते फार कमी दर्जाचे आहे. शुद्ध धर्माचरणामध्ये हे लोभ वगैरे कोणतेही विकार उत्पन्न होऊन उपयोगी नाही.
- विवेक धन आपल्याला परमेश्वराने दिलेलं आहे. धर्म आपल्याबरोबर आहे. शांती देणारा तो आहे फक्त. आणखी त्याच्या आज्ञेप्रमाणे वागायचे आहे दुसरं कांही नाही.
- दुस-याच्या सुखी जीवनाकरता आपलं कितीही नुकसान झालं, आपला नाश जरी झाला तरी हरकत नाही परंतु हा शुद्ध धर्माचा विचार आहे.
- कोणीही माझी निंदा करु नये, कोणीही मला बोलू नये, माझ्याविरुद्ध कोणी वागू नये, हे जे आपल्याला प्रतिकूल जे वाटतं तसं लोकांबरोबर न वागायचा आपण प्रयत्न केला पाहिजे

हा खरा धर्म आहे. हे धर्म सर्वस्व आहे म्हणतात, भीष्माचार्य महाराज.

- कर्तव्यो धर्म संग्रह; हे मनुष्य जन्माचे मुख्य कर्तव्य आहे. धर्म संग्रह जास्तीत जास्त करण्याकरता मनुष्य जन्म आहे.
- आपल्याला कोणी वाईट वाटेल असं बोलल्यावर वाईट वाटतं मग आपण तसं दुस-याला कां बोलावे ? तो संयम जर बुद्धीमध्ये राहीला तर तो धर्म आहे.
- धर्म जर आपल्या हातून झालेला असेल, दान धर्म म्हणा, परोपकार म्हणा, आम्ही दरवर्षी वाडीला जातो, अमूक करतो, तमूक करतो---- तोंडाने कशाला बोलायचे उगीच ? करायचे फक्त. जर आपल्या मुखाने धर्म सांगितला गेला तर तो संपला. धर्म म्हणजे इथे पुण्य असा अर्थ ध्यायचा.
- धर्माचरणाचे फळ लगेच मिळत नाही. ताबडतोब कोणचेच फल मिळत नाही. पेरल्याबरोबर कोणचेच धान्य उगवत नाही. धर्माचरणाचे फळ आपल्याला निश्चित मिळेल असा असा विश्वास पाहिजे.
- धर्माबद्दल प्रेम निर्माण होऊन धर्माचरण झाले पाहिजे. उपासना या करता करायची आहे.
- धर्माचरण करताना बुद्धीभेद होण्याचे अनेक प्रसंग येतात आणि कांही वेळेला लोकांच्याकडून, आप्तेष्टांकडून होणा-या या बुद्धीभेदाला आपण बळी पडतोही. पण तीच वेळ सांभाळण्याची असते.
- "धर्मे प्रीतीम् देहि" नुसतं धर्माचरण घडू दे असं नाही. धर्माबद्दल माझ्या अंत;करणामध्ये अत्यंत प्रेम, श्रद्धा, आदर निर्माण झाला पाहिजे. हा गुण माझ्या बुद्धीमध्ये द्यावा.
- धर्म पालन ही ईश्वराची आज्ञा आहे आणि त्याच्या आज्ञेचे पालन करुन माझे पूर्ण कल्याण व्हावे या करिता धर्माचरण करीत आहे. "सर्वेपि सुखिन; सन्तु " ही भावना निर्माण होण्याकरता

□

धर्माचरण असावे लागते. आपल्याला एकट्यालाच सुख मिळावे ही बुध्दी जाण्याकरीता धर्माचरण पाहिजे.

- आपल्या स्वत;च्या तोंडाने जर आपण आपल्या धर्माचरणाचे वर्णन केले तर तो धर्म नाहीसा होतो.
- मृत्युने आपले केस एका हातात धरलेले आहेत आणि आपल्यावर तलवार उपसलेली आहे ही बुध्दी ठेवून जेवढे होईल तेवढे धर्माचरण केले पाहिजे.
- धर्मानेच सिंहरुप धारण केले आहे आणि त्या धर्मावरती अधिष्ठित अशा प्रकारची जगदंबा जी आहे ती सर्वांचे संरक्षण करे आणि दैत्याचा नाश करते.
- सिंहाची पूजा म्हणजे साक्षात् धर्म देवतीची पूजा आहे. ही भावना मनांत निर्माण होते हे ज्ञानाचे फल आहे.
- दु;खाने प्रारब्ध संपून जात आहे, धर्माचरणाने संचित नाहीसे होते आहे आणि ईश्वराच्या कृपेने चित्ताला कायमची शांती आहे. हे धर्माचरणाचे, ईश्वरभक्तीचे मुख्य फळ आहे.
- ईश्वरार्पण बुध्दीने धर्माचरण झाल्यावर आसक्ती, ममता, अहंता हे जहे दोष आहेत ते सगळे दोष जातात.
- ईश्वराबद्दल आस्तिक्य बुध्दी निर्माण होणं हे धर्माचरणाचे फल आहे.
- धर्मशील व्यक्ती एकटी असली तरी ती सामर्थ्यशाली असू शकते.
- धर्म, अर्थ आणि काम या तिघांची समृध्दी, अनुकूलता, पत्नीच्या योगाने होणार आहे. दोघांनी मिळून धर्माचरण करावे अशी शास्त्राची आज्ञा आहे.

# संत आणि ईश्वर

- परिपूर्ण बुद्धीही जगामध्ये आहे. जे संत महात्मे आहेत त्यांची बुद्धी परिपूर्ण आहे. ती बुद्धी मात्र एकरु प आहे.
- पूर्ण शक्तीशी ज्या बुद्धीचा संबंध झालेला आहे त्या महात्म्यांच्या बुद्धीला संरक्षणही ईश्वरच करतो. संरक्षण करणारी शक्ती ईश्वरच आहे असे निश्चयाने वाटते.
- उत्पत्ती, संरक्षण आणि नाश, सर्वही संरक्षण शक्ती आमच्यात नाही. आणि आम्ही संरक्षणही करु शकत नाही, यावरु न ईश्वराचे अस्तित्व सिध्द होत आहे. सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांनी युवा शिक्षेच्या आरंभी हाच तर्क मांडला आहे.
- दत्तात्रेय स्वरु प हे ईश्वररु पच आहे. परिपूर्ण शक्तीचं स्वरु प आहे आणि त्याचबरोबर गुरु स्वरु प आहे. ईश्वरच सर्वांचा आदिगुरु आहे. मार्गदर्शन, उपदेश हे गुरुं चे काम. त्याला प्रत्येकाची बुद्धी शक्ती, पहाता आली पाहिजे त्या शिवाय उपदेश करु न उपयोग नाही, सुधारणा करायची झाली तर कोणता रोग झाला, कोणत्या अवस्थेपर्यंत पोहोचला आहे. प्राथमिक अवस्था आहे की शेवटची अवस्था आहे. औषध देणा-याला हे जाणता आलं पाहिजे. सर्वही बुद्धीशी जिचा संबंध आहे अशी एक समष्टी बुद्धी, परिपूर्ण बुद्धी, परिपूर्ण शक्ती आहे तीच दत्तात्रेय स्वरु प असे शास्त्रकार व्यासमहर्षींनी सांगितलं आहे.
- दत्तस्वरु प म्हणजे परिपूर्ण एक ईश्वर स्वरु प आहे. ही एकात्म भावना ज्या बुद्धीमध्ये उत्पन्न झाली ती परिपूर्ण बुद्धी होय.

□

- ईश्वराचे ज्ञान करुन घ्यावयाचे असेल तर गुरु स्वरुपाच उपासना केली पाहिजे. गुरु स्वरुपामध्ये भगवान उपदेश करतात. दत्त स्वरुपामध्ये ईश्वर आणि गुरु या दोघांचाही समन्वय आहे.
- जो आपला आश्रित आहे, ज्याच्या मनांत भक्तीभाव अपरंपार भरलेला आहे त्याचे दोष भगवंताला दिसतच नाहीत. फक्त गुण दिसतात. भक्तांच्या दोषांच्या जागीही त्याला गुणच दिसतात.
- तद्‌दोष अदर्शनम्‌ वा ।
- त्याला आश्रितजनांचे दोष दिसतच नाहीत. त्याच्या अंत;करणामध्ये प्रेम किती आहे एवढेच भगवंताला दिसते. त्यामुळे आणखी कोणतीही शक्ती मोठी असली तरी त्या सर्व शक्तीचे नियमन करणारी ही भगवंताची शक्ती कशी आहे याचा अनुभव भक्तांना येत आहे.
- साधन आणि साधनांना लागणारी बुध्दी यांच्यामध्ये येणारी विघ्ने आहेत, प्रतिबंध आहेत, त्याचा निरास करणे ही सगळी कार्ये त्या एका परमात्म शक्तीच्या व्दारा चालू आहेत. “सर्वही तोच आहे“ अशी बुध्दी साधकाची, भक्ताची ज्या वेळेला होईल त्या वेळेला त्याची बुध्दी परिपूर्ण झाली असे समजायला हरकत नाही. स्वत;च सर्व निरिक्षण करायचे. कोण कोण साधन करीत आहे, कोणत्या साधकाच्या बुध्दीला प्रतिबंध झालेला आहे, त्याच्या बुध्दीमध्ये सुधारणा कशी करायची आहे हे सर्व प्रत्यक्ष पहाण्याकरता स्वत;चा सर्वत्र संचार आहे हे या श्रीदत्तात्रेयांच्या अवताराचे वैशिष्ट्य श्री वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी स्पष्ट केले आहे. मार्गदर्शक बुध्दीचा अधिकार असेल तर एकाच जन्मामध्येही ज्ञान होऊ शकतं.

□

- या ईश्वराच्या कृपेने या कलीयुगातसुद्धा धर्माचरण घडलं नाही, अधर्माचरण घडलं तरीसुद्धा अशा कोणत्या तरी महात्म्याच्या संबंधाने त्या जीवाचा उद्धार होऊ शकतो.
- संतांची संगती मनापासून झाली पाहिजे. त्या वेळेला मनामध्ये संसाराची आसक्ती असून उपयोग नाही. संसारातून मी केव्हां सुटेन असे वाटले पाहिजे आणि तशा इच्छेने जर संतांची संगती घडली तर त्या संगतीचा उपयोग होतो. त्याचं आचरण निर्लोभ वृत्ती आहे, मानसन्मानाची इच्छा नाहीये. अनासक्त जीवन आहे. कुठही लक्ष नाही. हे नुसतं पाहूनच मनावर परिणाम होत आहे त्या दृष्टीने पाहिले पाहिजे.
- सत्पुरुषांच्या संगतीचे महात्म्य आहे. ती संगती जर झालेली असेल, भगवंताची जर अवकृपा असेल तर कृपा ते उत्पन्न करुन देतात. त्यांचे वचन भगवंतालासुद्धा मोडता ये नाही. त्यांचेही सामर्थ्य आहे. म्हणून त्यांच्या संगतीने भगवत्भक्ती निर्माण होते. चित्त शुद्ध होत आहे. आणि तो जीव युगस्वभाव कसाही असला तरी त्यातून तो मुक्त होतो.
- जिज्ञासू पाहिजे. जे रहस्य त्यांना समजले आहे ते घेणारा कोणी आहे का याची ते वाट पहाताहेत. अधिकारी जो असेल त्याला ज्ञान द्यायचे. वाटेल त्याला सांगून उपयोग काय ? तामसी बुद्धीच्या माणसाला सांगून काय उपयोग ? त्याला सगळे विरुद्धच वाटणार. त्या ज्ञानाबद्दल त्याला कांही आस्था राहाणार नाही.
- बुद्धीचा उपयोग कसा करायचा, कशासाठी करायचा हे सगळे समजून सांगणारे महात्मे भेटले पाहीजेत. पण अशा महात्म्यांची भेट होणे फार कठीण आहे. महापुरुष संश्रय; फार कठीण आहे. हे महत्व त्यांच्याजवळ आहे. दुस-याची बुद्धी बरोबर ओळखणारे, त्यांच्या बुद्धीतले दोष जाणून ते कसे जाऊ शकतील हे बरोबर सांगू शकतात. भवरोगवैद्यच त्यांना म्हणतात.

- ज्ञानी महात्मे भवरोगवैद्य आहेत. आपल्यासमोर आलेला जीवात्मा कोणचे कर्म घेऊन आलेला आहे, त्याचा भवरोग कसा घालवायचा याचे त्यांना पूर्ण ज्ञान असते. त्यांच्या दृष्टीने असाध्य रोग नाहीच आहे. " आपणसारीखे करीती तत्काळ " हे सामर्थ्य आहे म्हणून त्यांना महापुरुष म्हणायचे.
- महात्म्याची कृपा त्यांच्या इच्छेने झाली पाहिजे. आपण आग्रह करु न झालेली कृपा खरी ठरत नाही.
- संयमाने राहाणारे महात्मे कितीही अनुकूल परिस्थिती असली तरी कोणाचा उपमर्द करत नाहीत. निर्मत्सरता हा त्यांचा नैसर्गिक अभ्यास आहे. द्रोह नाही कोणाचा.
- मार्गदर्शन करणारे महात्मे भेटणं आणि त्यांनी ह्याचे कल्याण करायचे हे ठरविणं मोठं आहे. ईश्वराचा हा खरा अनुग्रह आहे. नाही तर मार्ग सांगून मोकळे होतात, निघून जातात दुसरीकडे कुठे तरी. ऐकणा-यानेही ते लक्षात ठेवून त्याप्रमाणे केलं, नाही तर नाही, असं नाही.
- आत्मनिरीक्षण करु न आत्मोद्धार करु न घेतला पाहिजे. हेच संत महात्म्यांचे सांगणे आहे आणि त्याकरता तो महापुरु ष संश्रय; लागतो.
- वासना अंत;करणामध्ये असेपर्यंत भीती आहे. संत महात्मे निर्भय झालेले असतात. स्पष्ट आणि निश्चित मनाने ते सांगू शकतात, मार्गदर्शन करु शकतात. ऐकणा-याचे जर कांही पुण्य असेल आणि त्याने ऐकले तर त्याचे कल्याण होते.
- शिवरु पाने कल्याण करणारी ही तीच शक्ती आहे. शंकर किंवा जगदंबेच्या रु पाने कल्याण करणारी शक्ती तीच आहे. एकच ईश्वर शक्ती आहे. ही अव्दैत भावना पूर्ण होण्याकरता व्दैतातून सबंध विचार करु न मनामध्ये ते रु प स्थिर करु न पुढे जायचे.
- अन्यायाचा तिरस्कार निर्माण झाल्यावर देवांच्या शरीरातून तेजोरु पाने ती जगन्माताच बाहेर आलेली आहे. भगवती

□

महालक्ष्मी समष्टीरुपही आहे. आणि व्यष्टीरुपही आहे. दोन्ही रुपं आहेत. देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडले म्हणजे देवी हा देवांचा समूहच बनला. मग ही देवांची शक्ती आहे असं मानायचं का ? देवांची शक्ती स्वतंत्रही आहे म्हणतात, सर्व व्यापी ती आहे. देवीची स्वतंत्र निराळी शक्ती आहेच आहे. पण तिचे आवाहन करता आले पाहिजे. त्या शक्तीचे आवाहन देवांनी आपल्या शक्तीच्या व्दाराने केले. त्यामुळे सर्व देवांच्या शरीरातून शक्ती निर्माण झाली, असेही घडून आलेले आहे. देवीची आत्मशक्ती कायम आहे. त्यात कमी जास्त कांहीही नाही.

- समाजामध्ये श्रेष्ठता मिळवलेला जो आहे तो कशाही प्रकारे श्रेष्ठता मिळवू शकतो. तो जर शास्त्र मर्यादेचं उल्लंघन करु लागला तर त्याला प्रथम शासन करावयाचे आणि शास्त्र मर्यादेचं निर्भयपणे संरक्षण करणारा जो आहे त्याचं संरक्षण करायचे हे ईश्वराचं कार्य आहे. नियमन करावयाचे, संतांची, सज्जनांची संरक्षण करणा-यांची बुध्दी सुरक्षित ठेवणे आणि धर्म मर्यादा उल्लंघन करणा-यांची बुध्दी बाजूला करणे हे फार मोठे काम आहे. हे ईश्वराशिवाय कोणीही करु शकणार नाही. अशा रीतीने परमेश्वराने अवतार धारण करुन सज्जनांचे संरक्षण करणे म्हणजे त्यांच्या बुध्दीचे संरक्षण करणे आणि दुर्जनांच्या बुध्दीचा नाश करणे हे त्याचे कार्य आहे.
- या नियामक शक्तीचे दुसरेही कार्य आहे. हे दुसरे कार्य म्हणजे अनेक जीव वारंवार जन्माला येतात, त्यांना मृत्यु येतो असे किती तरी जीव जन्म घेत असतात. त्यांना अध्यात्म विद्या कशी मिळायची व त्यांचा उध्दार कसा व्हायचा ? हे मोठे कार्य आहे. त्या करीता ईश्वराचे दुसरे स्वरुप म्हणजे गुरु स्वरुप आहे.

- सर्व कर्माचे भोक्तृत्व हे ईश्वराचे कार्य आहे. कर्तृत्व जीवाला आणि भोक्तृत्व ईश्वराला हे कसे संभवनीय आहे ? जो कर्ता तोच भोक्ता असायला पाहिजे ना ।
- भक्तीयोगाची सर्व प्रवृत्ती वात्सल्यभावामुळे झाली आहे. भगवंताच्या या प्रेरक स्वरुपाला बुद्धीदातृत्व म्हणतात. योगक्षेम हे महत्वाचे आहे. योगक्षेम निर्वाह तो करतो. यामध्ये प्रापंचिक योगक्षेम तो वाहतोच पण पारमार्थिक योगक्षेमाकडे तो लक्ष देतो हे मुख्य आहे आणि असा योगक्षेम तो निरपेक्षपणे करतो आहे.
- सवितारुपी परमात्मा बुद्धीला प्रेरणा करत असतो. परमार्थामध्येही जी अपेक्षित बुद्धी आहे त्यालाही प्रेरणा करीत असतो. जीवात्मा कर्मानुसारीणी बुद्धी जरी घेऊन जन्माला आलेला असला तरीसुद्धा पारमार्थिक बुद्धी प्रेरणा करण्याची शक्ती त्याच्याजवळ आहे. सूर्यनारायण हे सवितास्वरुप म्हणजे बुद्धी प्रेरक ईश्वराचे कार्य म्हणून, सविता हे एक स्वरुप दाखवलं आहे.
- गणांचा पती म्हणजे पालक । गण म्हणजे प्राण, इंद्रिय, हृदय, बुद्धी, संपूर्ण सूक्ष्म शरीर घेतलं आहे. सूक्ष्म शरीरांतर्गत बुद्धी तत्वाला प्रेरणा करणे हे कार्य सवितारुपी ईश्वराचे आहे. त्या सर्वही गणांचे रक्षण करणारा परमात्मा म्हणजे गणपती आहे.
- बुद्धीनेच निर्णय व्हायचे आहेत. साक्षात्कार म्हणजे बुद्धीलाच आहे. विद्या भगवती म्हणून जे देवांनी वर्णन केले आहे ही ब्रम्हविद्या आहे. हीच साक्षात्कारात्मक वृत्ती भगवतीचे स्वरुप आहे. म्हणजे बुद्धीनेच सर्व संसार निवृत्त होऊ शकते.
- हे संपूर्ण अचेतन असे विश्व (मनापासून बाहेरपर्यंत सर्व) ज्या प्रकाशाने भासत आहे तो प्रकाश म्हणजे नगतनया आहे. चैतन्यरुपाने सर्वांना भासक अशा प्रकारचे भगवतीचे स्वरुप आहे. भासलं पाहिजे ना । आता ते कसं भासलं पाहिजे, काय भासलं पाहिजे ही बुद्धीला प्रेरणा सवितारुपाने होणार आहे. ती

बुद्धी स्थिर राखण्याचे काम गणपती रुपाने केलेलं आहे. पण अगोदर त्या मूळ पदार्थाचं भान झालं पाहिजे ना । त्या मूळ पदार्थाच्या अस्तित्वाला मान्यता मिळायला ज्ञानाची जरुरी आहे. ज्ञानाशिवाय अस्तित्व नाही. शशश्रृंगाचं ज्ञानच नाही अर्थात त्याला कांही अस्तित्व नाही. तसे या सर्व स्वरुपाचं चिंतन करीत असताना भासक म्हणून चिंतन केलेले आहे. कर्तृत्व यात कांहीच दाखवलेले नाही. प्रेरकत्वसुद्धा भासकच आहे. त्या त्या कर्माचं फलं भासविणे किंवा इंद्रियांना तिकडे प्रवृत्त करणे अशा सर्वही जड जाताला भासमान करणारी जी चित्शक्ती आहे ती नगतनया देवी आहे.

- दर्शेंद्रिय किंवा सिद्धांत दृष्टया अंत;करण, मन, बुद्धी एकच मानलेले आहे. त्याच्यापासून निर्माण होणा-या ऐंद्रिय सुखांना भासक असे जे तत्व आहे ते शंकर रुप आहे.
- शंकराचं कार्य, इंद्रियांनी घेतली जाणारी जी एकादश सुखं आहेत ती भास्य आहेत हा विवेक उत्पन्न करणे. तर सुखभासक असं जे स्वरुप आहे ते शंकराचे रुप आहे. सर्वही सुखं ही भास्य आहेत अर्थात विनाशी आहेत. विवेक ज्ञानाचे फल म्हणजे विनाशित्वाचे ज्ञान आणि विनाशित्वाचे ज्ञान म्हणजे वैराग्य आहे.
- इंद्रियांचा आणि विषयांचा संबंध आला म्हणजे सुखदु;खादि उत्पन्न होतात. ती विनाशी आहेत अर्थात ती त्याज्य आहेत. भासक जे सुख आहे मूळ सुख म्हणजे चैतन्य, सच्चित्सुख. हे भासक जे आहे ते शंकर स्वरुप आहे. शंकर हे संहारकर्ते आहेत असं म्हणतात. संहार करायचा म्हणजे काय ? भवहारक ते आहेत. ज्या वेळेला संपूर्ण एकादश इंद्रियांच्या रुपाने निर्माण होणारी सर्व सुखे भासू लागतात. त्या पैकी भास्य आणि भासक हा विवेक ज्या वेळेला होईल त्या वेळेला भव संपला.
- भगवान शंकर "भवहाररुपकम्" आहेत. हे भव म्हणजे उत्पन्न होणारे जे संसार स्वरुप आहे, हे जे सुख स्वरुप आहे, ज्या

सुखाकरता सर्व संसार चाललेला आहे हे सगळेही भास्य आहे. भासकाचे चिंतन झाले पाहिजे. केवळ भास्याचे चिंतन करणे हा दोष आहे. पण “हे विश्वची माझे घर“ अशी जर ममता उत्पन्न झाली तर हा दोष नाही. तर याप्रमाणे क्रमाक्रमाने भवहरण करणारे शंकराचे स्वरु प असे आहे की ते सुख भासक आहे. ज्या सुखाकरता सर्व प्रयत्न चाललायं त्या सुखाचं स्वरु प कसं आहे ? तर ते विनाशी आहे. विवेकाने हे समजून ध्यायला पाहिजे. म्हणून भगवान शंकराचं कार्य म्हणजे भवहरण करणे.

- “मानस सुख दु;ख नाम हारक हरि; “ सुखदु;ख वगैरे सगळया ज्या मनोवृत्ती आहेत त्या सगळयाही मनोवृत्तींचं हरण करणारी “हरि“ देवता आहे. सर्वही पातकांचा नाश करणारी हरि शक्ती आहे. ते ईश्वराचे कार्य आहे. मानससुखदु;खांच हरण करणारी हरि शक्ती आहे म्हणजे हरि स्वरु प परमात्मा मानस सुखदु;खाचं हरण करीत असतो. मनाची वृत्ती त्या सुखदु;खाकडेच लागली व त्याच्या अनुसंधानाने जास्त जास्ती सुखापेक्षा दु;खवृत्तीच उत्पन्न होत आहेत. “मानस सुखदु;खानाम् हारक“ असे सच्चित्सुख स्वरु प मूळ स्वरु प आहे. त्याला हरि म्हटलेलं आहे.
- ईश्वर निरनिराळया रु पात भासला तरी एकच आहे. घरामध्ये असलेले दिवे ज्या वीजेवर चालतात, आगगाडीला जोडलेले इंजिनही त्याच वीजेवर चालते. ज्या ज्या ठिकाणी अशी कार्ये चालतात तिथे एकच वीज आहे. तेज एकच आहे.
- कर्म शक्ती जगताच्या कार्याकरिता परमेश्वराने निर्माण केली आहे. जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे फल द्यायचे एवढेच काम त्या शक्तीचे आहे. परमात्मा स्वत; अलिप्त आहे ही कर्म शक्ती सिध्द झाल्यानंतर ईश्वर मानावाच लागतो. सर्वही आपत्ती आपल्या पूर्व कर्माने आली असो किंवा आपल्या चूकीमुळे आलेली असो ती दूर करण्याची शक्ती त्या परमेश्वराची आहे.

- शंकरांना अर्ध नारी नटेश्वर म्हणतात. अर्ध्या शरीरामध्ये पार्वती माता आहे. इतके शरीरांतर्गत सान्निध्य असूनसुद्धा संयम आहे. इंद्रिय निग्रह आहे. निर्विषय ज्यांचे मन झालेले आहे असे जे योगी पुरुष आहेत त्यांच्यामध्ये अग्रणी भगवान शंकर आहेत.
- विष्णुसहस्रनामामध्ये "अनुकूल" असे एक भगवंताचे नाम आहे. म्हणजे नामाप्रमाणे भगवान सर्व मानवांना अनुकूल आहेत, पर तीरावर नेण्यासाठी. इतकी व्यवस्था केलेली आहे. असे असताना ज्याला भवसमुद्रातच गटांगळया खात राहायचे आहे त्याला मी काय करणार, म्हणाले.
- संसारही देवानेच करायचा आहे. योगक्षेम शब्दाचे दोन्ही अर्थ आहेत. संसारातील योगक्षेमही तोच चालविणारा आहे आणि परमार्थातही काय कमी आहे, काय पाहिजे आहे ही सगळी व्यवस्थाही तोच पहाणारा आहे.
- चित्र हेसुद्धा ईश्वराचे प्रतीक आहे. शास्त्राने ज्यांच्या पूजा करायला सांगितल्या आहेत अशा प्रतीकांपैकी प्रतिमा हीसुद्धा मूर्ती आहे. आणि त्या मूर्तीची पूजा हेसुद्धा मोठे पुण्यकारक कर्म आहे.
- मातापितरांची आणि गुरुंची पूजा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच पूजा आहे.
- सर्व जगत् कर्माप्रमाणे निर्माण केले भगवंतांनी. कर्माप्रमाणे फल देण्याचे कार्यही अखंड चालू आहे.
- अनुकूल प्रतिकूल प्रसंग निर्माण झाल्यामुळे मानसिकही सुखदु:खाचे प्रसंग निर्माण होतात. अशाही प्रसंगाच्या वेळेला सगळेही अंतराय, सगळीही विघ्ने दूर करणारी ईश्वरशक्ती आहे.
- सर्वत्र आहे परमात्मा आणि सर्वज्ञ असून सर्व शक्तीसंपन्न आहे. प्रारब्धभोग जरी विरुद्ध असले तरी त्याच्या कृपेने ते दूर होतात. अनुकूल होतात अशी त्याची शक्ती आहे.

- ज्या ठिकाणी विशेष तेज आहे, त्याग आहे, वैराग्य आहे, अत्यंत उदार वृत्ती आहे, तितिक्षा आहे, सहनशीलता आहे, धर्मप्रेम आहे ही सगळी ईश्वराचीच विभूती आहे असे सांगितले आहे.
- कधी मनाची चलबिचल न होणं ही मनाची जी स्थिती आहे ती ईश्वराच्या कृपेने प्राप्त होते.
- साधकावस्थेमध्येसुद्धा साधना अभ्यास व्यवस्थित चालू रहावा या करता ईश्वराची उपासना करायची.
- कोणतेही प्रयत्न करण्याच्या वेळेला लागणारी जी बुद्धी ती बुद्धी देणारा तो आहे आणि त्या बुद्धीने कर्म प्रयत्न व्यवस्थित झाल्यानंतर त्याचं फल देणाराही तोच आहे.
- ईशकृपा अधिकार उत्पन्न करु शकते.
- ईश्वराला, भगवतीला कर्म बंधन नाही.
- जे मुख्य स्वरु प आहे, सच्चिदानंदघन स्वरु प, सर्व जगात व्यापून राहाणारे त्या स्वरु पाचे ज्ञान झाले पाहिजे. जीवसुद्धा ईश्वराला आव्हान देऊ शकतो. जर धर्मशील असेल तर ईश्वरसुद्धा त्याची परीक्षा बधू शकतो.
- भगवान भक्तवत्सल आहेत पण वाटेल त्याच्याबद्दल वात्सल्य दाखवित नाहीत.
- भूदेव कसे आहेत तर आपले कर्तव्य कर्म करु न जो लाभ होईल त्यात ते संतोषाने राहाणारे आहेत.
- दया ईश्वराने करावी, तो समर्थ आहे म्हणून त्याच्या दारात जायचे आहे. भगवंताने मनुष्यरु प जरी धारण केलं असलं तरी ती ईश्वरशक्ती सुप्तावस्थेत कायम आहे. भक्ती आला की त्याच्या भावनेच्या संबंधाने ती शक्ती व्यक्त होते. ईश्वराच्या लीलेबद्दल संशय असून उपयोग नाही. फक्त ती पहायची. त्यात आनंद आहे.

□□

- अश्वत्थ वृक्ष म्हणजे त्या भगवंताची विभूती आहे. त्रिमूर्ती त्या अश्वत्थ वृक्षामध्ये राहातात.
- वस्तुत; परमात्म्याला आकार नाही, क्रिया नाही, शुध्द सत्वात्मक परमात्मा आहे. परंतु ही जी त्रिगुणात्मक बुध्दी आहे त्या बुध्दीशी संबंध येऊन सर्व विश्वरु प त्यांनी धारण केलं आहे.
- सर्वांची आर्ती दूर करणारा जो परमात्मा आहे त्याला जर दया उत्पन्न झाली तर ती कार्य केल्याशिवाय कशी राहाणार ? म्हणून हे एक प्रयोजन आहे. भगवान दत्तात्रेय अवतीर्ण झाली. लोकांची दु;ख दूर करावी या हेतुने आलेले आहेत.
- आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी एक व्यक्ती जरी असली तरी त्या व्यक्तीचंही कार्य करणं, त्याला मार्गदर्शन करणं, त्याला संकटमुक्त करणं, याकरताही भगवान दत्तात्रेय आले.
- ईश्वर स्वरु प हे नियामक आहे. नियामक होण्याला इच्छाशक्ती परमेश्वराची मोठी आहे. ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती आणि इच्छाशक्ती -- श्रीगुरु याचा अर्थच तो आहे. श्री म्हणजे सर्व प्रकारची शक्ती, सर्व प्रकारचे ऐश्वर्य त्यांच्याजवळ आहे. तर ही इच्छाशक्ती जरी असली तरी जीवाचं नियमन जे केलं जातं ईश्वराकडून ते नियमन म्हणजे केवल त्याच्या इच्छेने होत नाही. जीवांची कर्म जी आहेत ती कर्म सर्व पाहून नियमन केलं जातं जीवांचं. म्हणून कोणताही दोष ईश्वराच्या ठिकाणी नाही.
- ईश्वर हा पर्जन्याप्रमाणे असतो म्हणजे तो समदृष्टीचा असतो.
- आत्मदान केलं म्हणून दत्त हे नाव पडलं आहे. आनंद देणारं म्हणून चंद्र हे नांव त्याचं ठेवलं. मोठे उग्र तपस्वी म्हणून शंकरांचं दुर्वास हे नांव ठेवलं.
- परमहंस अवस्थेत जे आहेत, पूर्ण ज्ञान झालेलं आहे, अन्य सगळं मनांतलं गेलेलं आहे, संसारही गेला मनांतून असे शांत चित्त झालेले जे मुनी त्यांना भक्तीयोग शिकिवण्याकरता कृष्णावतार झाला.

- “कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम्“ असे ईश्वराचे सामर्थ्य शास्त्रकारांनी मानलेले आहे. ईश्वरालासुद्धा आपल्या अनंत शक्तीची कल्पना नाही असे मानले जाते. “यदि वा अंग वेदन वेद“ वेदांमध्येसुद्धा वर्णन केलेले आहे. आपली माया, शक्ती सामर्थ्य किती आहे हे त्याला तरी कळतं की नाही कुणास ठाऊक ? याचा अर्थ ईश्वराला अज्ञान आहे असं नाही. ती अनंत शक्ती आहेकी आपली शक्ती अंनत आहे इतकच त्याला माहीत आहे.

- जगाच्या संरक्षणाकरिता ईश्वराने जे अधिकारी नेमलेले आहेत त्यांची ज्ञानशक्ती फार मोठी आहे. उगीच वशिल्याने कोणत्याही अयोग्य व्यक्तीची नेमणुक होत नाही.

- मनाची, बुद्धीची सुधारणा ही राज्यशासनाने करता येण्यासारखी नाही. केवळ तसा कायदा करुन मनाची सुधारणा शक्य नाही. तशा प्रकारची ईश्वरशक्ती ज्याच्याजवळ आली आहे, ज्याच्या दृष्टीमध्ये शक्ती आहे, ज्याच्या संकल्पामध्ये शक्ती आहे असा एकच महात्मा जरी असला तरी तो कार्य करु शकतो.

- सर्वांना सुख मिळावं, सर्वही निरामय असावेत, आरोग्यसंपन्न सर्वही असावेत ही संत महात्म्यांची भावना, इच्छा, वासना आहे. आणि त्यांचा वशिला प्रत्यक्ष विश्वेश्वराजवळ आहे.

- भगवान दत्तात्रेय, भगवान ज्ञानेश्वर महाराज, भगवान शंकराचार्य महाराज, हे सगळे अवतारी महात्मे आहेत. विभूतीरु प आहेत, अवताररु प आहेत. आणि यांच्या अवताराचे प्रयोजन म्हणजे लोकांच्या बुद्धीचे संरक्षण करणे. म्हणजे त्या बुद्धीला मार्गदर्शन करणे हे एक मोठे कार्य आहे. सज्जनांच्या बुद्धीच्या संरक्षणाकरिता प्रयत्न केला पाहिजे, त्यांना प्रतिबंध करणारी दुर्जनांची बुद्धी ईश्वराने बाजूला ठेवली तरीसुद्धा त्यांच्या बुद्धीमध्ये जर कांही दोष निर्माण झाले तर ईश्वर दूर करतो. धर्ममर्यादा पालन करणा-यांच्या बुद्धीमध्येसुद्धा दोष

निर्माण होण्याचा संभव आहे. अगदी शास्त्रीय पद्धतीने वागणारे, शास्त्राकडून आपली उन्नती करुन घेणारे जे महात्मे आहेत त्यांच्याही बुद्धीमध्ये कांही दोष निर्माण होण्याचा संभव आहे तो दूर कोणी करावयाचा ?

- "गुरु कर्णधारम्" सद्गुरु संत महात्मे हे नावाडी आहेत. नांव घेऊन समुद्रातून पलीकडे नेऊन पोचवितात. ईश्वररुप ते आहेत. श्रद्धा भक्ती मनांत असेल तर त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागून आपले पूर्ण कल्याण होते.
- वीतराग महात्मा जो आहे, निर्वासन अंत;करण ज्याचे झालेले आहे अशांची चरित्रे पहावीत, ऐकावीत, चिंतन करावे म्हणजे चित्त स्थिर होते.
- इच्छा कांहीही नसणे हे संतांचे मुख्य लक्षण आहे. चांगली इच्छा म्हणजेसुद्धा शेवटी आग्रह होतो ना । आग्रह कसलाच नाही. चित्ती असो द्यावे समाधान. झालं देवाच्या इच्छेने तर ठीक, अशी संतांची वृत्ती असते.
- संत महात्म्यांचे मार्गदर्शन हे भगवंतांनी करुन ठेवलेले आहे. त्यांनी सर्वांना मार्गदर्शन करणे म्हणजे देवाचेच कार्य आहे.
- ज्यांचे पूर्णपणे निर्वासन झाले आहे त्यांची नुसती दृष्टी जरी आपल्यावर पडली तरी आपली मनोवृत्ती पूर्णपणे पालटून जाते.
- वाल्मिकी महर्षींनी सर्व लोकांची बुद्धी शुद्ध होण्याकरिता रामायण लिहिले आहे, ब्रम्हदेवाच्या आज्ञेवरुन. कशी वृत्ती पाहिजे, मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर कसे वागले पाहिजे हे शिकवण्याकरता रामायण आहे.
- सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी तर असे सांगितले आहे की संसाराची इच्छा असल्यास तो परमेश्वराजवळ मागा. आपल्या प्रयत्नांनी तुम्ही संसारात सुखी होण्याचा प्रयत्न करु नका.

- दत्ताश्रमासारखी केंद्र संतांच्या संकल्पाप्रमाणे निर्माण झालेली असतात. त्या ठिकाणी जाऊन आपली संकटे दूर करण्याकरता प्रार्थना करावी किंवा आपल्या जीवानाचे कल्याण व्हावे अशी प्रार्थना करावी.
- अविवेक जो त्याला झालेला आहे, त्या अविवेकाने भ्रष्ट होण्याची पाळी आली तर तो दूर करण्यासाठी म्हणून ईश्वराची उपासना किंवा महात्म्यांची संगती, त्यांचे मार्गदर्शन याची अतिशय जरु री आहे. धर्मशील असणारे महात्मे, त्यांच संरक्षण, हे धर्माचं संरक्षण आहे.संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागून चांगली कर्मे जर घडली तर संसार हा सुखाचा होतो, परमार्थही सुखाचा होतो.
- गुरु शब्दाचे दोन अर्थ ज्ञानराज करतात. पित्याची आज्ञा मान्य करु न, राज्यत्याग करु न भगवान रामचंद्रप्रभु वनवासात गेले ती आज्ञा पालन केली पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे हा एक अर्थ. “संसार हा ऐसा जाणून । जो भेटताची हरी शीण “ असं म्हणतात. किती अनादि कालापासून चालत आलेला आहे. आणि हा जायचा कसा ? तर सद्‌गुरुंची भेट झाल्यावर तो निघून जातो आहे.
- आत्मभाव ज्या बुद्धीमध्ये बाणलेला आहे अशा महात्म्यांचा जो संकल्प आहे, त्यांची दृष्टीसुद्धा इतकी शक्तीसंपन्न असते की ती ज्याच्यावर पडेल त्याचा सर्वही पापक्षय होतो. असेही महात्मे जगामध्ये आहेत की ज्यांच्या शरीराचा स्पर्श किंवा त्यांच्या दृष्टीपातानेही बुद्धीचे परिवर्तन होऊ शकते.
- अनुयायी मिळायला वेळ लागत नाही. श्रेष्ठ नेता होण्यालाच वेळ लागतो.
- साधूची भावना अशी असते की धन हे आपल्याला ईश्वराने दान देण्याकरता दिलेले आहे.

- सिद्ध आपला परिचय करुन देताहेत नामधारकाला. “सद्‌गुरुंचं चरित्र जे आहे हेच अमृत आहे. हे अमृत मला मिळाल्यामुळे आणि त्याचाच आस्वाद मी घेत असल्यामुळे माझ्या सगळया वासना, सगळया इच्छा शांत झालेल्या आहेत.“ स्थितप्रज्ञ अवस्था सद्‌गुरुंच्या चरित्रामुळे प्राप्त होते.
- निग्रह अनुग्रह असं दोन्ही प्रकारचं तपाचं फळ आहे. शाप देण्याचं सामर्थ्य आहे त्या शापातून मुक्त करण्याचं सामर्थ्य आहे. असं दोन्ही प्रकारचं सामर्थ्य आहे. पण इतकं असूनही अहंकार नाही. निरहंकार वृत्तीने राहाणारे हे तपस्वी पुरुष आहेत.
- संतांच्या संगतीमध्ये कांही प्रत्यक्ष, वैय्यक्तिक उपदेश मिळालाच पाहिजे, अशा आग्रहाची जरुरी नाही. कोणाच्या व्दाराने कसे मार्गदर्शन मिळेल याचा नेम नाही. अवधूतांनी 24 गुरु केले. ज्याच्या मनामध्ये पूर्ण भक्ती आहे असा जो अधिकारी साधक असेल त्या साधकाला कुठूनही मार्गदर्शन मिळू शकते.
- सायंदेव महाराजांना सांगताहेत, “आपल्या दर्शनाचे महात्म्य इतके आहे, गंगा पापक्षय करणारी आहे, चंद्र उदयाला आल्यावर उन्हाचा ताप वगैरे कमी होतो, शांत होतो आणि कल्पवृक्षाच्या जवळ गेलं तर दारिद्रय दूर होतं. मागेल ते तो देतो. ही तीनही फले आपल्या दर्शनाने प्राप्त होत आहेत् “दर्शनमहतित्रयम्“ पाप जातं, तापही जातो आणि दैन्यही जातं. हा एक पूर्ण विश्वास, निष्ठा महाराजांच्या शक्तीबद्‌दल ज्यांच्या मनांत उत्पन्न झाली आहे त्यांना ही तीनही फळं मिळतात.
- सद्‌गुरु निरुपम आहेत. म्हणजे आमच्याप्रमाणे कसे म्हणायचे ? पण तशीच बुद्धी होते. तेव्हां विषयांध जे झालेले आहेत, ज्यांच्या मनांमध्ये संसाराच्याच अशुभ वासना भरुन राहिलेल्या आहेत त्यांना गुरु स्वरुप समजणार नाही आणि सेवाही त्यांच्याकडून घडणार नाही.

- सद्‌गुरु स्वत:चे साम्य त्याला देतात. परिस हा लोखंडाचे सोनं करेल. आपली जी योग्यता आहे तीच योग्यता शिष्याची करणं हे फक्त सद्‌गुरुं चच सामर्थ्य आहे.
- सद्‌गुरुं ची कृपादृष्टी ज्याच्यावर पडली ते अर्थाअर्थी संसारामध्ये जरी आसक्त झालेले असले तरी त्यांचा उद्धार झालेला आहे. केवळ विषयासक्त आहेत अशा लोकांवरही दया करु न महाराजांनी त्यांचा उद्धार केला आहे.
- सद्‌गुरुं चा प्रसाद जर झाला तरच हा संसारभ्रम पूर्णपणे नाहीसा होतो.
- संत महात्मे भक्ती मार्गाने गेले आहेत. स्वत; तर त्या मार्गाने जाऊन सुखी झालेच आहेत पण इतरांनाही सुखी करताहेत. इतरांची दु;खं दूर करताहेत. ही परंपरा आहे.
- अहंकाररु पी अंध;कार आहे तो दूर करायला बाहेरच्या कोणच्याही प्रकाशाचा उपयोग नाही. तो अज्ञानांध;कार दूर करण्याची शक्ती फक्त सद्‌गुरुं जवळ आहे.
- हा महात्मा ईश्वररु प आहे अशी भावना ठेवून सेवा करणा-यांच्याकडे त्याचं सगळं पुण्य जातं. म्हणून संत महात्म्यांकडे जाताना ही दृष्टी ठेवली पाहिजे.
- भगवत् भक्त, अध्यात्म ज्ञानी महात्मा एकटा असला तरी तो परिषद आहे. एक अध्यात्म ज्ञानी व्यक्ती राष्ट्र आहे, तोच विश्व आहे. त्याचा संकल्प, त्याची वाणी कार्य करु शकते.
- विचार, विवेक वैराग्यादि साधनांनी मन जर स्थिर झाले, ज्ञान समजावून सांगणारे महात्मे जर भेटले, तर मनांत उत्पन्न होणारे विकार, संशय वगैरे सर्व त्यांच्या मार्गदर्शनाने नष्ट होते.
- सिद्ध महात्म्यांना प्रचाराची जरु रही नाही. ईश्वराच्या आज्ञेने ते कार्य चाललेले आहे. ईश्वराचे कार्य आहे, त्याची आज्ञा आहे, निरहंकार वृत्ती आहे.

- ज्या ठिकाणी ज्ञान आहे, पूर्ण वैराग्य आहे, पूर्ण नियामक शक्ती आहे, संकल्पशक्ती मोठी आहे अशा लोकोत्तर शक्तींचा आविर्भाव ज्या ठिकाणी झालेला आहे ती ईश्वराची विभूती आहे असे भगवान सांगताहेत.
-

# आहार शुद्धी

- घरातली जी गृहीणी असेल तिने पवित्रपणे अन्न तयार करुन, ईश्वराला निवेदन करुन आपल्या सर्व कुटुंबियांना दिल्यानंतर त्यांची मनं तयार करीत असते ही गृहीणी. याकरता आहारशुद्धी मुद्दाम सांगितली आहे.
- पवित्रपणा, पापभिरुता त्यांच्या मनांत असल्यामुळे पावित्र्य संरक्षण स्त्रियांनी करावे असे सांगतात. धर्म संरक्षण त्यांनी करावे. पुरुष धर्म कोणचे, स्त्रीधर्म कोणचे, मुलांचे धर्म कोणचे, समाजामध्ये असणा-या व्यक्तीचेही धर्म कोणचे हेही आपल्या बुद्धीने पटवून देणारे, सांगणे ही स्त्रियांवर जबाबदारी आहे.
- स्वयंपाक स्त्रियांनी करावा हे मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे. साधन म्हणून जे आहे त्यात शुचिता पाहिजे. स्वच्छता निराळी आणि शुचिता निराळी. वास घेतलेले फूल देवाला वाहायला काय हरकत आहे ? नाही. गेले ते. वास घ्यायचा नाही. म्हणजे शुचिता ही फक्त शास्त्रगम्य आहे. शास्त्रीय अभ्यास करणारी ज्यांची बुद्धी आहे त्याच्या बुद्धीला ते पटणार आहे. तेव्हां या दृष्टीने मनुराजाने स्वयंपाक करण्याची जबाबदारी स्त्रियांवर टाकली आहे.
- राष्ट्रातील प्रत्येक स्त्री, पुरुष, बाल,वृद्ध, प्रत्येकाचे मन तयार करण्याचे काम मनुराजाने स्त्रियांकडे दिलेले आहे. सर्वांचा अन्नपाक तयार करण्याचे काम स्त्रियांना सांगितले म्हणजे कांही त्यांचा तिरस्कार केला नाही. अन्नदान हे स्त्रियांकडूनच व्हायला पाहिजे.

- श्रद्धा हा स्त्रियांचा स्थायी भाव आहे. कितीही शिक्षण झालं तरी ती श्रद्धा मलीन होत नाही.
- पतीपासून आपला कांही फायदा व्हावा म्हणून त्याच्याबरोबर राहाणे वेगळे आणि छायेप्रमाणे सेवाभावाने पतीबरोबर राहाणे वेगळे.
- पतीचे पादतीर्थ घेणे आणि सेवा करणे हे स्त्रिचे खरे भूषण आहे.
- पतीला संतोष देणे, पतीची आज्ञा पाळणे हाच पतिव्रतेचा धर्म आहे.
- साधूसंतांविषयी मनात आदरभाव बाळगणे, पोष्य वर्गाचे पोषण करणे, आज्ञेशिवाय दुसरे कांहीही न करणे असे सगळे स्त्री धर्म आहेत.
- गृहीणीला राग आला तरी तो तिने लगेच शांत केला पाहिजे. संयम पाहिजे.
- साध्वी स्त्रीच सगळया कुळाला पवित्र करते. पंचमहाभूतांच्या देवतासुद्धा तिला भिऊन राहातात.
- गायी, विप्र, तपस्वी महात्मे, थोडया प्रमाणात कां होईना अद्यापि वेद आणि पतिव्रता वगैरे जगांत आहेत म्हणून ही भूमी टिकून राहिली आहे.
- मानव जन्माला आल्यानंतर देवाला समाधान झालं म्हणतात, आनंद झाला. परमात्म्याचं स्वरु प जाणणारी बुद्धी याला आहे अशी खात्री देवाला आहे. तशी बुद्धी आपली तयार व्हावी म्हणून आहाराकडं लक्ष दिलं पाहिजे.
- "आहारौ सत्वशुद्धी" हा नियम शास्त्रकारांनी सांगून ठेवला आहे. आहार जर शुद्ध असेल तर गुरु ची जी विद्या मिळालेली आहे ती शुद्ध राहाते, तेजस्वी राहाते. सर्वही लोकांकरिता त्या विद्येचा उपयोग करण्याचे सामर्थ्य त्या यजमानाला प्राप्त होते.

- जे अन्न आपल्या शरीरामध्ये जाते त्याच्या सात्विकांशापासून आपले मन बनते. तेव्हां मनाला पवित्र अन्न जर मिळाले, त्याचा सात्विक अंश जर मिळाला तर सर्वांची मने किती पवित्रे होतील, किती निर्भय होतील, धैर्यसंपन्न होतील. अन्न जितके पवित्र असेल शुद्ध बुद्धीने तयार केलेले असेल तर त्या अन्नाच्या सेवनाने तयार होणारे मनही शुद्ध निर्भय आणि सात्विक होईल. वाटेल ते अन्न भक्षण करुन मनाची तयारी होणार नाही. मन निर्भय होणार नाही. अन्नाचा संबंध मनाशी आहे. आपल्याजवळ शुचिता हवी. आपण शुद्ध राहीले पाहिजे.
- आचारसंपन्न विप्र, आपले गुरु, श्वशुर, शिष्य, आपले आजोबा, वगैरे अशा ठिकाणी भोजन केले असता दोष नाही.
- पंचमहायज्ञांनी ज्यावर संस्कार झालेले आहेत ते अन्न ध्यावे.
- किती जेवण ध्यावे यालाही नियम आहे. मुनीने 8 घास, वानप्रस्थ स्वीकारलेल्याने 16 घास आणि गृहस्थाला 32 घास ध्यायला परवानगी आहे.
- स्वैपाक झाल्यावर अतिथीला, देवाला, आपल्या पोष्य वर्गाला अर्पण करुन मग आपण जेवायचे आहे. त्यांचा त्यात वाटा आहे. या सगळयाला धर्म म्हणतात.

# आरोग्य

- सर्वांनी आरोग्य संपन्न राहावे हीच संत महात्म्यांची इच्छा आहे. त्याला पुष्कळ प्रतिबंध होऊ शकतात. कांही पूर्व कर्मामुळेही आरोग्य बिघडते. परंतु आरोग्य प्राप्त होण्याकरीता अनेक प्रकारची साधनं, शास्त्र ही देखील ईश्वराने निर्माण केली आहेत.
- "सर्वे सन्तु निरामय;" आरोग्य संरक्षण सर्वांचे व्हावे हेच समाजवादाचे मुख्य उद्दीष्ट्य मनुराजाने सांगीतले आहे.
- आधीव्याधी प्रत्येकाला आहेत. नाहीत कोणाला ? त्या आधीव्याधींपासून जीवाला मुक्त करणं ही मोठी जबाबदारी आहे आणि हा व्यवसाय करणारी डॉक्टर म्हणा वैद्य म्हणा जी मंडळी आहेत त्यांच्यावर ही जबाबदारी विशेष आहे. त्यांना ते सगळं ज्ञान आहे ना ।
- आरोग्य सुधारणेच्या कार्याला प्रतिबंध असण्याचे कांहीच कारण नाही. आरोग्य नको कोणाला ? आरोग्याशिवाय प्रपंच तरी कसा होईल आणि परमार्थ तरी कसा होईल ? आरोग्यच जर नसेल राष्ट्रकार्य तरी कसे करता येईल.

# स्थानमहात्म्य

- तीर्थस्नानाने आणखी पापक्षय होतो आहे. पातकांचा क्षय करण्याकरता तीर्थक्षेत्रामध्ये जायचं, देवतांचं दर्शन करायचं, पितरांचं तर्पण करायचं, यामुळे जी कांही पातके घडली असतील ती नाहीशी होतात, त्यामुळे मनाची शुद्धी होते, पुन्हा तशी पातकं घडत नाहीत.
- ज्या ठिकाणी भगवंतांचा निरनिराळया मूर्तीरु पाने निवास असतो अशा पवित्र तीर्थक्षेत्रामध्ये भगवत् भक्तही येऊन राहात असतात. म्हणून तीर्थ क्षेत्रामध्ये अशा सज्जनांचाही सहवास होण्याचाही संभव आहे. पूर्ण श्रद्धा आणि भक्तीने मात्र तिथे गेले पाहिजे. नुसतं आपलं ट्रीप म्हणून तिथे जाऊन उपयोग नाही.
- ईश्वराचे स्थान असेल त्या स्थानांत जाण्याचे भाग्य जर मिळाले तर त्या स्थानांत प्रतिबंध आले तरी ईश्वराच्या कृपेने दूर होतात. निर्विघ्नपणे आपला अभ्यास चालू राहातो आणि त्या अभ्यासामध्ये जास्ती जास्ती उन्नती होऊन साक्षात्काराची योग्यता आपल्याला प्राप्त होते.
- चित्ताला भ्रम व्यग्रता निर्माण करणारे प्रसंग आपण तिथे राहातो तिथे निर्माण होणे शक्य आहे. त्याही ठिकाणी जर आपलं अखंड अनुष्ठान चालू राहात असेल, तर तेही स्थान तशा प्रकारचे पवित्र होते.

- पुण्यक्षेत्रात जायचे असेल तर आपल्याहातून काया-वाचा-मने पाप घडणार नाही याची काळजी घेऊन जायला पाहिजे नाही तर पुण्यक्षेत्री घडलेले पाप न जाता वज्रलेप होऊन जाईल.
- सर्वत्र भगवत् स्वरुप पहाण्याचा अभ्यास करण्याकरताच सर्वत्र संचार करायचा. त्याकरीता तीर्थयात्रा करायला महाराजांनी आपल्या शिष्यांना सांगितलं. पापक्षय व्हायला पाहिजे. त्या शिवाय ज्ञान होणार नाही. मुमुक्षा तर आहेच. त्या मुमुक्षूंना हे तीर्थयात्रेचे साधन सांगितले आहे.
- सर्व पापांचा क्षय होतो म्हणून सर्व नद्यांना तीर्थ म्हटलं आहे. गंगा, गोदावरी वगैरे सर्वही महानद्या तीर्थरुप आहेत.
- ज्या ठिकाणी शुद्ध आणि श्रेष्ठ सामर्थ्य आहे त्या ठिकाणी आपोआप लोकांचे आगमन होते.
- पूर्व तीरावरती अमरेश्वर भगवान विश्वनाथ. काशीक्षेत्रासारखे ज्याला महत्व आहे, विश्वेश्वरतुल्य असे अमरेश्वर त्याठिकाणी आहेत आणि 64 योगिनी या अमरेश्वराच्या संन्निध राहाताहेत असं हे स्थान या स्थानामध्ये महाराजांचा निवास झालेला आहे.
- तीर्थक्षेत्रे वगैरे पवित्र स्थानं जी आहेत त्या स्थानामध्ये राहून भगवंताच्या ध्यानाचा अभ्यास करणं, नामस्मरण करणं हे तिथे जाऊन करावं. ध्यानाचा अभ्यास सांगाताना स्थान हे अत्यंत महत्वाचं सांगितलं आहे. भगवंतांनी आसन हे पवित्र देशात असावे असे सांगितले आहे.

- प्रारब्ध बलवत्तर असेल, ईश्वराची कृपा याच्यावर असेल आणि तसा पक्का निश्चय जर झालेला असेल तर कलीचा धर्मविरोधी करण्याचा स्वभाव जरी असला तो धर्मविरोध याच्याकडे होऊ शकत नाहीये. म्हणून पवित्र स्थानामध्ये जाऊन भगवंताची भक्ती करावी, उपासना करावी त्याचप्रमाणे दानधर्म, यज्ञयाग वगैरे जे आपल्याला यथाशक्ती घडेल ते करत राहावं म्हणजे कलीदोषांची बाधा होऊ शकत नाही असे सांगितले आहे.
- पवित्र स्थानामध्ये जाऊन केलेल्या ध्यानधारणा, जप वगैरेला विशेष फल आहे. हे खरं आहे. पण आपलं मन हे अत्यंत शुद्ध पाहिजे. संकल्प चांगला पाहिजे. स्वत; वैय्यक्तिक एकटया करता कांहीही नाही. यात चित्तशुद्धी होणं फार कठीण आहे, असं व्यास महर्षी म्हणतात.
- संध्या आपल्या घरी करणं, एखादा जलाशय असेल तिथे, नदी असेल तर तिच्या तीरावर करणं याचं उत्तरोत्तर फल सांगितले आहे. पावित्र्य आहे. त्या पावित्र्यामुळे ते कर्म विशेष चांगलं होतं. परंतु केवल पवित्र स्थानानेच हे सगळं असं होतं असं नाही. ईश्वराची, सत्पुरु षाची, सद्गुरुं ची कृपा जर झाली तर ते सगळं घडून येतं आणि चित्त जर अशुद्ध असेल तर तीर्थ असो, क्षेत्र असो, देव मंदिर असो कुठंही जरी गेलं तरीसुद्धा चित्ताची शुद्धी नसेल तर ते कर्म कांहीही फलद्रुप होत नाही.